साप्ताहिक

# माणूस

23 ऑक्टोबर 82 · दोन रुपये



## मारुती-सुझुकी: आता स्पर्धा अटळ!



## दूरदर्शनवरचे रंग

## काही असे_
## काही तसे......

## 'इन्साफ' नंतर 'निकाह!'
## चोप्रांचा आणखी एक खोटा झेंडा!



साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : विसावा 29

¤

२३ ऑक्टोबर १९८२

किमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

अनंत सालकर

# दुष्काळ आणि ग्रामायन

पुण्याच्या जवळचे शिरूर, दौड, हवेली हे तालुके दुष्काळी म्हणून ओळखले जातात. त्यातल्या त्यात शिरूर, दौड तर कायमचे. हा कायम दुष्काळ निसर्गनिर्मित आहे असेही सांगितले जाते. पण या भागात कार्य करणाऱ्या समाजसेवी संस्थांचा अनुभव थोडा वेगळा आहे. निसर्ग प्रतिकूल आहे, पाऊस कमी व अनियमित पडतो, हे खरेच आहे. पण माणसानी ठरवले तर या प्रतिकूल निसर्गावरही मात करता येते दुष्काळाचे सुकाळात नाही तरी बऱ्यापैकी परिस्थितीत रूपांतर होऊ शकते. या तालुक्यातील दुष्काळावर इलाज म्हणून शासनाने भीमा नदीवर अनेक उपसा जलसिंचन योजना (Lift Schemes) उभ्या केल्या; पण यापैकी एक धड चालू असेल तर शपथ. बहुतेक योजना सुरू झाल्या आणि लगेच बंद पडल्या. कुठे शेतकरी सभासदांची आपापसातील भांडणे हे योजना बंद पडण्यामागचे कारण, तर कुठे योजनेची तांत्रिक आखणी सदोष म्हणून योजना गाळात गेलेली. कोटयावधी रुपयांची यंत्रसामग्री या दुष्काळी गावातून सध्या गंजत पडलेली आहे पूर्वी फक्त दुष्काळ होता. आता या योजनासाठी सरकारने किंवा बँकांनी दिलेले कर्जही शेतकऱ्यांच्या बोडक्यावर बसले आहे. या बंद पडलेल्या योजना चालू करणे हा खरे म्हणजे दुष्काळावरचा पहिला इलाज. कारण कोटयावधी रुपये भांडवल अगोदरच येथे अडकून पडलेले आहे. त्या ऐवजी नवीन कामे काढली जात आहेत, पुन्हा नवीन भांडवल ओतले जात आहे.

मागील दुष्काळात अनेक सामुदायिक विहिरी खणल्या गेल्या. पण एकही पूर्ण नाही. सगळीकडचे खड्डे मातीने एव्हाना भरून गेलेले आहेत व फक्त सरकारी कागदपत्रातच या विहिरींची नोंद सापडण्याची शक्यता आहे! प्रत्यक्षात या विहिरी कुठे दिसतच नाहीत. तसेच या चालू दुष्काळात होते आहे. नवीन कामे निघतात व जुन्या कामात गुंतलेला पैसा, श्रम नाहक वाया जातात. प्रयोग म्हणून गेल्या दुष्काळात सुरू झालेली व लगेच बंद पडलेली एक उपसा जलसिंचन योजना पुण्यातील ग्रामायन या संस्थेने पुन्हा चालू केली. परिणाम? चालू दुष्काळाची झळ या गावाला नाहीच, शिवाय शेतकऱ्याच्या डोक्यावरचा कर्जाचा बोजाही पुष्कळच हलका झाला आहे. शिरूर तालुक्यातील शिवतक्रारम्हाळुगी येथे हा प्रयोग झाला. ग्रामायनचे कार्यकर्ते या खेड्यात गेले तेव्हा तेथले चित्र भयानक होते. भूविकास बँकेने या योजनेसाठी शेतकऱ्याना कर्जे दिलेली होती. योजना दहा वर्षापूर्वी सुरू झाली आणि वर्षभरातच बंद पडली. योजना बंद पडली तरी कर्ज कायमच. त्यात व्याजाची भर पडून उलट ते वाढतच होते. बँकेने कर्ज वसुलीसाठी नोटिसा फडकावलेल्या होत्या, जप्त्या येत होत्या. शेतकरी कर्जबाजारी आणि शिवाय बेकारही. त्यामुळे भांडणे आणि मतभेद विपुल. ग्रामायन कार्यकर्त्यांनी प्रथम विश्वासाचे वातावरण गावात निर्माण केले, नवीन कर्ज काढून, गंजलेली—बिघडलेली यंत्रसामग्री दुरूस्त केली व सोसायटी रजिस्टर करून पाणी-

वाटपाची नीट घडी बसवली. गेले तीन–चार वर्षे हा प्रयोग सुरू आहे, भूविकास बँक खूष आहे! कारण व्याज आणि मुद्दल म्हणून चढलेल्या कर्जापैकी जवळजवळ तीनचतुर्थांश कर्ज बँकेला परत मिळाले आहे, दुष्काळ असला तरी यंदाही कर्जपरतफेडीचा हप्ता न चुकवण्याचा गावकऱ्याचा निर्धार आहे.

कोंडापुरी हे आणखी एक उदाहरण. दुष्काळावरील इलाज म्हणून हे लहान धरण दहा वर्षांपूर्वी बांधले गेले. हजार–अकराशे एकर जमिनीला या धरणातून पाणीपुरवठा व्हावा, ४१५ गावात तरी दुष्काळ राहू नये म्हणून ही उपाययोजना. पण धरणाचे पाणी वापरले जात नाही, पाण्याचे under utilisationआहे असे सरकारी दफ्तर म्हणते! दुष्काळी स्थिती असताना शेतकरी पाणी वापरीत नाहीत ही केवढी विसंगती आहे? गेल्या दहा वर्षात कुणीही या विसंगतीचा छडा लावला नाही. ग्रामायनचा एक कार्यकर्ता सध्या या भागात–निमगावला–असतो. त्याने शेतकऱ्यांकडे विचारपूस केली, पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेतल्या आणि या विसंगतीमागची कारणे हुडकून दाखवून दिले की, शेतकरी धरणाचे पाणी घ्यायला केवळ तयारच नाही तर आसुसलेलाही आहे. तो कोंडापुरी धरणाचे पाणी वापरीत नाही किंवा कमी वापरतो याचे कारण, धरणाचे पाणी सोडण्याबाबतचे नियम आणि शेतकऱ्यांची पिकासाठीची पाण्याची गरज याच्यात काही ताळमेळच नाही. शिवाय पाटबंधारे खात्यातला भ्रष्टाचार, लाल फित ही कारणे आहेतच. नुकताच एक दोनशे शेतकऱ्यांचा मेळावा निमगावला ग्रामायन कार्यकर्त्याने आयोजित केला होता. या मेळाव्यात या सर्व गोष्टी बाहेर आल्या. शेतकऱ्यांनी उपस्थित सरकारी अधिकाऱ्यांसमोर आपली बाजू मांडली, तक्रारी ऐकवल्या. गेल्या दहा वर्षांत असा एकही मेळावा या भागात झाला नव्हता. दुष्काळ चालू, धरणाचे पाणी नुसतेच वाहते आहे!! अशाने येत्या शंभर–दोनशे वर्षात तरी शिरूर तालुक्यातला दुष्काळ हटणार आहे का? धरणे बांधली, उपसा सिंचन योजना काढल्या तरी बोंब कायमच! दर चार वर्षांनी दुष्काळ, ठराविक आरडाओरड, धावपळ, नंतर सामसूम! केव्हा तरी हे थांबले पाहिजे. कार्यपद्धतीच बदलली पाहिजे. शासन, बँका स्वयंसेवी संस्था यांनी यासाठी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. निदान अशा दुष्काळी परिस्थितीत तरी.

कोरेगाव-भीवर हे असेच भीमेच्या काठावरचे एक गाव. तालुका दौंड, पुण्यापासून अंतर पन्नास–पंचावन्न किलोमीटर्स. धडक योजनेचा एक भाग म्हणून १९६७ मध्ये या गावात एक उपसा जलसिंचन योजना अस्तित्वात आली. ५० शेतकऱ्यांचे ६०० एकर क्षेत्र अपेक्षेप्रमाणे भिजले असते तर गेल्या १५ वर्षांत गाव कुठच्या कुठे गेले असते! शेतकऱ्यांच्या जमिनी चांगल्या प्रतीच्या आहेत. भीमानदीतून पाणीही वाहते आहे; पण पाणी वाटपावरून सुरुवातीलाच भांडणे झाली, मग वीज बील थकले आणि जेमतेम चार वर्षे चालून योजनेने राम म्हटला. गेली दहा वर्षे योजना बंद; मग शिवतक्रार म्हाळुंगी, निमगाव-म्हाळुंगी या जवळच असलेल्या गावातील ग्रामायनचा योजना–पुनरुज्जीवन प्रयोग कोरेगाव–भीवरच्या शेतकऱ्यांच्या कानावर गेला. त्यांनीही उचल खाल्ली व गेले वर्षभर खपून त्यांनी आपलीही बंद पडलेली योजना पुन्हा सुरू केली आहे. पाणी अद्याप सगळ्या शेतांत पोचलेही नाही. चर खणणे चालू आहे; पण गावकऱ्यांना दुष्काळाची आता भीती वाटत नाही. उलट अवतीभवती दुष्काळी वातावरण असले तरी या पुनर्घटित–पुनरुज्जीवित उपसा जलसिंचन योजनेचा उद्घाटन सोहोळा साजरा करण्याचे त्यांनी ठरवले व थाटामाटात, परवाच्या १७ तारखेला हा कार्यक्रम पारही पाडला. पुण्याहून बरेच लोक या कार्यक्रमासाठी आले होते. उद्घाटक होते महाराष्ट्र बँकेचे अध्यक्ष डॉ. वसंतराव पटवर्धन. या भागातील ग्रामायनच्या विविध उपक्रमांना महाराष्ट्र बँकेची पहिल्यापासून साथ असल्याने डॉ. पटवर्धन यांच्या येण्याला विशेष महत्त्व होते, औचित्य होते.

**पारधी वस्ती**

अशीच एक शिवतक्रार–निमगाव जवळची पारधी वस्ती. सरकारी जमीन वाटप कार्यक्रमात या पारध्याना वीस एकर ओढ्याकाठची जमीन मिळाली. ओढ्याला किमान आठ महिने पाणी. एखाद्या उद्योगी शेतकऱ्याने जमिनीतून सोने काढले असते; पण जमीन मिळून दहा वर्षे उलटली तरी या वीस एकरांवरचे एक ढेकूळही इकडचे तिकडे हलले नाही. पारधी मंडळी ग्रामायन कार्यकर्त्यांना भेटली. जुन्या बेकायदा व्यवसायाला कंटाळली आहेत. ही ओढ्याकाठची वीस एकर जमीन लागवडीला आणली गेली तर आसपासच्या किती जणाना रोजगार पुरवता येईल? असे बेवारशी तुकडे, उघडेबोडके डोंगर, उजाड माळराने ठिकठिकाणी पसरलेली आहेत. सरकारी योजना आहेत. बँकाजवळ पैसा आहे. आसपास शोध घेतला तर पाण्याची काही तरी सोय, अगदी या दुष्काळग्रस्त भागातही इथेतिथे, जवळ-लांब असतेच. मग का दुष्काळ हटत नाही? माणसे का रस्त्यावर कामाला येतात? रस्त्यावरून मग शहरातील एखाद्या झोपडपट्टीत?......

योजकस्तत्र दुर्लभ:

योजना ढिगभर आहेत. योजक नाहीत.

—श्री. ग. मा.

# सप्रेम नमस्कार....

◻ आपल्या ता. ९ ऑक्टोबरच्या अंकात, विज्ञानेश्वरी या सदरात डॉ दत्तप्रसाद दाभोळकरांनी दह्याच्या प्रचारासंबंधी बरीच नवी माहिती दिली आहे. तरी सुद्धा, विज्ञानाच्या प्रातात छोटीशीसुद्धा अविश्वसनीय माहिती असू नये म्हणून हा खुलासा.

अमेरिकेतील दह्याच्या प्रचाराबाबत, १९५० साली अमेरिकेला दही हा प्रकार अजिबात माहीत नव्हता व अमेरिकेत दही लागावयास सुरुवात झाली ती १९६५ नंतर, असा उल्लेख दाभोळकरांनी केला आहे. अमेरिकेत आज दह्याचे बस्तान खूपच वाढले आहे, म्हणजेच तिकडे दही खरोखर चांगलेच मुरले आहे; पण पंचवीस वर्षांपूर्वीसुद्धा तिकडे दही ही नाविन्याची गोष्ट नव्हती. जेवण्याखाण्याचे पदार्थ अमेरिकेत Supermarkets व Delicatessen यांत प्रामुख्याने मिळतात. प्रत्येक गावात (याला अपवाद नसावा) ही सुपरमार्केट्स् होती व आहेत यॉगर्ट Yogurt या नावाखाली जवळजवळ सर्व सुपरमार्केटमध्ये गेली कमीत कमी पंचवीस वर्षे दही नियमित विकले जात आहे. आपल्याकडे आइस्क्रीम जाड कागदाच्या पेल्यातून मिळते तसल्याच बंद पेल्यातून ते विकले जाई. आजही तसेच दही मिळते. जाड कागदाऐवजी प्लास्टिकचे पेले आले आहेत.

पंचवीस-तीस वर्षांपूर्वी यॉगर्टचे दोन-तीनच प्रकार अमेरिकेत प्रचारात होते. आपण खातो तसले साधे पांढरे आंबट दही, थोडे गोडे दही असे प्रकार असत. आता Raspberry, Lemon, Strawberry, Gooseberry, Orange वगैरे निरनिराळ्या Flavours चे दही मिळते. काही कंपन्या आइस्क्रीमला जशी Flavour देतात, तशी Flavour दिलेले दही विकतात, तर काही कंपन्या जो Flavour असेल त्याचा निम्मा-एक भाग वरती व बाकी पांढरे दही असे भरलेले पेले विकतात.

भारतातही आता हळूहळू (अशा) दह्याचा प्रसार होऊ लागेल असे वाटते.

१३ सप्टेंबर सर्वोत्तम ठाकूर, रत्नागिरी

◻ ९ ऑक्टोबरचा 'माणूस' आत्ता सायंकाळी मिळाला

सदानंद रेगे वरील वि. ग. कानिटकर याचा लेख फार आवडला.

लेख स्नेहाने भिजलेला आहे, मऊ कोवळा आहे. पण लिबलिबीत नाही.

६ ऑक्टोबर स. शि. भावे, पुणे ◻

## मुक्काम कोरेगावभिवर

# घटस्थापनेचा दिवस

कोरेगाव भिवर हे दुष्काळी भागातलं इतर अनेक गावांसारखं गाव. या गावाने पूर्वी बंद पडलेली लिफ्ट इरिगेशन योजना नव्याने सुरू केली व आपलं वेगळेपण दाखवलं. १७ ऑक्टोबर रोजी 'भीमा शंकर पाणी पुरवठा सहकारी मंडळी' ची लिफ्ट बँक ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. वसंतराव पटवर्धन याचे शुभहस्ते सुरू करण्याचा समारंभ पुण्याच्या 'ग्रामायन' ने आयोजित केला होता आणि कोरेगाव भिवरच्या इतिहासातील हा सुवर्णक्षण होता !

दौंड तालुक्यातल्या राहू गावापासून पाच किलोमीटरवर, भीमानदीच्या काठावरच्या कोरेगाव भिवरमध्ये १९६८ मध्ये कुठल्याशा एका धडकयोजनेत ही लिफ्ट गावाला शासनातर्फे बांधून मिळाली. राज्यभर अशा एक हजारावर लिफ्ट योजना तयार केल्या गेल्या त्यातली ही एक. या सर्व योजनांना भूविकास बँकेकडून अगर थेट शासनाकडून कर्जपुरवठा झाला. कोट्यवधी रुपये गुंतवले गेले; पण दोनचार हंगाम पाणीपुरवठा झाला न झाला आणि या लिफ्टस् एकामागोमाग एक बंद पडल्या. जसा साथीचा रोग यावा आणि गुरं मरावी तशा ! कोरेगाव भिवरची लिफ्ट १९७२ मध्ये ठप्प झाली. वीज वेळेवर न मिळणं, मिळाली तर लोकांनी विजेची बिलं न भरणं, दुरुस्तीसाठी मेकॅनिक न मिळणं, पाणी वापरून पिकं घेण्यासाठी कर्जपुरवठा न लाभणं, तू आधी पाणी घ्यायचं की मी-इथपासून ते वरल्या भागाला खालच्या भागाच्या आधी पाणी कसं जातं ते 'पघतोच !' अशी आपापसात दादागिरी होणं, एकूणच लिफ्टचं व्यवस्थापन नीट न होणं आणि या सगळ्याचं पर्यवसान लिफ्टचं थडगं बनण्यात होण्यापलीकडे काहीही झालं नाही !

या लिफ्ट नुसत्या बंद झाल्या नाहीत -लोकांच्या डोक्यावर कर्जाचा प्रचंड बोजा झालाय. ज्या पाच-पन्नास जणांची शेतं लिफ्टखाली भिजत होती किंवा भिजणार होती त्या प्रत्येकावर या लिफ्टवर केलेल्या गुंतवणुकीचा बोजा वाटून दिला होता. थकलेल्या कर्जावर व्याजंही चढत होती. विजेच्या बिलावर दंडाची आकारणी होत होती ! कोरेगाव भिवरला विजेचं बिल १६०० वरून चढत चढत ४२००० रु. वर गेलं होतं. दुसऱ्या एका लिफ्टवर तर ते एक लाखावर गेलं होतं.

नुसता पैसा ओतून आणि तंत्रज्ञान वापरून ग्रामीण विकास होत नसतो. उपलब्ध साधनसामग्रीचा संबंधित लोकांनी योग्य प्रकारे वापर करण्यासाठी संघटित होणं महत्त्वाचं आहे. भीमानदी वाहते आहे, दुष्काळी भागातल्या काठावरच्या शेतकऱ्यांची ती जीवनदात्री आहे. नदीतून पाणी उचलण्यासाठी सरकारने पैसा पुरवला, विजेचे खांब आले. लिफ्टची जुळणी झाली, पाणी येऊ लागलं. पण ज्यांच्यासाठी लिफ्ट आहे त्यांची-माणसाची जुळणी झाली नाही म्हणून लिफ्ट बंद पडणं ओघानं आलं. ग्रामायननं नेमकं हेच ओळखलं. १९७८ मध्ये ग्रामायनचा पहिला पूर्ण वेळ कार्यकर्ता नामदेव माळी याने शिवतक्रार-म्हाळुंगी येथे जाऊन, लोकांमध्ये राहून, मिळून-मिसळून, अडचणी समजावून घेऊन, कर्जाचे व वीजबिलाचे तपशील समजून घेऊन कामाचे गिरमिट सुरू केले. भूविकास बँकेच्या जप्त्यांनी घायकुतीला आलेल्या शेतकऱ्यांना ही लिफ्ट सुरू होईल असं कधीच वाटलं नव्हतं; पण नामदेवने गावच्या तरुण मुलामध्ये उत्साहाचा झरा जागवला, बँकपातळीवरच्या व शासकीय पातळीवरच्या अडचणींतून मार्ग काढला. आणि शिवतक्रारची लिफ्ट ग्रामायननं १९७८ मध्ये पुन्हा सुरू करून दिली. एक लिफ्ट, एक कार्यकर्ता अशी व्यवस्था निर्माण करून या दुष्काळी भागातल्या लिफ्ट एकामागून एक सुरू करायची ग्रामायनची जिद्द

आहे. कोरेगाव भिवरची ही अशी तिसरी लिफ्ट १७ ऑक्टोबरला सुरू झाली त्या वेळी गावात आनंदाचं अमाप भरतं आलं होतं.

डॉ. पटवर्धनानी बटन दाबून लिफ्ट औपचारिकरीत्या सुरू केल्यानंतर गावात सभा सुरू झाली. सहाशे एकरांना पाणी मिळणार आणि साठ शेतकरी त्याचा लाभ घेणार, या वाक्याचा अर्थ त्या लिफ्ट-खालचे शेतकरी झाल्याखेरीज कळणार नाही, असा चेहेऱ्यावर भाव असलेल्या मुंडासे-टोप्या सभामंडपात गर्दी करून होत्या. ढोल-लेझिमांच्या दुमदुमत्या-खळखळत्या आवाजात डॉ. पटवर्धन, ग्रामायनचे अध्यक्ष डॉ. वसंतराव देशपांडे, 'माणूस'चे श्री. ग. माजगावकर 'स्नेहसेवा'चे श्री. प. दि. सोहोनी इत्यादी मातब्बर मंडळींना सभा-स्थानी गुलाल उधळत आणलं. गाणारा लाउडस्पीकर बंद झाला आणि "वक्त्याचं म्हनन काय हाये" हे ऐकायला उपस्थित शेतकरी कानात प्राण आणून ऐकू लागले!

झकास झब्बा घातलेले तरतरीत नाकाचे तरुण शेतकरी सरपंच बबन केरु काळे बोलू लागले, "जिकडं पहावं तिकडं अडचणी-शिवाय दुसरं काही नाही, सर्वत्र अंधार होता. आजचा प्रकाशाचा दिवस उजाडेल असं कधी वाटलंच नव्हतं. पाणी खेचणारे पंप मोडलेले, वायरी तुटलेल्या, पपहाउसचे पत्रे गंजलेले. सरकारने पैसा दिला, तंत्र दिलं; पण थकबाकीचा डोंगर वाढणं आणि दुष्का-

मलपृष्ठ १ वर


दिवाळीइतकाच अपरिहार्य अंक !

# अक्षर

दिवाळी १९८२ : मूल्य १२ रुपये

विशेष : विविध क्षेत्रातल्या महत्त्वाच्या कलाकृतींच्या जडणघडणीची कथा

☐ निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी : ह. मो. मराठे ☐ होय, मी नानाला नाचवलं ! : कृष्णदेव मुळगुंद ☐ गांधी, दिनांक ... रोहिणी हट्टंगडी ☐ शब्दरंजन ते कालनिर्णय : जयंत साळगावकर ☐ लाखाची गोष्ट : वसंत सोपारकर ☐ बोलकी अक्षरं : कमल शेडगे ☐ झपाटलेली झाडं : अनिल अवचट.

लेख :

☐ यशवंतराव आणि मी : गोविंद तळवलकर ☐ सरकार कोसळताना : माधव गडकरी ☐ स्वा. सावरकर : एक शोकांतिका किशोर बेडकिहाळ ☐ एका बातमीपायी . विनय हर्डीकर ☐ तबलासम्राट जाकीर हुसेन . विवेक जोशी ☐ रोवांची शिल्प मेघनाद कुलकर्णी ☐ सौंदर्यसाधना : प्राचीन ते अर्वाचीन : मीना कर्णिक ☐ मंत्र्यांनी निवृत्तीनंतर . द्वारकानाथ संझगिरी ☐ युद्धभूमीतली अनोखी पत्रं ☐ कॅन्सरचा किडा : डॉ. आनंद नाडकर्णी ☐ सदानंद रेगेंची कविता : डॉ. मंगला आठलेकर.

ललित :

☐ प्रभाकर पाध्ये ☐ शांता शेळके ☐ केशव मेश्राम ☐ विद्याधर पुंडलीक

कथा :

☐ अमृता प्रितम ☐ अरविंद गोखले ☐ ज्योत्स्ना देवधर ☐ श्री. ज. जोशी
☐ रत्नाकर पटवर्धन ☐ अशोक डांगे ☐ आनंद केतकर आणि रत्नाकर मतकरी यांची चक्रावणारी सत्यकथा

शिवाय :

☐ शाहीर साबळे, पार्थ पोळके आणि वाचकाचं अभिनव आत्मकथन ☐ मराठी साहित्यिकांचं विश्व बदलून टाकणाऱ्या कॅसेटची कहाणी : सहभाग ✱ व्यंकटेश माडगूळकर ✱ द. मा. मिरासदार ✱ सुरेश भट ✱ शंकर पाटील आणि स्वत. निर्माते अलूरकर.
☐ नाविन्यपूर्ण व्यंगचित्रे ☐ अभिनव सजावट ☐ पृष्ठे दोनशे ☐ चार रंगी मुखपृष्ठ

संपादक : निखिल वागळे

पत्ता : २/४६ ओम त्रिमूर्ती को-ऑप हाउ. सोसायटी, सायन ट्रॉम्बे रोड, चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२

एजंटांनी मागणी त्वरित नोंदवावी    प्रसिद्धी : नोव्हेंबर पहिला आठवडा

कामगार वृत्त

# कंपनी तोट्यात : मग अनावश्यक खर्च कशाला ?

ठाणे येथील 'बोरिंगर नॉल लिमिटेड' या कंपनीच्या व्यवस्थापकांनी राज्यशासनाकडे कामगारकपात करण्यास परवानगी मागितल्याने येथील कामगार अतिशय हवाल दिल झाले आहेत. याच वेळी येथे काम करत असणाऱ्या बोरिंगर नॉल एम्लॉईज युनियनने कंपनीच्या ऱ्हासाला कंपनीचा अकार्यक्षम व भ्रष्टाचारी कारभारच जबाबदार असल्याचे घोषित करून त्याबाबतचे ३४ पानी निवेदन महाराष्ट्र सरकारला सादर केले असून ही कामगारकपात टाळावी असे आवाहन केले आहे.

बोरिंगर नॉल लिमिटेड या कंपनीचा मुख्य कारखाना ठाणे कोलशेत येथे असून त्यात ४५० कामगार काम करतात. या कंपनीचे मुख्य कार्यालय मुंबई व्ही. टी. येथील फिरोजशहा मेहता रोडला आहे. त्याप्रमाणे या कंपनीची मुंबई, कलकत्ता, दिल्ली आणि मद्रास येथे प्रादेशिक कार्यालये आहेत. सर्व ठिकाणी मिळून एकूण ७५० कामगार काम करतात.

१९५९ साली ही कंपनी जर्मन कंपनीच्या सहाय्याने सुरू झाली. जीवनावश्यक औषधे व रसायने बनविणारी ही कंपनी अल्प काळातच नावलौकिकाला आली. १९७५ साली ही कंपनी पब्लिक लिमिटेड झाली. या कंपनीचा व्याप दिवसेंदिवस वाढत होता.

कंपनीची अशा प्रकारची परिस्थिती असताना दि. ३० ऑगस्ट १९८२ रोजी कंपनीने, एका नोटिशीद्वारे महाराष्ट्र सरकारकडे कामगारकपात करण्यास परवानगी मागितली आहे. कामगारकपातीचे कारण सांगताना कंपनीने म्हटले आहे की, १९८१-८२ या वर्षात कंपनीला १०९ लाख रुपये तोटा झाला आहे व या वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यात कंपनीला ३१ लाख रुपये तोटा झाला आहे.

या आर्थिक तोट्याबरोबरच आणखी एक कारण कंपनीने पुढे केले आहे. ही कंपनी क्लोरोकेमिकल बनवते. आशियामध्ये या बाबतीत या कंपनीचा वरचा नंबर आहे या पूर्वी ही कंपनी ३० टन क्लोरोकेमिकल बनवत असे. सरकारकडून तेवढाच परवाना कंपनीला मिळाला होता. पण वाढत्या मागणीमुळे १९७९ साली केन्द्रात जनता सरकार असताना कंपनीने ६० टन क्लोरोकेमिकल बनविण्याबाबत सरकारकडून परवानगी घेतली. परवानगी मिळाल्यानंतर जून ते ऑक्टोबर ८१ पर्यंत कंपनीने दरमहा ५ टन प्रमाणे क्लोरोकेमिकल बनविलेही ! पण आता कामगारकपातीचे कारण सांगताना कंपनी म्हणते की, ६० टन क्लोरोकेमिकल बनविणे किफायतशीर ठरत नसल्याने आम्ही आता ते ३६ टन बनविणार आहोत. त्यानुसार १९ डिसें. १९८१ पासून कंपनीने क्लोरोकेमिकल बनविणे बंद केले आहे.

त्याचप्रमाणे स्कीला आणि एर्फाड्रिन्स हैड्रोक्लोराइड ही दोन उत्पादने जी कंपनी पूर्वी बनवत असे त्याना बाजार नसल्याने ही उत्पादने बनविण्याचे कंपनीने बंद केले आहे.

आर्थिक तोट्याचे कारण सांगताना कंपनीने फायद्याची काही आकडेवारी दिली आहे, त्यानुसार कंपनी म्हणते की, १९७६-७७ साली कंपनीला ७२ लाख रुपये नफा झाला होता; पण हे नफ्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत गेले आणि १९८०-८१ साली फक्त १९ लाख रुपयेच नफा झाला. १९८१-८२ या वर्षी तर तोटाच झाला आहे व याही वर्षी तीच परिस्थिती आहे.

कंपनीची सद्य.परिस्थिती वरीलप्रमाणे असल्याने ५७ कामगाराना, १२ मेडिकल रिप्रझेन्टेटिव्हना, १३ सुपरवायझर्सना आणि २० मॅनेजमेंट स्टाफला कामावरून कमी करण्याबाबत परवानगी देण्यात यावी असा अर्ज कंपनीने राज्यसरकारकडे केला आहे.

कंपनीने दिलेली कारणे वरदर्शनी बरोबर वाटत असली तरी आतमध्ये काही तरी गोडबंगाल असल्याचं जाणवतं ! या पाठीमागील कारणे जर तपासून पाहिली तर सूडबुद्धीने कंपनी पेटून तर उठली नाही ना अशी दाट शंका कामगाराना येते.

या कंपनीत १९७२ सालापासून 'बोरिंगर नॉल एम्प्लॉईज युनियन' नावाची कामगाराची अंतर्गत कामगारसंघटना आहे. कामगारसंघटनेमध्ये जे प्रतिनिधी पूर्वी काम करीत होते ते व्यवस्थापकाशी लागेबांधे राखून आहेत हे जेव्हा कामगाराना उमगलं त्या वेळी कामगारानी युनियनवर अविश्वासाचा ठराव मांडला. बहुसंख्य कामगारांनी त्याला पाठिंबा दिल्याने २४ ऑक्टोबर १९८१ पूर्वीची कमिटी जाऊन त्या जागी नवीन कमिटी आली. ही नवीन कमिटी व्यवस्थापकांना आपले कार्य करण्यात अडथळा वाटू लागली. नवीन कमिटीतील लोक उत्साही आणि धडाडीचे असल्याने त्यानी कंपनीतील एक एक गुपित शोधून काढण्यास सुरुवात केली. हे करत असताना त्याना आढळून आल की, इथं सर्वत्र भ्रष्टाचारच फोफावला आहे. सर्वत्र मन मानेल तसा कारभार आहे. या विषयावर कमिटी मेंबर्सनी सखोल पराक्षण करून एक सविस्तर निवेदन बनविले. या निवेदनात त्यानी असे म्हटले होते की, येथील भ्रष्टाचारा व अकार्यक्षम कारभारामुळे कंपनीचा नफा प्रतिवर्षी घटतो आहे. त्याचा कंपनीच्या धंद्यावर व नावलौकिकावर विपरीत परिणाम होतो आहे. यथ ढिलेबाजी आणि मनमानी कारभाराने कळस गाठला आहे. अशा परिस्थितीत कंपनीला या महाभागापासून वाचवा ! अशा इशाऱ्याचे, ५१४ कामगाराच्या स्वाक्षऱ्या असलेले एक निवेदन कमिटीने जर्मनीतील उच्च अधिकाऱ्याना पाठवले.

या निवेदनाचा जर्मनीतील अधिकाऱ्यावर थोडाबहुत परिणाम झाल्याने त्यानी आठ जर्मन अधिकाऱ्याची एक चौकशी समिती फेब्रुवारी १९८२ मध्ये मुंबईला धाडली. या

समितीने सहा आठवडे परिस्थितीची सखोल पाहणी केली. त्यामुळेच कित्येक उच्च पदस्थानी आणि उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे लागलीच राजीनामे दिले !

कमिटीने स्वाक्षऱ्या करून पाठवलेल्या एका निवेदनाने येथील अधिकाऱ्यांची पाचावर धारण बसली; पण यापूर्वीही येथील युनियनने व्यवस्थापकांच्या कारभाराविरुद्ध औद्योगिक न्यायालयात धाव घेतली होती. कामगारकपातीच्या दृष्टिकोनातून ही बाब अतिशय महत्त्वपूर्ण अशी आहे.

या कंपनीत १५० ते २०० कामगार कित्येक वर्षांपासून हंगामी कामगार (टॅपररी कामगार) म्हणून काम करीत होते. त्यांना कायद्याच्या इतर कोणत्याही सोयी मिळत नव्हत्या. फक्त महिन्याला ३५० रुपये पगार मिळत असे. कित्येक वर्षे काम करूनदेखील कंपनी आपणाला कायम करीत नाही म्हणून येथील कामगारांनी औद्योगिक न्यायालयात धाव घेतली. त्याची सुनावणी होऊन ९ सप्टें. ८१ रोजी ताडदेव येथील औद्योगिक न्यायालयाने याबाबतीत महत्त्वपूर्ण निकाल दिला. निकालात न्यायालयाने सांगितले की, हंगामी कामगारांना ज्येष्ठतेनुसार कंपनीने कायम करावे व त्यांची ज्येष्ठतायादी लागलीच तयार करावी.

न्यायालयाच्या अशाव निर्णयाने कंपनी कोंडयात पडली. हंगामी कामगाराना कायम करावयाचे झाल्यास त्यांना ३५० वरून ९५० रुपये पगार आणि इतर सोयी-सवलती द्याव्या लागणार. कंपनीला हे करणे नको तेही म्हणून ज्येष्ठतायादीप्रमाणे भरती न करता कंपनीने ९० दिवसांच्या मुदतीवर कामगारांची नवीन भरती करणे चालू केले. हंगामी कामगार यामुळे संतापून उठले. न्यायालयाच्या निर्णयाचा कंपनी उघडउघड अवमान करून कामगारविरोधी भूमिका घेत आहे म्हणून २४ डिसें. १९८१ रोजी येथील हंगामी कामगार आपल्या मागणीसाठी संपावर गेले. हा असंतोष जास्त वाढू नये म्हणून कंपनीने न्यायालयाच्या निर्णयानुसार लागलीच १८ हंगामी कामगाराना कायम केले; पण संपाचा मोका साधून कंपनीने हंगामी कामगारांना पुन्हा कामावर घेण्यास नकार दिला. डिसेंबर ८१ पासून कंपनीने एकाही कामगाराला मग कामावर घेतले नाही !

## अनावश्यक खर्च

हंगामी कामगारांप्रमाणेच आणखी एका प्रश्नाने येथील कामगारांना मध्यंतरी ग्रासले होते. व्यवस्थापकांचीच ती कृती होती. २६ डिसें. १९८१ रोजी युनियनची जुनी कमिटी जाऊन त्या जागी नवीन कमिटी आल्यानंतर कंपनीने आपल्या कंपनीतील कायम स्वरूपाचे काम बाहेरच्या कंत्राटदारांना देण्यास सुरुवात केली. पक्का माल बनविण्यासाठी कंपनीने जळगाव येथील अजंठा फॉर्मोसेटिकल या कंपनीला कंत्राटपद्धतीवर आपल्याकडील कच्चा माल दिला. आपल्या कंपनीतील कायम स्वरूपाचे काम बाहेर जात आहे म्हणून कामगारांनी त्या वेळी ट्रकला घेराव घातला. या वेळी युनियनचे अध्यक्ष डी. एम्. शेळके आणि उपाध्यक्ष वाय. के. भरत यांना अटक झाली. कायम स्वरूपाचे काम बाहेर जात असल्याने कामगारकपातीचे किंवा टाळेबंदीचे संकट येईल व त्यापासून आम्हाला वाचवावे अशी तक्रार युनियनने लागलीच २८ डिसेंबर १९८१ रोजी औद्योगिक न्यायालयात नोंदवली. न्यायालयाने कंपनीला बोलावले. ७ जाने. १९८२ रोजी कंपनीने न्यायालयाला उत्तर दिले की, टाळेबंदीचा आमचा कोणताही विचार नाही.

जानेवारीमध्ये टाळेबंदी करणार नाही असे सांगणाऱ्या कंपनीने १ मार्च ८२ पासून टाळेबंदी अंमलात येईल अशी नोटीस दिली. युनियन न्यायालयाकडे धावली. चर्चेअंती असे ठरले की, उत्पादनासाठी लागणारे सर्व पूरक घटक कंपनी पुरवेल व त्याप्रमाणे कामगार काम करतील. याप्रमाणे मार्च ते जूनपर्यंत कामगारानी १०० टक्के उत्पादन दिल्याने १७ जून १९८२ रोजी कंपनीने टाळेबंदीची नोटीस मागे घेतली.

हंगामी कामगारांच्या बाबतीत, टाळेबंदीच्या बाबतीत अशा दोन्हीही वेळी युनियनने आपणास जोरदार टक्कर देऊन हरविले. आता शेवटचा पर्याय कामगारकपातीचा ! याचसाठी कंपनी राज्यसरकारडे धावली.

कामगारकपात करण्यासाठी कंपनी राज्यसरकारकडे धावली असली तरी अंतर्गत युनियननेही तेवढाच आक्रमक पवित्रा घेतला आहे. व्यवस्थापनाची ही कृती राज्यसरकारने हाणून पाडावी म्हणून ३४ पानांचे निवेदन युनियनने सरकारला सादर केले आहे. त्यात युनियनने म्हटले आहे की, कंपनीतील अधिकाऱ्यांच्या तैनातीवर लाखो रुपयांचा अनावश्यक पैसा खर्च होतो. येथील अधिकाऱ्यांना आणि त्यांच्या नातेवाइकांना ऑटोमेटिक कार्स आहेत, राहण्यास फ्लॅट्स आहेत. अधिकाऱ्यांची मुले शिक्षणासाठी परदेशात जातात. त्यांना विमानाचा मोफत पास आहे. या सर्वांवर होणारा खर्च कंपनी सोसते. लाखो रुपयांचा खर्च या बाबींवर होतो. कामगारकपात होण्यापेक्षा या गोष्टींवर होणारा अनावश्यक खर्च कंपनीने कमी करावा अशी सूचना युनियनने केली आहे.

या कंपनीने मालकी तत्त्वावर एक जागा वरळी येथे १९७८–७९ साली आपल्या मुख्य ऑफिस कार्यालयासाठी घेतली आहे. ही जागा कंपनीने २८ लाख रुपयांना घेतली व त्यावर अंतर्गत सजावटीसाठी २२ लाख रुपये खर्च केले. आज ही जागा पडून आहे. ही गुंतवणूक पडून असल्याने कंपनीने कामगारकपात करण्यापेक्षा ही जागा निकालात काढावी असे युनियनचे म्हणणे आहे.

त्याचप्रमाणे येथील कायम स्वरूपाचे काम कंत्राटदारांना देऊ नये. क्लोरोफेनिकल पावडर कंपनी स्वतः बनवू शकत असताना कंपनीने हा विभाग बंद केला आहे आज ही पावडर कंपनी जादा पैसे देऊन बाहेरून खरेदी करते. हे थांबवून हे काम येथेच व्हावे व हा अनावश्यक खर्च थांबवावा असे युनियनचे म्हणणे आहे.

थोडक्यात म्हणजे महाराष्ट्र सरकारने कंपनीची ही कामगारद्रोही मागणी मान्य करू नये व येथील भ्रष्टाचारी व अकार्यक्षम कारभाराची कसून चौकशी करावी अशी विनंती युनियनने केली आहे. हल्लीच्या या महागाईच्या दिवसांत या १०२ कुटुंबियांनी जावे कुठे, खावे काय हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. सरकारने म्हणूनच या कामी पुढाकार घेऊन कंपनीची ही कामगारकपातीची मागणी फेटाळावी अशी युनियनची विनंती आहे. सरकार दोन महिन्यांतच आपला निर्णय कळवेल. तो निर्णय कामगारांच्या बाजूचा असावा हीच आशा धरून १०२ कामगार काम करीत आहेत काय होते हे पुढील महिन्याच्या सुरुवातीला समजेलच !

—मोहन शं. कुलकर्णी

# दिल्ली विद्यापीठ निवडणुका राजकारणाचे वाढते प्रमाण

सुनीता तपस्वी

दिल्ली विश्व विद्यालय छात्रसंघाच्या (DUSU) निवडणुका नुकत्याच आटोपल्या. त्या निवडणुकीत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) व जनता विद्यार्थी मोर्चा (JVM) या संयुक्त आघाडीनं सर्व जागा प्रचंड मतांनी जिंकल्या. ABVP चा हा लागोपाठ चौथा विजय आहे.

नेहमीप्रमाणे यंदाही खरा मुकाबला ABVP व JVM आघाडी आणि नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (NSUI) यातच होता. अध्यक्षस्थानी निवडून आलेले श्री. योगेश शर्मांनी ९१९६ मतं मिळवली तर त्यांच्या नजीकचे प्रतिस्पर्धी NSUI चे श्री. करनसिंग यांना ४६८१ मते पडली. उपाध्यक्षपदी श्री. सतीशकुमारांनी ७७५२ मते तर NSUI च्या सुश्री. सीमा सैनीला ५५८५ मते पडली. सचिवपदासाठी श्री. रवींद्रपाल सिंगला ८७६० मते पडली, तर त्यांच्या प्रतिद्वंद्वी श्री. पवनकुमार त्यांना फक्त ३७३ मते पडली आणि सर्वांत जास्त कमाल केली ती संयुक्त सचिवपदासाठी उभी असलेली सुश्री अंजू मल्होत्री हिनं. तिला सर्वाधिक १०,०३६ मते पडली व तिच्या प्रतिस्पर्धी श्री. राजीव वर्माला २९५९ मते पडली.

एकूण ५६००० मतदारांपैकी २३००० मतदारांनी आपल्या मतांचा उपयोग केला. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या सर्व संघटनांना राजकीय पक्षाचा यथेच्छ पाठिंबा मिळतो. NSUI ला काँग्रेस (आय) चे समर्थन आहे, तर JVM ही भारतीय जनता पार्टी (भाजपा) समर्थित संघटना आहे, आणि ABVP मध्ये रा. स्व. संघाच्या विचाराचे लोक बहुसंख्य आहेत.

DUSU च्या निवडणुका आता राष्ट्रीय सार्वत्रिक निवडणुकांचं प्रतिबिंब बनत चालल्या आहेत. विद्यार्थीसंघाच्या निवडणुकात प्रत्येक पक्ष आपआपल्या पुढाऱ्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून असतो हयाचे प्रत्यंतर उत्तरोत्तर जास्त जाणवते. या निवडणुकांची इतकी धमाल असते की, आपल्याला सार्वत्रिक निवडणुकांचाच भास होतो कारण ह्यात पैसा, बळ, भित्तिपत्रके, प्रचारतंत्र इत्यादींचा वापर त्याच प्रमाणात होतो व म्हणूनच क्षणभर, विद्यार्थीसंघाच्या व सार्वत्रिक निवडणुकांमध्ये फरक करताना गोंधळ होतो. या निवडणुकांची सर्वाधिक झळ बसते ती दिल्ली परिवाहनच्या बसेसना. बसेसची इतकी दयनीय अवस्था होते की, बिचाऱ्या आतून-बाहेरून, पुढून-मागून सगळीकडून 'वोट फॉर ...' च्या काळ्या अक्षरात अगदी रंगवल्या जातात. दिल्लीतील प्रमुख रस्त्यांवरच्या भिंती पोस्टर्सनी मढवल्या जातात. या निवडणुका म्हणजे पक्षाच्या अस्तित्वापेक्षा प्रतिष्ठेच्या अधिक असतात.

अशा या निवडणुका दरवर्षी DUSU तर्फे घेण्यात येतात. दिल्ली विश्वविद्यालयातील एकूण ६४ कॉलेजांपैकी ४६ कॉलेजस् ह्या संघाची सदस्य आहेत. इतर १८ पैकी बहुतांश महिला कॉलेजांनी संघाचे सदस्य बनायचे नाकारले आहे. आज ह्या संघाच्या स्थापनेला ११ वर्षे पूर्ण झालीत.

दिल्ली निवडणुकांमध्ये जसे भाजपाचे किंवा पूर्वाश्रमीच्या जनसंघाचे वर्चस्व आहे तसेच विश्वविद्यालयाच्या निवडणुकांमध्ये अभाविपचे खूपच वर्चस्व आहे. म्हणूनच की काय, एका वृत्तपत्रानं निवडणुकांवर भाष्य करताना लिहिलं होतं की, सरकार निवडणूक निकालामुळं इतकं हादरलय की, त्यान दिल्ली महानगर परिषद व महानगर पालिकांमध्ये पराभव होईल या धास्तीनं या दोन प्रातिनिधिक संस्थांच्या निवडणुका सारख्या पुढे पुढे ढकलल्या जात आहेत.

तसं पाहिलं तर DUSU स्थापनेच्या सुरुवातीच्या काळात आज जाणवतो तितका राजकीय हस्तक्षेप नव्हता. दरम्यान एका वर्षी दिल्लीतील सर्व प्रातिनिधिक संस्थावर जनसंघाचा दणदणीत विजय झाला! काँग्रेसश्रेष्ठी त्यामुळे बरेच अस्वस्थ होते. तशातच आरोप-प्रत्यारोपांना व कट-कारस्थानांना ऊत आला आणि अशाच एका कटाचा बळी पडला अभाविपचा एक उच्च पदाधिकारी. विद्यापीठ परिसरात हिंसा व अराजक माजवण्याच्या आरोपाखाली व इतर पुरावे उभे करून त्यास अटक करण्यात आली व शिक्षा म्हणून त्याला ६ वर्षांसाठी रस्टिकेट करण्यात आलं. सूडबुद्धीनं घेतलेल्या ह्या निर्णयामुळं विद्यार्थीवर्गात व ABVP मध्ये चांगलाच असंतोष निर्माण झाला. अभाविपने ह्या प्रकारातला अन्याय दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाचा निकाल विद्यार्थ्यांच्या बाजूनं लागला.

तरी त्या घटनेनं व्हायचा तो परिणाम झालाच. विद्यार्थी सघटना सरळ राजकीय पक्षांच्या आहारी गेल्या. NSUI ला प्रत्युत्तर म्हणून स्थापना झाली JVM ची. ठोश्यास ठोसा ही प्रवृत्ती राजकीय पुढाऱ्यांनी विद्यार्थी संघटनामध्ये निर्माण केली आणि मग सुरू झाला पैशांचा सुळसुळाट आणि चढओढीचे तग वातावरण. मग दिसू लागली आर्थिकदृष्ट्या एकमेकांवर मात करण्यासाठी मिळेल ती साधनं वापरायची चुरस. वैचारिक आधाराला बगल देऊन लढा सुरू झाला तो— छोट्या पोस्टर्स विरुद्ध मोठे, मोठ्या विरुद्ध रंगीत, वॉकी टॉकी विरुद्ध जीप्स वगैरे-वगैरेंचा. राजकीय पक्षाचा पगडा दिवसेंदिवस वाढतच आहे. आजच विद्यार्थी संघाच्या निवडणुका म्हणजे राजकीय पक्षांच्या निवडणुका वाटू लागल्या आहेत. उद्या तसे खुल्लम खुल्ला होईल!

### उदासीनतेचे प्रमाण

सार्वत्रिक निवडणुकांबाबत सर्वसाधारण जनता जशी उदासीन होत चालली आहे तीच परिस्थिती आज सर्वसाधारण विद्यार्थ्यांची झाली आहे. आधी दिले त्या आकड्यावरून लक्षात येतं की, यंदाच्या Dusu निवडणुकात ४१ टक्के मतदान झाले. असं असलं तरी ज्याना निवडणुकीमध्ये मनापासून आस्था असते असे विद्यार्थी २० टक्केच असतात. ह्याचा अर्थ दर पाचातला एकच विद्यार्थी ह्या निवडणुकीच्या बाबतीत आस्था बाळगतो आणि बसेस रंगवण्यापासून ते भिंती रंगवण्यापर्यंत निवडणुकीत कार्य करणाऱ्याचे प्रमाण तर याहून कमी आहे.

ह्याचे कारण राजकीय निवडणुकांमध्ये जे जे प्रकार होतात ते ते प्रकार इथेही होऊ लागलेत. घसाफोड घोषणा, लांबलचक

आश्वासने व नंतर सारे सामसूम ! राजकारणाची ही छोटी आवृत्ती आहे हे सिद्ध करायला या गोष्टी जणू पुरेशा नव्हत्या म्हणून की काय मागच्या वर्षी अभाविप आणि Jvm च्या संयुक्त आघाडीत पदाधिकारी म्हणून निवडून आलेल्या एका उमेदवारानं नंतर चक्क पक्षांतर केले.

ह्याचा धडा घेऊन आता विद्यार्थ्यांचे प्रश्न अधिक नेटाने घेतल्याशिवाय वर्षानुवर्षे आपले हे यश टिकवता येणार नाही, ह्याची जाणीव सर्वांत जास्त अभाविपला झाली आहे. म्हणून विद्यार्थ्यांचं पाठबळ विद्यार्थ्यांच्या समस्या हाती घेऊनच मिळवता येईल हे अभाविपन लक्षात घेतलं.

मागच्या वर्षी अभाविपने उत्तरपत्रिकांच्या फेरतपासणीचा हक्क विद्यार्थ्यांना मिळवून दिला. त्यापूर्वी फक्त फेरमोजणीचीच सोय होती. ही सवलत विज्ञान व कला विभागापुरतीच मर्यादित न ठेवता व्यावसायिक पाठ्यक्रमाच्याही विद्यार्थ्यांना मिळावी ही त्यांची यदाची मागणी आहे. गान्हाणे समिती व प्रोक्टरऐवजी प्रोक्टोरियल बोर्डाची स्थापना ही पण अभाविपची यशस्वी कामगिरी होय. याशिवाय दिल्लीतील उपराज्यपाल श्री. खुराना ह्यांच्या मुलाचे वैद्यकीय कॉलेजात प्रवेशाचं लफडं अभाविपनेच सर्वप्रथम प्रकाशात आणले.

आता अभाविप अॅकेडमिक काउन्सिलवर पाचापेक्षा जास्त प्रतिनिधित्व असावं, एक्झिक्युटिव्ह कौउन्सिलवर विद्यार्थ्यांनाही प्रतिनिधित्व मिळावं इत्यादि गोष्टीवर भर देणार आहे.

विद्यापीठ निवडणुकांबाबत विद्यार्थ्यांमध्ये दोन मतप्रवाह निर्माण झाले आहेत. एक म्हणजे या निवडणुकाही नकोत व त्यातला धागडधिंगाही नको. अभ्यास बरा आणि आपण बरे. दुसरा प्रवाह असा आहे की, तुम्ही काहीही केलं नाही तरी विद्यापीठाबाहेर जे वातावरण आहे त्याचा परिणाम विद्यार्थी-जीवनावर होणारच. शांततेनं अभ्यास पार पाडता यावा यासाठीसुद्धा संघर्ष करावा लागण्याची शक्यता. तेव्हा उखळात डोकं घातल्यावर मुसळाला काय भ्यायचं ?

यातूनच अभाविप आणि Jvm यांच्यात पुढे-मागे मतभेद निर्माण होण्याची शक्यता आहे. अभाविपला कोणतीही विद्यार्थी संघटना ही फक्त विद्यार्थ्यांचेच प्रश्न हाती घेणारी प्रातिनिधिक संघटना असली पाहिजे असे वाटते, तर Jvm भाजपाची साथ सोडणार नाही. म्हणून विद्यार्थ्यांचा कल अभाविपकडे त्यातल्या त्यात जास्त आहे. □

मुलाखत । भालचंद्र जोशी

# विद्यार्थी परिषद : अखिल भारतीय

श्री. मदनदास देवी हे गेली १५ वर्षे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्ण वेळ कार्यकर्ते म्हणून काम करत आहेत. ते मूळचे सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्याचे. एम.कॉम आणि सी. ए. या पदव्या घेतल्यावर, त्यांनी विद्यार्थी परिषदेचं काम करायला सुरुवात केली. सुरुवातीला मर्यादित स्वरूपाची जबाबदारी पेलत हळूहळू प्रदेश आणि मग राष्ट्रीय पातळीवरील कार्य ते करू लागले. मुंबईत त्यांचं केन्द्र असून सतत देशभर प्रवास चालू असतो. मध्यंतरी ते औरंगाबादला आले होते तेव्हा दोन दिवसाच्या धादलीत मुलाखतीसाठी वेळ मिळणं अशक्य वाटू लागलं होतं; परंतु शेवटी औरंगाबादेहून जाण्यापूर्वी जेमतेम दीड तास आधी त्याना गाठलं. एवढ्या गडबडीतही त्यांनी अनेक प्रश्नांना मनमोकळेपणानं उत्तरं दिली. बेताची उंची, शरीराची काहीशी स्थूल ठेवण, हळूहळू टक्कल पडत चाललेल असं रूप आणि आता मराठीतून बोलण्याचा सराव कमी आहे हे दाखवणारं इंग्लिश-हिंदी शब्द नकळतपणे घेऊन येणारं बोलणं.

प्रश्न : देशातील सध्याची शिक्षणसंस्थांची स्थिती कशी आहे ?

उत्तर : परिस्थिती फारच अवघड आणि हताश करून टाकणारी वाटते. देशाच्या विविध भागात शैक्षणिक संस्थांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत. पश्चिम बंगालमध्ये आणि विशेषतः कलकत्ता विद्यापीठाची आजची खरी समस्या किमान प्रशासनाची आहे. म्हणजे तिथं परीक्षा वेळेवर होणं, निकाल ठरलेल्या मुदतीत लागणं या प्राथमिक गोष्टीच होत नसल्याचा अनुभव येतो. शैक्षणिक वर्षच मुळी पाळलं जात नाही. तशी ही समस्या सार्वत्रिकच म्हणावी लागेल. पश्चिम बंगालच्या राज्यपालांनी यावर १४ सप्टेंबरला एक गोलमेज परिषद बोलावली होती. परीक्षाचा कालावधी निश्चित करणं, त्या कठोरपणे ठरलेल्या वेळेत पार पाडणं, परीक्षेनंतर ५० दिवसांत निकाल जाहीर करणं या गोष्टी प्रथम काटेकोरपणे अमलात आणाव्यात असा आग्रह विद्यार्थी परिषदेनं या गोलमेज परिषदेत धरला. आमचं म्हणणं असं आहे की, प्रथम शैक्षणिक वर्ष तरी व्यवस्थितपणे पाळलं गेलं पाहिजे. शिक्षणाचा दर्जा सुधारण्याबाबत त्यानंतरच विचार करता येईल.

बिहार, उत्तरप्रदेश इत्यादी राज्यांमध्ये परिस्थिती आणखीच गंभीर आहे. कारण तिथं शैक्षणिक क्षेत्राला भ्रष्टाचारानही ग्रासून टाकलं आहे. बिहारमध्ये एम. कॉम. ची परीक्षा गेले दीड वर्ष घेता आलेली नाही. बनारस हिंदू विद्यापीठातील एक प्राध्यापक मला सागत होते की, डिसेंबरपासून त्याना फक्त १५ दिवसच शिकवता आलं ! या प्रशासकीय गोंधळाबरोबरच परीक्षेतील भ्रष्टाचार, सामूहिक कॉपी होणं हे प्रकारही बिहारमध्ये सर्रास सुरू असतात. विद्यार्थी परिषदेनं बिहारमधल्या शैक्षणिक संस्थांमधील भ्रष्टाचाराविषयी एक व्यापक पाहणी करून त्याचा अहवाल राज्यपालांना सादर केला. शिवाय पाटण्यामध्ये या भ्रष्टाचाराविरुद्ध परिषदेच्या सहा कार्यकर्त्यांनी उपोषण सुरू केलं. तिथल्या राज्यपालानी दोन कुलगुरूंना काढून टाकलं हे मान्य केलं पाहिजे. मेरठ विद्यापीठात सामूहिक कॉपीचे प्रकार घडले तेव्हा परिषदेनं आंदोलन उभारून तिथं पुन्हा परीक्षा घ्यायला लावल्या. मुझफ्फरपूरमधील भ्रष्टाचारीची अनेक प्रकरणंही परिषदेच्या कार्यकर्त्यांनी वेशीवर टांगली.

प्रश्न : तिथले आणखी काही प्रश्न सांगता येतील का ?

उत्तर : दोन मोठ्या समस्या आहेत;

परंतु त्या शैक्षणिक क्षेत्राशी प्रत्यक्ष निगडित नाहीत. मात्र त्या समस्यांचं गंभीर स्वरूप लक्षात घेऊन विद्यार्थी परिषदेनं त्याविरुद्ध आवाज उठवला आहे. पहिली समस्या उर्दू भाषेला द्वितीय राजभाषेचा दर्जा देण्यामुळं निर्माण झालेली आहे. उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये उर्दूला द्वितीय राजभाषेचा दर्जा देण्यात आल्यामुळे तिथं एकंदरीतच सर्वत्र तणाव आणि विलगतेची भावना निर्माण झाली आहे. विद्यार्थी परिषदेचा उर्दूला राजभाषेचा दर्जा देण्याच्या या निर्णयाला विरोध आहे. आम्ही या प्रश्नावर एक संघर्ष समिती स्थापन केली आहे. हिंदीतील एक प्रख्यात लेखक आणि हिंदी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष श्री. श्रीनारायण चतुर्वेदी ह्यांनी या समितीचं अध्यक्षपद स्वीकारलं आहे. अनेक नामवंत साहित्यिकांनी, पत्रकारांनी आणि समाजधुरीणांनी विद्यार्थी परिषदेच्या या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. उर्दूला द्वितीय राजभाषेचा दर्जा देण्याच्या निर्णयामुळं सर्वत्र असंतोष निर्माण झाला आहे.

बिहारमधला आणि पश्चिम बंगालमधला आजही एक मोठा प्रश्न म्हणजे बांगला देशातील घुसखोरांचा. बिहारच्या उत्तरेकडील किशनगंज, पूर्णिया इत्यादी तर पश्चिम बंगालमधील मालदा वगैरे भागात निदान १० लाख बांगलादेशीय घुसखोर आले आहेत. यात प्रामुख्यानं भाटिया–मुसलमानांची संख्या जास्त असून त्यांनी बिहार, पश्चिम बंगाल या राज्यांत अनेक ठिकाणी जमीनजुमला विकत घ्यायला सुरुवात केली आहे. यासंबंधी जर आपण तात्काळ उपाययोजना केली नाही तर परिस्थिती हाताबाहेर जाईल. विद्यार्थी परिषदेनं या घुसखोरीचा एक सर्वे घेतला आहे.

प्रश्न : आसाममध्ये काय परिस्थिती आहे?

उत्तर : तिथं सध्या वातावरण शांत असलं तरीही अस्वस्थ शांतता आहे. तिथला तणाव दिवसेंदिवस वाढत आहे. ईशान्य भागातील ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कारवाया चालूच आहेत. त्यांनी आता आसाममधील विद्यार्थीनेत्यांना भारतीय जीवनप्रवाहापासून अलग करायचे, त्यांच्यात फुटीरतेचं, वेगळेपणाचं तत्त्वज्ञान पेरायचे प्रयत्न सुरू केले आहेत. विद्यार्थीपरिषद या विद्यार्थ्यांशी सतत संपर्क साधून आहे आणि त्याना सर्व देशभरातून पाठिंबा मिळवून देण्याचा प्रयत्नही आम्ही सातत्यानं करत आहोत. अशा पाठिंब्यामुळंच हे विद्यार्थीनेते मिशनऱ्यांच्या कारवायांना अजून तरी बळी पडलेले नाहीत; पण याबाबत आपण सतत जागरूक राहायला हवं. ईशान्य भारतातील काही विद्यार्थ्यांना देशाच्या विविध भागांतील कुटुंबांमध्ये ठेवून आपण सर्व त्यांच्याबरोबर आहोत असा राष्ट्रीय एकात्मतेचा प्रत्यय देण्याचं कार्यही विद्यार्थीपरिषद गेली काही वर्षं करत आहे. आता याच विद्यार्थ्यांमधून फुटीरतेची कारस्थानं करणाऱ्यांना चोख उत्तर दिलं जात आहे. मात्र या अभिसरणाचा वेग वाढायला हवा. इतर सामाजिक संस्थांनी या प्रश्नाकडे लक्ष दिलं पाहिजे.

प्रश्न : दक्षिणेकडील राज्यांमध्ये काय हालचाल आहे ?

उत्तर : केरळमध्ये मुख्य समस्या शिक्षणक्षेत्राच्या राजकीयीकरणाची आहे. तिथं विद्यार्थीजीवनावर राजकीय पक्षांचा पगडा आहे. शिक्षणाच्या दैनंदिन व्यवहारातही त्यांचं अस्तित्व जाणवतं. विद्यार्थीपरिषदेनं आता निखळ शैक्षणिक प्रश्नांवर तिथं विद्यार्थी संघटित करायला सुरुवात केल्यामुळं आमचं काम झपाट्यान वाढत आहे. जवळजवळ ११ जिल्ह्यांतल्या ४० तालुक्यांतल्या १२० महाविद्यालयांमध्ये विद्यार्थीपरिषदेनं स्थान मिळवलं आहे. तामिळनाडूमध्ये आम्ही सुब्रह्मण्यम् भारती या जुन्या पिढीतील थोर कवीच्या जन्मशताब्दिसोहळ्यात विशेष आस्थापूर्वक सहभागी झालो आहोत. त्या प्रांतात आम्ही पत्रद्वारा शिक्षणाचं कार्यही सुरू केलं असून सुमारे अडीच हजार विद्यार्थी त्यात सहभागी झाले आहेत. कर्नाटकमधील एक मंत्री श्री. इब्राहिम यांची भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणं विद्यार्थीपरिषदेनंच प्रथम उजेडात आणली आणि श्री. इब्राहिम यांना सत्तेवरून दूर करण्यासाठी यशस्वी आंदोलन उभारलं.

प्रश्न : आपल्या महाराष्ट्रात तर दुष्काळाची भीषण छाया पडली आहे. परिषद त्याबाबत काय करत आहे ?

उत्तर : दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांसाठी विशेष वसतिगृहं चालवण्याची गरज पडते. ७२–७३ सालच्या दुष्काळात परिषदेनं अशी वसतिगृहं चालवली होती. त्या वेळी शासनानंही आम्हाला मुक्त मनानं आर्थिक मदत केली होती. या वेळी अशी वसतिगृहं चालवण्यात येतील. शिवाय इतरही मार्गांनी विद्यार्थीपरिषद हातभार लावेल. त्याचा तपशील लवकरच ठरेल. □

## फलटण येथील 'प्रेरणा प्रतिष्ठान' या संस्थेचे कार्यकर्ते

# तीन दिवस माणमध्ये

फलटणपासून रोज सुटणारी रात्रीची मुक्कामी एस. टी. ची बस डोंगराच्या कपारीत जाते. तालुक्यातील शेवटचे वेळोशी गाव. नंतर पुढे काय ? डोंगर ! डोंगर ! ! डोंगर ! ! !

वेळोशीचे पुढे प्रवास कोणीही सुरू करण्याचे ठरविले तरी त्याला विनोबा भावे बनण्याशिवाय गत्यंतर नाही. रस्ता नाही. उंच जाणारा सीताबाईचा डोंगर. पूर्वी कधी काळी सरसरकाने त्या ठिकाणी रस्त्याची आखणी केली होती. अद्याप रस्ता म्हणून काहीच दिसत नाही. हॉस्पिटलची मंजुरी त्याच जागेवर झाली होती; पण हॉस्पिटल मात्र कराबला !

सीताबाईचा डोंगर चढताना रामायण आठवल्याखेरीज राहत नाही. नवीन माणसाला तो घाट चढताना 'आई' नावाचा गजर केल्याशिवाय घाटावर मात्र चढता येत नाही. घाटावर गेले की, सीताबाईचे मंदिर नजरेस पडते. शेजारीच डोंगरातून सतत वाहणारी पाण्याची धार. तोंडात पाणी घेतल्यावर पाण्याला जीवन म्हणतात हे नक्की पटते. (बाकी रोजच्या पिण्याच्या पाण्याने असंख्य रोग होतात असे डॉक्टरतज्ज्ञांचे मत). परिसर पाहून जुना इतिहास आठवतो; परंतु तेथे असणारे गुराखी जर आपणास भेटलेच तर सध्याचा इतिहास समजतो. अधूनमधून त्या

ठिकाणी 'सीते' सारख्या अबलांची प्रेते कोणीही आणून टाकतो. प्रेते आणून टाकणाऱ्या रावणांचा मात्र तपास लागत नाही, हाच तो आजचा जिवंत इतिहास!

सीताबाईचे दर्शन होऊन पुढे चालू लागले की, सुपीक जमीन, पिके, डोंगराच्या उतरणीवर दिसतील. हवा थंड वाटते. चालत चालत पुढे गेले की, कुळकजाई, कळसरकरवाडी, ही दोन छोटी खेडी जमिनीच्या सखल भागावर वसलेली दिसतात. 'प्रेरणा' संस्थेच्या सर्व कार्यकर्त्यांनी कुळकजाई या गावात रात्री मुक्काम करण्याचे ठरविले. आम्ही दलित वस्तीत प्रवेश केला, तरुणांच्या ओळखी झाल्या. दलितवाडा आम्हाला पाहण्यास जमला. आम्ही आमचे कार्याची माहिती सर्वांना सांगितली. आम्ही 'शिक्षणातून विकासाकडे' या धर्तीवर कलापथक करतो हे ऐकून सर्वांचे कुतूहल जागे झाले. तोपर्यंत गावात आम्ही आल्याची बातमी पसरली. दलित वस्तीत मराठा समाजाचे तरुण आम्हाला भेटण्यास आले. कलापथक गावात की दलित वस्तीत? हा संघर्षाचा विषय झाला. आम्ही दोघांचे पाहुणे आहोत. निर्णय तुम्ही घ्यावा. असे सांगून आम्ही संघर्षातून अंग काढून घेतले. मनोरंजनाची प्रेरणा मात्र आम्ही दिली. कार्यक्रम गावात घ्यावा असे मराठा समाजाचे मत, तर दलित वस्तीत कार्यक्रम व्हावा ही दलितांची इच्छा. त्याच्यातील दलित प्राथमिक शिक्षकाने तर कार्यक्रम वस्तीत व्हावा या हेतूनेच की काय धमालच केली. तीन दारूच्या बाटल्या व तीन कोंबड्या सादर केल्या! त्याचा पाहुणचार पाहून आम्ही थक्क झालो. शेवटी दलितांचे आग्रहाखातर कार्यक्रम दलित वस्तीत घेतला व गावातील मराठा समाजास कार्यक्रमास येण्याचे निमंत्रण दिले. एका दलित कुटुंबात आम्ही भाजी-भाकरीचे जेवण केले. जेवण करीत असतानाच त्या कुटुंबातील दुःखाची कहाणी ऐकली व खरोखर त्या सीतामाईची आम्ही त्या एका रात्रीची लेकरं झालो. तिची सर्व कहाणी आमची कार्यकर्ती 'जयश्री' ने तिची 'मुलगी' होऊन ऐकून घेतली. माणसात माणसाने मिसळल्याशिवाय खरी दुःखे समजत नसतात. हे काम जयश्री घाडगे हिने उत्तमपणे पार पाडले. सकाळी अनेक स्त्रियांशी चर्चा झाली, तरुणांशीही चर्चा झाली. 'कलापथक' कार्यक्रमामुळे ते उत्साही वाटत होते. दुष्काळ असूनसुद्धा आमचे आगमनामुळे नवी सकाळ होते की काय? या त्यांच्या आकांक्षा कदाचित असतील. गावात मंत्री आले होते. त्यासंबंधी स्त्रियांची मुलाखत घेतली. मंत्र्याचे नाव माहीत नाही. आम्ही त्यांच्याशी बोलू शकत नाही, मात्र वेळ पडल्यास बोलण्यास घाबरणार नाही असेही उद्गार काही स्त्रियांनी मुलाखतीत काढले.

सकाळी १० वाजता जेवण करून दु.खी सीतामाईचा निरोप घेऊन आम्ही पालवन डोंगराकडे वळलो. हा डोंगर पहिल्या डोंगरापेक्षाही दुप्पट उंच! रस्त्याची सोय आहे. एस. टी. ची सोय नाही. त्यामुळे पुन्हा विनोबांची कृती करणे साहजिकच आले.

डोंगर चढताना पुन्हा आईची आठवण. डोंगरमाथ्यावर गेले की, पालवन गावात प्रवेश. गावात प्रवेश करत असताना जर पाठीमागे वळून पाहिले तर शेतांची पठारे दिसतील. पालवन गावात गेल्यावर आपण बऱ्याच उंचावर आलो हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही. या डोंगरावरही दोनच गावे आढळतात. एका टोकाला गरडवाडी. साधारणतः प्रत्येक डोंगरावर दोन-दोन गावे वसलेली आहेत. आम्ही गरडवाडीच्या टोकाकडे चालत गेलो. गरडवाडीत पोहोचलो. गाव डोंगरावर, झाडी मुळीच नाही. लाइट नाही. घराचे बाहेर अंगणात उभे राहिलो तर डोळे फिरल्याशिवाय राहत नाहीत. प्रचंड खोल दरी 'आ' वासून उभी आहे, हे पाहून खरोखर खून करणे किती सोपे आहे हेच ती गरडवाडी सांगते. अशा प्रकारच्या बारा वाड्या निरनिराळ्या डोंगरांवर वसलेल्या आहेत. प्रत्येक वाडीत एकाच ठराविक जातीचे लोक आढळतात. पूर्वी 'आर्य' ज्याप्रमाणे टोळ्या करून राहत होते त्याप्रमाणे प्रत्येक डोंगरावर ठराविक समाज एकत्रित राहिलेला आढळतो. गायदरा म्हटले की ब्राह्मण, गरडवाडी म्हटले की, मराठाच, खांडेवाडी म्हटले की, रामोशी, वारुगड म्हटले की हरिजन अशा जातीचे लोक राहतात. जातीचा पगडा फारच मोठ्या प्रमाणावर आढळतो. त्यामुळे मराठ्यांच्या गरडवाडीत आमच्या जेवणाचा प्रश्न लोकांना पडला. आमची 'जात' विचारण्याचेही धाडस कोणी करू शकत नव्हते, त्यामुळे.

आम्ही नक्की कोणत्या जातीचे असणार हे निश्चित ठरविणे त्यांना अवघड होऊन बसले. सर्वांना एकाचेच घरात जेवायला घालण्यास कोणीच तयार होईना. संस्थेच्या संघटकाचे घरही तेथे असून तोही लोकांसमोर निर्णय घेऊ शकत नव्हता. त्यामुळे दोन मिनिटातच सर्वांनी मात्र एक आगळा व वेगळा निर्णय घेतला. 'प्रत्येक घरात एक-एक माणूस जेवावयास जावे' असे आम्हाला सांगण्यात आले. आमचे कार्यकर्ते एकमेकास सोडून जेवण घेण्यास तयार नव्हते. त्यातून काहींनी आम्हाला तमासगीर समजता की काय? असे सवाल केले मी त्याची अडचण मात्र ओळखली. प्रत्येकाने जातीचा विटाळ करून घेण्याचे ठरविल्याने मला त्यांची दया आली व तितकीच चीडही उत्पन्न झाली; परंतु मी नेहमी अशा वेळी चीड ज्यांची येते त्यांचा उलटा विचार करत जाऊन उत्तर शोधत असतो. मी त्यांचा विचार केला. त्यांचीही जातिबंधनाची एकी पाहून खरोखर त्या सर्वांची उद्या वेळ आल्यास मरण्याचीही तयारी अशीच एकीने असणार. एखाद्याला मारण्यासाठी सुद्धा अशा प्रकारे एकी असू शकेल हे उघड आहे. तेव्हा जातीचे बंधन, पाळणारी, जातीला मान देणारी मराठा समाजाची गरडवाडी खरोखर डोंगराचे फार मोठ्या टोकावर का राहते, याचेही उत्तर मला ताबडतोब सापडले. कारण ते राहतात त्या डोंगरापासून हजारो फूट खोल दरीत त्यांच्या पायाखाली दलितवर्ग राहत असलेला आढळतो. तो ज्या भूमीवर राहतो त्यास गड म्हणतात. अशा प्रकारे गड पायथ्याला व सिंह शिखरावर! हेच ते वारुगड व गरडवाडीचे समीकरण. हा सर्व विचार करता जेवणाचा गंभीर प्रश्न मी सोप्या पद्धतीने सोडविला. 'सर्वांचे घरातून जेवण गोळा करा. आम्ही ते खाऊ' असे सांगितले. आमचा तोडगा ऐकून आम्ही आमचे पायरीने राहतोय या आनंदाने त्या लोकांनी एका तासातच जेवणाची व्यवस्था एकत्र करून पूर्ण केली. आम्ही आमची पोटाची भूक पूर्ण करेपर्यंत काळोखात वेढलेली गरडवाडी जनरेटरच्या साह्याने उजेडात चमकू लागली. गरडवाडी व वारुगड

म्हणजे मराठा व हरिजन असे समीकरण. दोन्ही गावात लाइट व पिण्याच्या पाण्याची सोय नाही. डोंगरात पाण्याच्या टाक्या आहेत; परंतु त्यातून दलितांना पाणी घेण्यास बंदी आहे. कारण देवाला विटाळ होईल हा लोकांचा समज. मराठा समाजाचे लोक मात्र टाक्यांचे पाणी पितात. टाक्याचे पाणी आणण्यास चुकून एखादा दलित गेला तर दुसऱ्या दिवशी गावात दिसणार नाही असे वारुगड परिसरात सांगितले जाते. दोन वाड्या अती उंच डोंगरावर असलेने थंड हवा लागते. हवेमुळे आपणास उत्साह वाटतो; परंतु तेथील परिस्थिती पाहून असे वाटते की, हवा थंड आहे; पण झाडी नाही. महाबळेश्वर आहे; परंतु पिण्यासाठी पाणी नाही, अशा स्थितीतील लोकांच्या अनेक अडचणीही आहेत. प्रेरणा संस्थेने डोंगरातील बारा वाड्यांत प्रवेश केलेला आहे.

त्यापैकी ज्या रात्री गरडवाडीत प्रवेश केला तेथे, जेवणानंतर जनरेटरवर लाउडस्पीकर लावून कलापथक आम्ही सादर केले. या कार्यक्रमास वारुगडमधील दलित ऐकू येऊनसुद्धा कार्यक्रम पाहण्यास आले नव्हते. दूरच्या पालवन गावातील लोक मात्र कार्यक्रमास आले होते. जमलेले हे सर्व लोक कार्यक्रम पाहण्यात तल्लीन झाले होते. आमचेबरोबर असणारी स्त्री कार्यकर्ती कलापथकात नाचते की काय? या हेतूने अनेकजण वाट पाहत होते; पण कलापथकानंतर कलापथक म्हणजे डान्स नाही, वेशभूषा, केशभूषा मुळीच नाही, तर मनुष्यास स्वतःकडे पाहण्यास लावणारी जी 'कला' त्यास 'कलापथक' म्हणतात, हे त्यांचे ध्यानात आम्ही आणून दिले. तरीसुद्धा बहाद्दर गृहस्थांनी आमचे स्त्री कार्यकर्त्यांच्या तब्येतीची प्रशंसा केली. कोणाचे ध्यान कोणाकडे असते याकडे आमचेही लक्ष वेधून घेतले. हेच ते एक आमचे लक्षात आले. जिवंत माणसांच्या दर्शनात लावण्यविभ्रमाचे राजस दर्शन आहे; पण त्यांच्या अंतःकरणात, अंतरंगात असलेली भानगडीची गुंतागुंतही आहे. कित्येकदा वाटते स्वराज्य थोडे अकालीच आले. मतदानासंबंधी अज्ञ असलेल्या जनतेचे मतदान हे या मागास भागाचे आकर्षक वळण आहे. आजच्या आपल्या बहुसंख्य मतदारांच्या हातातले मत म्हणजे वॉशिंग्टनच्या हातातली कुऱ्हाड बनली आहे. ती कुऱ्हाड आपल्याला हवी तेथे कशी चालवावी हे आजच्या सत्ताधाऱ्यांना बरोबर माहीत असते व आपल्या रक्तात भिनलेली जातिव्यवस्था या कामी त्यांना झकास उपयोगी पडते. जातीच्या मध्यस्थीने जनतेचा पाठिंबा मिळविण्यात आपल्या राज्यकर्त्यांनी उदंड यश मिळविले आहे. आपल्या लोकशाहीचा आत्मा जनता नसून भांडवलदारवर्ग आहे व पाया जनता नसून जात आहे.

मनोरंजनाचे साधन ज्या खेड्यात नसते तेथे बलात्कार घडतात. प्रकाशाची सोय नसते. तेथे कुटुंबकल्याण कायदाही नसतो व शिक्षण नाही तेथे खून, दरोडे, मारामारी, हमखास असणार यात मुळीच शंका नाही.

मात्र हे सर्व पाहिल्याशिवाय, तेथे राहिल्याशिवाय, कळणार नाही. अशा या माण तालुक्यात तीन दिवसात बरेच काही कळले. मात्र तेथे जे राहतात, जगतात ते काय करतात? काय खातात? व कसे जगतात व कसे मरतात हे मात्र अद्याप गूढ आहे. या ठिकाणी रस्ता नाही. त्यामुळे कायदा वेळेवर पोहचत नाही हीच फार मोठी स्वातंत्र्याची खंत वाटते. लोकशिक्षण व संघटन हेच एक कायद्यापेक्षाही प्रभावी शस्त्र आहे. कारण या भागात लोकशिक्षणातून लोकचळवळ उभी राहील तेव्हाच कायद्याचे व सरकारचे रस्ते या बारा वाड्यांना जोडले जातील. तोपर्यंत मात्र कायद्याचे रस्त्यात अज्ञानाचे हे डोंगर उभे असलेने व डोंगरात रस्ता नसल्याने या भागाचा विकास भकासच राहणार यात मुळीच शंका नाही! म्हणून आम्ही म्हणतो –

हेच शेवटी आता मागणे।
प्रेरणा युवक गातो गाणे॥
नका राहू हो कुणी अज्ञानी।
एको करोनी झगडा सारे॥
वाघ सिंह ते।
जातील पळोनी क्रांतीला॥

— दशरथ ननावरे

---

## अवती भवती

शरद कृष्णन्

# मंत्रिमंडळविस्तार : असंतुष्टांना खिरापत वाटून मुख्यमंत्र्यांना सुस्थिर करण्याचा प्रयत्न

मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांना नऊ महिन्यांपूर्वी सत्तेवर आणले त्या वेळी मंत्रिमंडळ बनवण्याच्या बाबतीत त्यांना बरेच स्वातंत्र्य दिले गेले. जुन्या अंतुले मंत्रिमंडळामधील अनेक ज्येष्ठ मंत्र्यांना त्यांनी बाहेरचा रस्ता दाखवला. थोड्या-थोडक्या नाही तर चांगल्या १९ नामदारांची सत्तेची झूल त्यांनी त्या वेळी उतरवली होती. महिन्यामागून महिने गेले पण त्यांनी स्वतःची अथवा मंत्रिमंडळाची ठसठशीत प्रतिमा काही जनमानसात रुजवता आली नाही. अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांनी कुजत ठेवले, राज्यावर दुष्काळी परिस्थितीचे सावट असताना त्याची दखल पुरेशा गंभीरपणे घेतली नाही. बाबासाहेब सत्तेवर येण्यापूर्वीच गिरणकामगार संपावर गेले होते. सत्ताग्रहण केल्यावर बाबासाहेबांनी गिरणकामगारांच्या प्रश्नाला अग्रहक्क दिला असता तर काही ना काही तोड निघू शकली असती; पण आठवड्यातले तीन दिवस दिल्लीत घालवणाऱ्या मुख्यमंत्र्यांना दिल्लीच्या शे-सव्वाशे वाऱ्या करूनही गिरणकामगारांच्या संपाची पुरेशा गंभीरपणे दखल घ्यावीशी वाटली नाही. पोलीसदलामधील असंतोषाचा उद्रेग होऊन मुंबई भाजून निघाली जात असतानाही मुख्यमंत्री दिल्लीत ह्याला मंत्रिमंडळामध्ये घेऊ का त्याला घेऊ, याचा खेळ करत बसले होते. मुख्यमंत्र्यांविरुद्ध वातावरण तयार होऊ लागले. बाबासाहेबांच्या पाठीशी पुरेसे पाठबळ उभे केले तरी त्यांचा प्रभाव पडत नाही, हे लक्षात आल्यावर दिल्लीत काही दुसरा विचार सुरू झाला होता. ऑगस्टच्या शेवटच्या सप्ताहामध्ये तर हवा अशी होती की, बाबासाहेब चालले! २७ ऑगस्टला तर त्यांच्याकडून राजीनामापत्रही

लिहून घेण्यात आले होते. याच सदरामध्ये याच विषयावर मी सुमारे महिन्याभरापूर्वी लिहिले होते. त्या वेळी बाबासाहेबाचे काही खरे नाही असेच एकंदर वातावरण होते. पर्यायी नावाचा विचारही सुरू झाला होता. बंडखोरांनी चागली जोरदार मोर्चेबंदी केली होती; पण आंध्रमधील फजितवाड्यामुळे असेल कदाचित पण वातावरणात फरक पडत गेला. एकंदरीत मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत इंदिरा काग्रेसला फारसा चांगला अनुभव आलेला दिसत नाही. अनेक राज्यांतून अनेक मंडळीना संधी देण्यात आली; परंतु ज्याना संधी मिळाली त्यांना जबाबदारीचे ओझे काही पेलता आले नाही. परिणामी मुख्यमंत्री बदलले गेले पण त्यामुळे परिस्थितीमध्ये मात्र फारसा बदल झाला नाही. आंध्र प्रदेश हे एक असे राज्य आहे की, जेथे इंदिराजीनी अजून पराभव पाहिलेला नाही. विधानसभेमध्ये पक्षाचे सामर्थ्य एवढे दाडगे की निर्वेध पाच वर्षे राज्य करावे; पण प्रत्यक्षात काय पहावयास मिळाले तर चेन्ना रेड्डी गेले, अंजय्या आले. तेही यथाकाळ गेले आणि वेंकटराम आले. चार-सहा महिने त्यानी कसेबसे रेटले पण त्यानाही जावे लागले. विजय भास्कर रेड्डी आले आणि मंत्रिमंडळाच्या जडणघडणीवरूनच वादळ उठले. इतक्या झपाट्याने मुख्यमंत्री बदलूनही इदिराजीच्या पक्षाला परिस्थितीवर नियंत्रण मिळवता आले नाही. निवडणुका तोंडावर येऊन ठेपलेल्या. एन. टी. रामरावचा तेलगू देशम हा नवीन प्रादेशिक पक्ष छाताडावर बसला असतानाही इंदिराजीचा पक्ष पक्षातर्गत संघर्षाखाली दबलेला राहिल्याने या सुरक्षित राज्यातही चागलेच अस्थिर वातावरण निर्माण झालेले दिसते. राजस्थानमध्ये पहाडिया याना जावे लागले. उत्तर प्रदेशाच्या वि. प्र. सिंग या मुख्यमंत्र्यानी प्रतिकूल परिस्थितीपुढे शरणागती पत्करून राजिनामा दिला. कर्नाटकचे गुडुराव आणि मध्यप्रदेशचे अर्जुनसिंग याच्या विरुद्धही पक्षांतर्गत दडपण आहेच. महाराष्ट्रामध्ये अतुले याना बदनाम होऊन जावे लागल्यावर नवीन नेता निवडण्याची वळ आली. त्या वेळी जर जास्त जबाबदारीने निवड केली असती तर ते इदिरा काँग्रेस या पक्षाला आणि महाराष्ट्राच्या राजकारणालाही हितकारक ठरले असते; परंतु मराठा लॉबो आणि साखरवाले याच्यापासून दूर असलेला नेता शोधण्याच्या नादात इदिराजी बाबासाहेबापर्यंत येऊन पोचल्या आणि बाबासाहेब मुख्यमत्री झाले. बाबासाहेबांना सुस्थिर होण्यासाठी दिल्लीने पुरेसे समर्थन दिले; परतु बाबासाहेबाना ते जमू शकले नाही. मुख्यमंत्री बदलणे हा एक पयाय होता; परंतु असा बदल करण्यापेक्षा जी मंडळी बाबासाहेबाची उचलबागडी करण्यास आतुर झाली होती त्यांच्यामध्ये सत्तेची खिरापत वाटून बाबासाहेबाना अजून एक संधी देण्यात आली.

## नावे दिल्लीने ठरवली—बाबासाहेबांनी स्वीकारली

मंत्रिमंडळामध्ये फेरबदल करण्यासाठी बाळासाहेब बरेच दिवस धडपडत होते; परतु त्याना स्वतःलाच मुख्यमंत्रीपदी ठेवायचे का नाही याबाबत दिल्लीचे काही नक्की ठरत नव्हते. त्यामुळे याच्या आणि फेऱ्याच्या घेऊन बाबासाहेबांची सतत धावपळ चाललेली होती, तरी प्रत्यक्षात काहीच होत नव्हते. १५ ऑगस्टपूर्वीच मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यास मुख्यमंत्री उत्सुक होते; पण ते जमू शकले नाही. आज मंत्रिमंडळामध्ये विस्तार झालेला दिसत असला तरी ज्या पद्धतीने बंडखोरांचा अनुनय करण्यात आला आहे ते पाहता, यादी मुख्यमंत्र्यांची स्वतःची आहे असे म्हणणे अवघड आहे. बंडखोराना नेतृत्वबदल हवा होता. सध्या ते शक्य नाही. तुम्ही सत्तेमध्ये भागीदरी करा आणि काय करायचे ते करून दाखवा, असे या मंडळीना दिल्लीवरून फर्माविण्यात आले आणि नाही—नाहीचा घोषा लावत एक गुलाबराव सोडले तर बाकी तमाम मंडळी सत्तेच्या दावणीला बांधली गेली. अर्थात गुलाबरावही दाखल झाले असते; परंतु त्यांना राज्यमंत्रिपद देऊ करून अपमानित करण्यात आल्याने मंत्रिमंडळामध्ये सहभागी होणे त्यांना रुचले नाही. कॅबिनेट दर्जाचे मंत्रिपद त्यांना दिले असते तर एव्हाना त्यांची स्वारीही मंत्रिमंडळामध्ये रुजू झाली असती. आता प्रदेशाध्यक्षाला नाखूष ठेवून बाबासाहेबांनी तरी काय मिळवले? याद्यांना मंजुरी देताना श्रेष्ठींचा असा अंदाज होता की, राज्यमंत्री म्हणून गुलाबराव गुमान दाखल होतील. खेरीज गेल्या काही महिन्यात त्यानी जे राजकारण केले त्याबाबतची नाखुषीही दिल्लीवाल्यांना नोंदवायची होती, ती नोंदवली गेली खरी; परंतु उद्रेक मात्र शमलेला नाही. खासदार जांबुवंतराव धोटे किंवा माजी मंत्री सुधाकर नाईक याच्या प्रतिक्रिया पुरेशा तिखट आहेत. ताई आणि आदिक सत्तेची खुर्ची समोर येताच सरळ तिच्यावर जाऊन बसले, ही गोष्ट बाबासाहेबाविरुद्ध वातावरण तापवणाऱ्या अनेक आमदारांना रुचलेली नाही. स्वाभाविकपणे त्यांची धुसफूस चालू रहाणारच आहे. बाबासाहेब फारसे काही करत नसले तरी मंत्रिमंडळविस्तारापूर्वी त्यांना जी मोकळीक होती ती मोकळीक आता राहणार नाही. रामराव आदिक, ताई, तिडके, बाबुराव काळे यांच्यासारखी मंडळी बिन्नीचे साथीदार म्हणून घ्यावी लागल्याने मंत्रिमंडळ-विस्तार म्हणजे मुख्यमंत्रीपदी कायम राहण्यासाठी स्वीकारलेली तडजोड असेच या विस्ताराचे स्वरूप आहे. या मंडळींना राजीखुशीने घेण्यात आलेले नाही. दिल्लीवाल्यांनी त्याच्यामागची भुणभुण थांबावी, निदान कमी व्हावी म्हणून बंडखोरीचे हे लोढणे मुख्यमंत्र्यांच्या गळयात बाधून टाकले आहे.

विस्तारित मंत्रिमंडळाच्या जडण-घडणीवरून नजर टाकली तर जाणवणारी पहिली गोष्ट म्हणजे दस्तूरखुद्द मुख्यमंत्रीच चारही बाजूनी चागले बंदिस्त झाले आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे अब्दुल रहेमान अंतुले यांचे जे काही थोडेफार सावट होते तेही दूर झाले आहे. मुख्यमंत्र्यांनी ज्या दोनच मंत्र्याना डच्चू दिला आहे, त्यामध्ये अतुलेजीचे एक समर्थक श्री. मोमीन यांचा समावेश आहे. मोमीन मोठे महत्त्वाच्या जागी होते अशातला भाग नाही; पण ते जेथे होते त्या इंधनखात्याच्या उपमंत्रीपदावरूनही त्यांची उचलबांगडी करण्यात आली आहे. निरुपद्रवी आणि बऱ्यापैकी कार्यक्षम असूनही वनमंत्री डी. डी. चव्हाण यांना वगळण्यात आले आहे. ज्यांना मंत्रिमंडळामधून अतुल्यांनी काढून टाकले होते त्या ताईंना भगिनीसमान मानून परत मंत्रिपदी विराजमान करण्यात आले आहे. मंत्रिमंडळातून काढून टाकलेले दुसरे एक मंत्री बाबुराव काळे पुन्हा परत येत आहेत. तिडकेजी म्हणजे राज्यपातळीवरील जगजीवनरामच आहेत. केंद्रामध्ये बाबुजी जसे जवाहरलाल नेहरू मंत्रिमंडळापासून ते जनता मंत्रिमंडळापर्यंत आपले स्थान थोडाफार अपवाद वगळता टिकवून होते, तसेच

तिडकेजींचे आहे. गेली वीस–बावीस वर्षे ते मंत्री नसल्याने चुकल्यासारखे वाटत होते. आता तेही आतमध्ये आले हे ठीक झाले. मंत्रिपदापासून प्रतिभा पाटील दीर्घकाळ वंचित राहिल्या. मुख्यमंत्रीपदासाठीही त्यांचे नाव घेतले जात होते. आता निदान त्या पुन्हा तरी झाल्या. तात्पर्य दिल्लीकरांनी तमाम असंतुष्ट मंडळींना खूष करून टाकण्याचा चंग बांधलेला दिसतो. अट एकच, बाबासाहेबांना संभाळून घ्या. आता ही एकच अट ही मंडळी किती प्रामाणिकपणे राबवतात ते पहायचे.

विस्तारित मंत्रिमंडळामध्ये विदर्भाला चांगलेच झुकते माप मिळालेले आहे. विदर्भाच्या ११ मंत्र्यांपैकी केवळ नागपूरचे सहा मंत्री आहेत. मुंबई विभागामधील पाच मंत्रिमंडळीची वर्णी लागली आहे. कोल्हापूर व सातारा हे दोन जिल्हे उपेक्षित राहिले आहेत. यशवंतरावांबरोबर जी मंडळी आतमध्ये आली त्यांपैकी कोणालाही नवीन मंत्रिमंडळामध्ये स्थान नाही. ३५ मंत्रीगणांमध्ये ५ महिला आहेत. नवीन मंत्रिमंडळाचे खातेवाटप पहाता पूर्वप्रथेनुसार मुख्यमंत्र्यांनी गृहखाते स्वतःकडे कायम ठेवले असून, सामान्य प्रशासनाखेरीज अन्य पाच–सहा दुय्यम खाती स्वतःकडे ठेवली आहेत. मुख्यमंत्रीपदावर दावा सांगणारी तीन–चार मंडळी मंत्रिमंडळामध्ये असल्याने उपमुख्यमंत्रीपद अथवा दुसऱ्या क्रमांकाचे स्थान कोणालाच दिलेले नाही. महसूल म्हणजे सरकार म्हणणाऱ्या ताईंना आता बांधकाम आणि नागरी पुरवठा म्हणजेच सरकार असे म्हणावे लागेल. रामरावांना त्यांच्या दर्जाला व अनुभवाला साजेल असे अर्थखाते देण्यात आले आहे. नरेन्द्र तिडके यांची बूज राखण्यात येऊन उद्योगखात्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. श्रीकांत जिचकर यांच्याकडे असलेली गृहराज्यमंत्रिपदाची जबाबदारी तशीच कायम ठेवण्यात आली आहे. गुलाबराव मंत्रिमंडळामध्ये आले असते तर बाबासाहेबांविरुद्धची आघाडी निदान वर्ष–सहा महिन्यांसाठी तरी थमली असती. मंत्रिमंडळविस्ताराबाबत आपला सल्ला घेतला नाही, ही गोष्टही प्रदेशाध्यक्षांना रुचली नाही आणि पक्षीय पातळीवरील आपला दर्जा व आपले वय यांची बूज न राखली गेल्याने मंत्रिमंडळामध्ये सहभागी न होऊन त्यांनी आपला राग व्यक्त केला आहे. मंत्रिमंडळाचा विस्तार याचाच सरळ सरळ अर्थ–बाबासाहेबांना सध्या तरी हात लावण्याची श्रेष्ठींची इच्छा नाही. आपल्या विरोधकांना डाव्या –उजव्या बाजूला घेऊन त्यांना वाटचाल करावी लागणार आहे. बाबासाहेबांचा पिंड सावध राजकारण्याचा नाही. त्यांचे अघळपघळ बोलणे तसेच चालू राहिले तर खुर्च्या पटकावून बसलेले हे बंडखोर पुन्हा त्यांना अडचणीमध्ये आणण्याचा प्रयत्न करतील. नवीन मंत्र्यामध्ये स्वतःसाठी स्वतंत्र व त्यांच्यापासून बरेच उंच असे स्थान निर्माण करण्यात बाबासाहेब यशस्वी होण्याचा संभव कमी मुख्यमंत्रीपदी जरी ते कायम असले तरी मंत्रिमंडळावर रामरावांचा आणि ताईंचा चांगला प्रभाव राहील. आपल्या स्वतंत्र व विशेष अस्तित्वाची चुणूक हे दोन्ही मंत्री निश्चितपणे दाखवतील.

राज्यांचे राजकारण संपूर्णपणे दिल्लीतून नियंत्रित करण्याचा एक अनिष्ट पायंडा इंदिरा कॉंग्रेसने पाडलेला आहे. अर्थात अशा स्वरूपाचे राजकारण हे परिस्थितीप्रमाणे चालते. मुख्यमंत्री एके काळी इतके सामर्थ्यशाली होते की, पंतप्रधानपदी कोणी विराजमान व्हावे याबाबत त्यांच्या मताला विशेष महत्त्व होते. आज पंतप्रधान दिल्लीत बसून अक्षरशः कोणालाही मुख्यमंत्रिपदी नेऊन बसवण्या इतका सामर्थ्यशाली असल्या तरी मिळालेली सत्ता राखण्याची कुवत जर मुख्यमंत्र्यामध्ये नसेल तर पंतप्रधानांचा आशीर्वाद पुरेसा पडत नाही. आंध्रमध्ये अशी मनमानी करून आणि राज्याला दर चार–सहा महिन्यांनी नवीन मुख्यमंत्री देऊन पंतप्रधानांनी तेथे अडचणीचे डोंगर उभे करून ठेवले आहेत. येऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये इंदिरा कॉंग्रेसशी टक्कर देण्याच्या तयारीने उभे असलेली एन. टी. रामरावांची फिल्मी पुण्याई काय असेल ती असो,–पण राज्यपातळीवरील नेत्यांना इंदिराजी ज्या पद्धतीने नाचवतात त्यावर ते कडवट टीका करतात आणि त्यांच्या या टीकेला जनतेकडून चांगलाच प्रतिसादही मिळतो.

अंतुलेजींना प्रतिष्ठानप्रकरणी न्यायालयाने दोषी ठरवल्याने जावे लागल्यावर महाराष्ट्रासारख्या प्रमुख राज्याच्या नेतेपदाची निवड जास्त जबाबदारीने करणे जरूर होते. धक्का–तंत्राचा वापर करून अनपेक्षित व्यक्ति मुख्यमंत्रिपदी आणून बसवली खरी; पण राजकीयदृष्ट्या सोइस्कर वाटणारे हे तंत्र अनुशासनपातळीवर त्रासदायक ठरते आणि राजकीय उपद्रवही निर्माण व्हायचा तो होतोच, असा अनुभव आला आहे. महाराष्ट्राच्या माथी मारलेले हे नेतृत्व पक्षांतर्गत विरोधकांच्या खांद्यावर बसवून तरी सुस्थिर होऊ शकते का हे आता बघायचे. महाराष्ट्राच्या वाट्याला यशवंत–बळवंताच्या जमान्यापासून आजवर अनेक मुख्यमंत्री मिळाले; परंतु मुख्यमंत्रिपदाची रया इतकी पातळ कधी झाली नव्हती. कन्नमवारांना व्यक्तिमत्त्व नव्हते. वागण्या-बोलण्यात भोंगळपणा होता; पण यशवंतरावांच्या कणखर पाठिंब्यावर त्यांचे नेतृत्व तारले गेले. वसंतदादांचा जनसंपर्क हेवा वाटावा असा होता. शंकरराव काहीसे तुटक असले तरी त्यांची कार्यक्षमता आणि यंत्रणेवरील पकड वाखाणण्यासारखी होती. अंतुलेंची कारकीर्द अल्पकालीन परंतु वादळी होती. शरददादांच्या वागण्या–बोलण्यात शिस्त होती. खेरीज साहेबांपासून उचललेले नेतृत्वाचे अनेक गुण त्यांच्या अल्प कारकीर्दीमध्ये पहावयास मिळाले. राज्यपातळीवरील पक्षनेते, त्यांना धाब्यावर बसवून बाबासाहेबांना सत्तास्थानी आणण्यात आले. त्याचे अनेक विपरीत परिणाम त्यानंतरच्या आठ–दहा महिन्यांच्या अल्पकाळात पहावयास मिळाले. आता विस्तारित मंत्रिमंडळाचा, आपले नेतृत्व विकसित करण्यासाठी बाबासाहेब कसा वापर करतात आणि जात्याच गतिहीन असलेली शासकीय यंत्रणा गतिमान करण्यात बॅरिस्टरसाहेब कितपत यशस्वी ठरतात यावर पुढील गोष्टी अवलंबून आहेत. □

---

## यापुढील अंक
# दिवाळी अंक

## १९८२ तली 'मारुती–सुझुकी' योजना !

# अखेर जमलं !

प्रा. राम बिवलकर

दिनांक एक ऑक्टोबर १९८२ रोजी जपानमधील 'सुझुकी मोटार कंपनी' आणि भारतातील सरकारी अर्थक्षेत्रातील नव्याने स्थापन झालेली 'मारुती उद्योग लिमिटेड' या दोन कंपन्यांमध्ये सहयोगाच्या लेखी करारावर नवी दिल्ली येथे सह्या झाल्या. २८ जून १९८२ रोजी केंद्रीय इंडस्ट्रियल लायसेन्सिंग कमिटीने (औद्योगिक परवाना समिती) प्रतिवर्षी एक लक्ष छोटया मोटारी आणि ४० हजार व्यापारी वाहाने निर्माण करण्याचा आवाका असलेल्या या महाप्रकल्पाला अनुमती दिली होती. केंद्र सरकारने १७ ऑगस्ट रोजी त्यावर 'मम' म्हटले होते. एकूण २६९ कोटी रुपयांची भांडवलगुतवण मागणाऱ्या या प्रकल्पात सामग्री आणि तंत्रज्ञानाद्वारे ८९ कोटी रुपयांचा वाटा 'सुझुकी' उचलणार आहे, तर भागभांडवलात तिचा ४० टक्के वाटा राहील. भारतातील 'मारुती उद्योग' ही सरकारी कंपनी. तिच्याशी परदेशातील खाजगी क्षेत्रातील कंपनीचा सहयोग, हा नवा पायंडा या करारामुळे निर्माण होत आहे. यापूर्वी भारतातील सरकारी क्षेत्रातील कंपन्यांनी आपला कारखाना-उभारणीचे आणि इथल्या तंत्रज्ञाना शिकवून शहाणे करून सोडायचे काम अनेकदा परकीय कंपन्यांवर सोपविले होते; पण 'मारुती–सुझुकी' प्रकल्पात जपानी कंपनी भांडवलात, उभारणीत व व्यवस्थापनातही सहभागी होणार आहे.

लिटरला २२ किलोमीटर पळणारी, फक्त ४५ ते ५० हजार रुपयांत ग्राहकाच्या पदरी पडणारी ही 'जनता मोटार' पुढल्या वर्षी भारतातील रस्त्यांवरून धावू लागणार आहे; पण सध्या काही वर्षे ती भारतात तयार होणार नाही. सुझुकी कंपनीने जपानमध्ये बनविलेल्या 'तयार' गाड्या भारतात आयात होतील; पण त्याचे नाव मात्र मारुती मोटार असे राहील. पुढील ४–५ वर्षांत सुझुकी मोटार निर्माण करण्याकरता लागणारे अतिप्रगत तंत्रज्ञान हळूहळू भारतात आयात करून रुजविण्यात येईल. मोटारीचे विविध भाग निर्मिणारे ॲन्सिलरी कारखाने इथे उभे राहतील. त्याची जुळणी करणारा मोठा कारखानाही हरियाना राज्यातील गुरगाव या शहरात उभा राहील. या मोटारीचे तंत्रज्ञान शिकून अगर शिकवून तयार झालेले मेकॅनिक देशभर आपली सर्व्हिसिंग स्टेशन्स उभारतील. मारुती मोटारी विकणाऱ्या व्यापाऱ्याचे जाळेही देशभर विणले जाईल. मग इतर मोटारींना विचारतो कोण ? ही कंपनी प्रतिवर्षी लाख-दीड लाख गाड्या निर्माण करणार. त्या स्वस्त असणार, स्वस्त पळणार नव्या धाटाच्या व सुखसोयींनी समृद्ध असणार. एकूण आनंदी आनंद होणार !

पुढील दोन-तीन वर्षांत गुरगावचा 'जुळणी' कारखाना उभा होईल. मारुती-सुझुकी मोटारीचे काही भाग निर्माण करणारे ॲन्सिलरी कारखाने सुझुकीच्या सहकार्याने आणि जरूर तर सहयोगाने इथे उभारले जातील. प्रीमियर अगर ॲम्बॅसिडर या मोटारींना लागणारे भाग निर्मिणारे कारखाने हे भाग निर्माण करू शकणार नाहीत. कारण सुझुकीचे तंत्र वेगळे आहे. जुन्या कारखान्यात ते वापरायचे तर त्यांच्या एकूण ढाच्यात खूपच बदल करावे लागतील आणि भांडवलही खूपच लागेल. दोन-तीन वर्षांत हे नवे कारखाने उभे राहिले की, मारुती-मोटारीचे ३३ टक्के भाग भारतीय बनावटीचे असतील. त्यापुढील २–३ वर्षांत म्हणजे १९८८ अखेर हे प्रमाण ५० टक्के एवढे वाढलेले असेल. पाच वर्षांत देशभर हवी तेवढी 'मारुती' सर्व्हिसिंग स्टेशन्सही सुझुकीच्या सहकार्याने उभारली जातील. 'मारुती' प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने मांडलेले हे पुढील ५–६ वर्षांचे गणित ! प्रकल्पाचा एकूण खर्च २६९ कोटी रुपये आहे असा वर उल्लेख आला आहे. ॲन्सिलरी कारखाने आणि सर्व्हिसिंग स्टेशन्स उभारणीचा खर्च त्याने जमेला धरलेला नाही. तो आणखी ५०० कोटी रुपयांच्या घरात जाईल, हे पुढले गणित सध्या कुणी बोलत नाही.

'मारुती उद्योग लिमिटेड' ही सरकारी कंपनी कै. संजय गांधी-प्रणीत 'मारुती मोटार कारखान्याची' एका दृष्टीने वारसदार कंपनी. त्या कंपनीच्या अन्यायांच्या, अनाचाराच्या, लाचलुचपत, फसवाफसवीच्या बेलगाम सुलतानी कडवट आठवणी आणि त्या प्रकल्पाचे महाभयंकर अपयश मनात रेंगाळत असताना, मारुती उद्योग आणि सुझुकी यांचा सहयोग आणि त्याचे अपेक्षित फलित याबाबत जनसामान्याच्या मनात अनंत शंकाच्या पाली चुकचुकत राहाणे अत्यंत स्वाभाविक म्हटले पाहिजे.

'मारुती मोटार अखेर पुढल्या वर्षी बाजारात येणार ! १९८३ साली २० हजार मारुती मोटारी भारतीय रस्त्यांवरून धावू लागणार !' अशी वृत्ते वाचली की वाटते, सुझुकी या जपानी कंपनीच्या सहकार्याने भारतीय बनावटीच्या मारुती मोटारी पुढील वर्षी बाजारात यायच्या आहेत ! तसे हळूहळू करावे असा या सहयोगी प्रकल्पाचा उद्देश असला तरी पहिली दोन-तीन वर्षे, प्रतिवर्षी २० हजार 'तयार' सुझुकी मोटारी, 'मारुती मोटारी' म्हणून जपानमधून आयात होणार आहेत हे विसरून चालणार नाही. निदान आज तरी हा सहयोग-करार म्हणजे सुझुकी कंपनीच्या २० हजार मोटारींना आयातपरवानाच ठरणार आहे ! आपल्या मोटारींना परकीय बाजार शोधीत असलेल्या सुझुकीला हे मोठंच वरदान म्हटले पाहिजे. अशा आयात-परवान्याचा एवढा गाजावाजा सरकारने का करावा ?

पुढील पाच वर्षांत खरोखरच प्रतिवर्षी एक लाख जनता मोटारी या कारखान्याने निर्माण करायला सुरुवात केली तर भारतात एवढ्या मोटारींना मागणी राहील का ? काही तथाकथित तज्ज्ञांच्या मते प्रिमियर, हिंदुस्थान यासारख्या इतर मोटारनिर्मिती करणाऱ्या उद्योगाची सारी मागणी आता 'मारुती'कडे वळेल. कारण तिची

किंमत फक्त रुपये ५० हजार ! लिटरमागे ती २२ किलोमीटर धावणार, तिचं तंत्र अतिप्रगत असणार. शिवाय त्याच व तशाच दिसणाऱ्या गाड्यांचा भारतीय मोटारवाल्यांना आता अगदी कटाळाही आला असणार; पण मुंबईच्या प्रीमियर ॲटोमोबाइल्स् कारखान्याची आणि कलकत्त्याच्या हिंदुस्थान मोटार कपनीची वार्षिक उत्पादनक्षमता अनुक्रमे २० हजार व २५ हजार गाड्या एवढी आहे. (१९८१ साली त्यांनी अनुक्रमे १८८७४ व २३१९७ गाड्यांचे उत्पादन केले.) या व इतर कपन्यांच्या १० हजार गाड्या एवढी सारी मागणी पाच वर्षांनी मारुतीकडे झुकली तरी एक लाख मारुती मोटारी भारतात खपण्याएवढी मोटारीची मागणी भारतात वाढेल का ? या गोष्टीची दखल मारुती-सुझुकी सहयोगाने घेतली आहे व एक लाखाऐवजी ६० हजार मारुती मोटारी व ४० हजार व्यापारी वाहने निर्मिती एवढेच पंचवार्षिक उद्दिष्ट मारुती विक्री संघटनेने जमेस धरले आहे अशी बातमी आहे.

या देशात मोटारींची मागणी वाढावी म्हणून सरकार उत्सुक आहे असे दिसते उद्योगमंत्रालयाच्या परिसरात आणि अधिकारीवर्तुळात त्या दृष्टीने काय केले पाहिजे यावर चर्चा सुरू झाली आहे. मोटारींच्या किंमती कमी करण्याच्या दृष्टीने त्यांच्या उत्पादनावर बसविला जाणारा उत्पादनकर (एक्साईज् ड्यूटी) कमी करावा असे आपले मत असल्याचे आणि तशी शक्यता असल्याचे उद्योगमंत्री ना नारायण दत्त तिवारी म्हणाल्याचे गेल्या महिन्यात प्रसिद्ध झाले होते. पेट्रोलवरील करातही सूट द्यावी असे घाटत आहे पेट्रोल आणि पेट्रोलजन्य पदार्थांच्या एकूण उपयोगात या कराचे प्रमाण फक्त ५ टक्के आहे ही गोष्ट खरी; पण पेट्रोलच्या किंमती थोड्या उतरल्या तर लिटरला २२ कि मी. धावणाऱ्या मारुतीसारख्या गाड्यांना मागणी खचितच वाढेल मारुती ही ६५० किलोग्रॅम्स वजनाची. ड्रायव्हरसुद्धा चार माणसांची सुखेनैव सोय करणारी 'छोटा कुटुंब गाडी'. ती काही अलिशान कॉर्पोरेट स्टाफ कार नव्हे त्यामुळे स्कूटरसाठी वर्षानुवर्षे नंबर लावून बसलेली मडळी मारुती चटकन पसत करतील. उत्पादनकर आणि पेट्रोलवरील कर कमी करून मोटारीची मागणी वाढविण्याची कल्पना चांगली; पण उत्पादनकर मोटारीच्या एक्स् फॅक्टरी किंमतीवर अवलंबून असतो आणि पेट्रोलकरातील सूट इंधन कमी लागण्याच्या प्रमाणाशी निगडित केली तर 'मारुती' आणि फार तर 'ॲल्फिन' अशा छोट्या गाड्यांची मागणी वाढविण्यासाठीच त्यांचा उपयोग होईल केंद्र सरकार या करातील सुटीचा वापर असाच करील अशी इतर मोटार उत्पादन कारखान्यांना भीती वाटत आहे. मारुती उद्योगाच्या यशाशी सरकारची प्रतिष्ठा बांधली गेली असल्याने ही भीती निराधार वाटत नाही.

मारुती मोटारीची किंमत ४५ ते ५० हजार राहील ही कल्पना अनेक उद्योगतज्ज्ञांस आणि जाणकार मडळींना अवास्तव वाटत आहे प्रीमियरचे अध्यक्ष श्री. विनोद दोशी यांच्या मते, 'सरकारने मोटारींवरील कराचे प्रमाण २५% एक्साईज, ५% स्पेशल 'एक्साईज ड्यूटी १२% विक्रीकर मारुती मोटारीलाही लागू केले तर मारुती मोटारीची एक्स फॅक्टरी किंमत २२ ते, २५ हजार रुपये हवी सुझुकीसारखी अद्ययावत तंत्राचा वापर करणारी (सोफिस्टकेटेड टेक्नॉलॉजी) गाडी एवढ्या किंमतीत भारतात तयार करता येईल का ? हा खरा प्रश्न आहे. २९ जून १९८२ च्या फिनान्शियल एक्स्प्रेसमध्ये मारुतीची विक्री-किंमत ७० हजारावर जाण्याची शक्यता बोलून दाखविली आहे. ३५० सी. सी. 'एन्फील्ड' मोटार सायकलची किंमतही आज १६ हजारांच्या घरात आहे. मग ८०० सी. सी. एन्जिन आणि अद्ययावत तंत्र वापरलेली मारुती एवढ्या कमी किंमतीत कशी विकता येईल ? मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे मारुतीला मिळतील हे खरे; पण मोटारनिर्मितीत उत्पादनखर्चात मोठा वाटा पोलाद, लोखंड अशा सामग्रीचा असतो. उदाहरणार्थ, प्रिमियर पद्मिनीच्या उत्पादनखर्चात ६५ टक्के वाटा या सामग्रीचा तर २१ टक्के वाटा पगार-मजुरी यांचा असतो. मग मारुती गाडीच्या उत्पादनखर्चात इतकी तफावत राहाणे शक्य आहे का ?

## नाजूक आणि नखरेल

४० ते ५० हजार रुपये ही मारुतीचे सगळे भाग (सी. के. डी. पार्टस्-completely knocked down) जपानमधून आयात करून भारतात जुळणी केलेल्या मोटारीची किंमत आहे की मारुतीचे सर्व भाग भारतात तयार करून त्यांची गुरगावच्या कारखान्यात जुळणी केलेल्या सपूर्ण भारतीय बनावटीच्या मारुती मोटारीची किंमत आहे ? कारण सुझुकीला कमी खर्चात हे भाग जपानमध्ये तयार करता येतात. सुट्या भागांच्या आयातीवर करही खूपच कमी असतो. त्यामुळे अशा सी. के. डी. पार्टस्ची भारतात जुळणी हेच मारुती-सुझुकी सहयोगाचे प्रयोजन असेल तर मारुती मोटार ४५ ते ५० हजार रुपयात भारतात विकता येईलही ! कारण मारुतीने ९ एस्. एम्. ८० एफ् हे सुझुकी मॉडेल भारतात 'मारुती मोटार' म्हणून निर्माण्याचे ठरविले आहे. त्या मोटारीची जपानमधील किंमत फक्त २२ हजार रुपये आहे ! पण तरीही सी. के डी. पार्टस्वरील आयातकर १०० अगर १३५ टक्क्याऐवजी सरकारला २५ टक्क्यांवर आणायला हवा. 'मारुती' सरकारचे अपत्य असल्याने, सरकार त्याला 'मातृभावनेने' असे संरक्षण देईल अशी रास्त भीती इतर मोटारकारखानदारांना पडली आहे. 'प्रिमियर'ने मुंबईतील आपल्या तीन्ही कारखान्यांचे आधुनिकीकरण मांडले आहे. त्यावर ३८-३९ कोटी रुपयांची भांडवल-गुंतवण होणार आहे. ११०० सी. सी. एन्जिन बसविलेली, ६ माणसे सामावणारी, चार सिलिंडरवाली ऐसपैस अलिशान अशी 'फियाट १२४ डी' ही नवी गाडी वर्षा-दीड वर्षात बाजारात आणण्याचा त्या कारखान्याचा मनसुबा आहे. पद्मिनी लिटरमागे १२ किलोमीटर धावते; पण अद्ययावत तंत्र उपयोजिलेली 'फियाट १२४ डी' लिटरमागे १४ किलोमीटर धावेल या गाडीची वजन वाहून नेण्याची क्षमता अधिक असेल तरी तिचे वजन ९५० किलो एवढंच असल्याने ती सुरक्षितपणे अधिक वेगाने पळेल. मारुतीने मार्केट मारले तर प्रिमिअरचा हा सारा खटाटोप वाया जाणार ! हिंदुस्थान मोटर्सही आपल्या कारखान्याचे आधुनिकीकरण करून नवे मॉडेल बाजारात टाकू इच्छित आहे. मारुतीच्या झंजावाताने साऱ्याच योजना धुळीस मिळतात की काय अशी भीती साऱ्याच मोटारकारखानदारांना पडली आहे. बंगलोरच्या 'सनराईझ् ऑटो इंडस्ट्रीज लिमिटेड' या कंपनीने आपल्या तीन चाकी 'बादल' टेम्पोचे उत्पादन बंद करून इंग्लंड-

मधील ' रिलायंट मोटर कंपनीशी ' सहकार्याचा करार करून, त्या कंपनीकडून ' डॉलफिन ' नामक आपल्या मोटारीचे सारे सी. के. डी. पार्टस् आयात करून, बंगलोरला जुळणी करून ८५० सी सी एन्जिनवाली, चार सिलिंडरवाली, लिटरमागे २०·३ किलो मीटर पळणारी ' डॉल्फिन ' गाडी १९८४ मध्ये बाजारात टाकण्याची तयारी केली आहे. ही ' डॉल्फिन ' ग्राहकाला ८० हजार रुपयाना पडणार असूनही १९८५–८६–८७ सालापर्यंतचे कंपनीचे सारे उत्पादन (वर्षाला ३६०० गाड्या) ' बुक ' झाल्याचे त्या कंपनीने जाहीर केले आहे. मारुती मोटार खरोखरच बाजारात वार्षिक २० हजार या वेगाने उतरली आणि लाखापर्यंत तिने मजल मारली तर या कंपन्याचे सारे इमले ढासळून पडण्याची शक्यता नाकारता यायची नाही.

' मारुती 'मध्ये ८०० सी. सी. चे इंजिन असले तरी त्याचे कॉम्प्रेशन प्रिमियर पद्मिनीच्या ११०० सी. सी. इंजिनपेक्षा जास्त आहे त्यामुळे मारुतीला अधिक शुद्ध पेट्रोल लागेल. पेट्रोलची प्रतवारी ' ऑक्टेन 'मध्ये करतात. आज भारतात पळणाऱ्या मोटारी ' ऑक्टेन–८३ ' इतक्या शुद्धतेचे पेट्रोल वापरतात. मारुतीला ' ऑक्टेन–९३ ' या शुद्धतेचे पेट्रोल लागणार पेट्रोलची जितकी शुद्धता अधिक तेवढी इंधन काटकसर साधते भारतात ऑक्टेन–९३ आज सर्रास वापरात नाही. मारुती मोटारीला ऑक्टेन–८३ वापरावे लागले तर तीही लिटरमागे १७ किलोमीटरच पळेल ! पण टीकाकारांच्या या मुद्द्याला, इंधनात काटकसर साधावी म्हणून सर्व मोटारींना ' ऑक्टेन–९३ ' पुरविण्याचे सरकारने ठरविले तर, काटशह मिळतो हिंदुस्थान पेट्रोलियममधील इंजिनियर मित्राला विचारले, तेव्हा तो म्हणाला, 'पेट्रोलची शुद्धता वाढविणे रिफायनरीजना सहज शक्य आहे खर्चवाढ न होता, सरकारी आदेश आला की आम्ही ' ऑक्टेन–९३ ' चा पुरवठा सुरू करू ' आणि नजीकच्या भविष्यात दिल्लीहून असे आदेश सुटणे शक्यही आहे. मोटारकारखानदारांच्या प्रतिनिधींनी अलीकडे ' डायरेक्टर जनरल ऑफ टेक्निकल डेव्हलपमेन्ट ' (डी. जी टी. डी ) यांची भेट घेतली. त्या वेळी ते म्हणाले, ' १९८४ सालापासून भारतातील उतारूवाहक मोटारींनी ऑक्टेन–९३ ' वापरावे अशी शिफारस आम्ही केली आहे.' या वाक्यातले साल महत्त्वाचे. १९८४ साली मारुती मोटारी भारतीय रस्त्यावरून धावू लागणार आहेत !

मारुती-सुझुकी मॉडेल म्हणजे शहरी उत्तम स्थितीतील रस्त्यांवरून धावणारी नाजूक, नखरेल मोटार ! भारतातील खाचखळग्यांनी भरलेल्या आणि शहरातही अनेकवार उकरून पॅचवर्क केलेल्या रस्त्यावरून ही गाडी कशी धावणार ? ही आणखी एक शंका; पण त्यापेक्षा मोठी शंका अशी की,ही नाजूक गाडी अशा रस्त्यांवरून पळताना तिच्यात अनेकवार होऊ शकणारे बिघाड दुरुस्त करायचे तर तिच्या सोफिस्टिकेटेड टेक्नॉलॉजीमुळे हत्यारे, स्पेअरपार्टस्, ते तंत्र आत्मसात केलेली मेकॅनिक मंडळी जिथे तिथे कशी मिळणार ? ही हत्यारे, स्पेअरपार्टस् यासाठी पुन्हा कोट्यवधी रुपयाच्या आयातीचा प्रश्न आलाच. पुढे-मागे हा प्रश्न सुटेल हे खरे; पण दरम्यानच्या काळात मारुती मोटारधारकांची जी कुचंबणा होईल त्याचा परिणाम मारुतीच्या मागणीवर नक्कीच होईल भारतात आज मोजक्या दोन–तीन कंपन्यांच्या गाड्या निर्माण होत असल्याने मोटारीच्या बाजारात आज एक प्रकारची मक्तेदारीच असल्याने ग्राहकांची वानवा नाही. मोटारीसाठी चार–चार वर्षांच्या उत्पादनासाठी नंबर लागलेले आहेत. मारुती या धंद्यात उतरल्यावर या बाजारात जी स्पर्धा निर्माण होईल त्या स्पर्धक बाजारात वरील मुद्दा महत्त्वाचा म्हणायला हवा .

भारतातील कुटुंबे अजूनही ५ ते ६ माणसांची असल्याने मारुतीपेक्षा लोक जोमियर वा हिंदुस्थान गाड्याच कुटुंबगाड्या म्हणून पसंत करतील व ४ माणसाची सोय करणाऱ्या मारुतीला तेवढी मागणी राहाणार नाही असे या जुन्या कंपन्यांना वाटत आहे; पण ' एक वा दोन बस्स 'च्या जमान्यात पुढील १० वर्षांत मारुती हीही ' कुटुंबगाडी 'च ठरेल !

' मारुती 'संबंधीच्या या साऱ्या आशंका जमेस धरूनही मारुती ही सर्वांत स्वस्त, (किंमतीतही आणि पेट्रोल वापरातही) गाडी ठरणार असल्याने ती गाडी या धंद्यात बाजी मारणार असे स्पष्ट दिसत आहे या देशातील मोटारबाजाराचे संपूर्ण ' मारुतीकरण ' झाले तर परकीय चलनात प्रतिवर्षी ७३ ५ दशलक्ष डॉलर्सची म्हणजे ६६.१५ कोटी रुपयाची बचत होईल. पेट्रोलची किंमत टनामागे २१० डॉलर्स धरली आणि मारुती मोटारीमुळे पेट्रोलवापरात ५० टक्के काटकसर साधेल असे मानले तर प्रतिवर्षी ११०० कोटी रुपये मध्यपूर्वेत जायचे वाचतील. हे फायदे विचारात घेतले तर केंद्रसर-

## ' मारुती ' बाजारात आल्यावर स्पर्धा होणारच ! कारण ?

| | | प्रिमियर पद्मिनी | प्रिमियर फियाट | ॲम्बॅसडर मार्क IV | मारुथी | ऑल्फिन |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | इंधन वापर (दरलिटरमागे कि. मी.) | १२ | १४ | ८ | २२ | २०.३ |
| २) | एक्स शोरूम किंमत रु. | ६९४२७ | ७३००० | ७३५२५ | ४५००० | ८०००० |
| ३) | आसने | ५ | ६ | ६ | ४ | ५ |
| ४) | जास्तीत जास्त अश्वशक्ती | ४० | ४७.५ | ५० | ३९.५ | ३८५ |
| ५) | जास्तीत जास्त दरताशी वेग–किलोमीटर्स | १२७ | १३३ | ११९ | ११० | १३० |
| ६) | वेग घेण्यास लागणारा काल सेकंदात | २४.३ | २३.१ | २४.८ | –– | ११.८ |
| ७) | दारांची सख्या | ४ | ४ | ४ | ४ | २ |

कारने अगर राज्यसरकारांनी मारुतीला आपल्या करविषयक अगर इतर धोरणात झुकते माप दिले तर ते वावगे आहे असे कुणाला म्हणता यायचे नाही.

केंद्र आणि राज्यसरकारे उतारूवाहू छोटया गाडयांची मोठीच गिऱ्हाईके. ही मागणी तर मारुतीला मिळेलच प्रतिवर्षी निर्माण होणाऱ्या मोटारींपैकी २० टक्के गाडया टॅक्सीवाले घेतात राष्ट्रीयीकृत बँका त्याना कर्जपुरवठा करीत असल्यामुळे ही टॅक्सीवाल्याची मागणीही मारुतीकडेच झुकणार. टॅक्सीचे दरही उतरतील हा तुम्हा-आम्हाला दिलासा !

या सगळ्याचा मथितार्थ हा की, जर मारुती उद्योगाने भारतीय रस्त्यावर सुरळीतपणे धावणारी मारुती-सुझुकीगाडी (त्यासाठी सुझुकीच्या आजच्या मॉडेलमध्ये थोडे फेरफार करावे लागतील) बाजारात टाकली, अॅन्सिलरी कारखाने व सर्व्हिसिंग स्टेशन्स् वेगाने उभारली व आपले वार्षिक उत्पादन २० हजारांवरून १९८८-९० सालापर्यंत एक लाखावर नेले, किंमत ५० हजार रुपयाच्या आसपास राखली तर 'मारुती' भारतातील उतारूवाहू गाडयाचा सपूर्ण धंदा आपल्या चाकाखाली आणील यात शंका नाही; पण आज तरी ही कागदावरच असलेली 'जरतरी' भाषा आहे. मारुती मोटारीचे स्वप्न कै. संजय गांधीनी या देशाच्या जनतेपुढ ठेवले होते; पण ते साकारण्याचा प्रामाणिक प्रयत्न झाला नाही. उशीरा का होईना 'मारुती उद्योगाने' ते प्रत्यक्षात उतरविणे म्हणूनच आवश्यक आहे. सरकारने कार्यक्षमतेचा बळी न देता, अनिर्णय, दिरंगाई, लाचलुचपत, लालफीत, वशिलेबाजी, ओव्हरस्टाफिंग, वसाहती, इमारती, सुखसोयी यावर बेसुमार खर्च, जमाखर्चाचा बेहिशेब यासारख्या सरकारी उद्योगाना लागलेल्या जळवाना कटाक्षाने दूर ठेवून, मारुती उद्योगाचे यश हा प्रतिष्ठेचा प्रश्न मानला तर सरकारच्या जिरेटोपात यशाचा तुरा खोवला जाईल ! पण असं घडेल का ? □

# वृत्तपत्रस्वातंत्र्य-का व कसे ?

ह. कृ. परांजपे

लोकशाही राज्यव्यवस्थेत नागरिकाला सर्व घटनांची माहिती उपलब्ध असणे आणि देशाच्या धोरणाबाबतच्या वेगवेगळया विचारधारा त्याला समजावून घेता येणे हे फार महत्त्वाचे आहे. एखाद्या छोटया शहरातील लोकशाही राज्यात एकमेकाच्या प्रत्यक्ष भेटीत अगर सभा आणि चर्चा यामधून हे सर्व होऊ शकेल; पण भारतासारख्या उपखंडात लोकशाही राज्यव्यवस्था चालवायची तर ही उद्दिष्टे वृत्तपत्रासारख्या माध्यमामार्फतच साध्य होणे शक्य आहे.यामुळेच वृत्तपत्रस्वातंत्र्याला लोकशाहीचा गाभा म्हणणे योग्य ठरते. कोणत्याही पुढारलेल्या अर्थव्यवस्थेत श्रमविभागणीचे तत्त्व महत्त्वाचे असते त्याअन्वये वृत्तपत्रासारखी माध्यमे म्हणज नागरिकाचे डोळे, कान आणि विचार करण्याचा महत्त्वाचा अवयव असे म्हणता येईल.

भारताच्या आजच्या परिस्थितीत वृत्तपत्रस्वातंत्र्याला विशेषच महत्त्व आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शन ही आधुनिक माध्यमे पूर्णपणे सरकारी मालकीची आणि अंकित असल्यामुळे सर्व तऱ्हेची माहिती नागरिकापर्यंत पोचण्यास आणि वेगवेगळया विचारप्रवाहाचे त्यांस दर्शन होण्यास या माध्यमांचा विशेष उपयोग नाही. याचबरोबर आपला विशेषत: गेल्या काही वर्षांतील अनुभव असे दर्शवतो की, सरकारी चुका, अन्याय, भ्रष्टाचार वगैरे शोधून काढण्यात आणि त्यावर उपाययोजना सुचवण्यात राजकीय पक्ष आणि विधिमंडळे ही कमकुवत ठरली आहेत. कोणत्याही दगडाला शेंदूर माखवून त्याला आम्ही गणपती म्हणून निवडून आणू आणि विधिमंडळात बसवू अशी महत्त्वाच्या राजकीय पक्षानी परंपरा घालून दिली आहे. काकासाहेब गाडगीळ एकदा म्हणाले होते त्याप्रमाणे अनेक पक्षाच्या दृष्टीने विधिमंडळाचा उत्तम सभासद तो की जो 'मुंडी नीचे हात उपर' अशा तऱ्हेने वागतो. या परिस्थितीत वृत्तपत्रांवर जास्त जबाबदारी पडते. लोकांच्या अडीअडचणी, गाऱ्हाणी आणि त्यांच्यावर होणारे अन्याय यांना वाचा फुटली तर त्यावर उपाययोजना करणे शक्य होईल. असे झाले नाही तर लोकामधील अन्यायाची भावना वाढती राहून केव्हा तरी त्या अशांततेतून स्फोट होईल, हे राज्यकर्त्यांनीही लक्षात ठेवले पाहिजे. तेव्हा वृत्तपत्रस्वातंत्र्यामुळे जरी शासनास आणि राज्यकर्त्यांस काहीसा त्रास झाला, तरी शहाण्या राज्यकर्त्याने वृत्तपत्रस्वातंत्र्याचा पाठपुरावा केला पाहिजे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळातील इतिहास बघितला तर असा निष्कर्ष काढणे चूक होणार नाही की, वृत्तपत्रस्वातंत्र्याला सर्वांत जास्त धोका राज्यकर्त्यांकडून असतो. जे राजकीय पुढारी स्वातंत्र्यापूर्वी वृत्तपत्रस्वातंत्र्याची बाजू हिरीरीने मांडत होते त्यांचीच वृत्ती सत्तेवर आल्यावर किती लवकर बदलली हा ताजा इतिहास आहे. स्वातंत्र्यानंतर चारच वर्षांत, १९५१ मध्ये वृत्तपत्रात येणाऱ्या मजकुराविरुद्ध सरकारला पावले उचलता येतील असा कायदा जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारने, राजगोपालाचारी गृहमंत्री असताना संसदेकडून मान्य करून घेतला. दु:खात सुख एवढेच होते की, या कायद्याची मुदत तीन वर्षेच ठेवण्यात आली होती आणि ती संपल्यावर मुदत पुन्हा वाढवता आली नाही; पण राज्यकर्त्यांची आपणास न आवडणाऱ्या मताबद्दल आणि ती मांडणाऱ्या वृत्तपत्रांबद्दल असणारी असहिष्णुता ही हळूहळू वाढत होती, याची उदाहरणे अनेक देता येतील मुंबईचे टाइम्स-पत्र दारूबंदीविरुद्ध लिहीत राहिले, या कारणास्तव मोरारजी देसाई मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यानी त्या पत्राच्या सरकारी जाहिराती बंद केल्या आणि असा दावा मांडला की, सरकारच्या विरुद्ध लिहिणाऱ्या वृत्तपत्राना जाहिराती देण्यास सरकार बांधलेले नाही. चौधरी चरणसिंग उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री असताना त्याना न आवडणाऱ्या बातम्या देण्याबद्दल त्यांनीही सरकारी यंत्रणेचा उपयोग वृत्तपत्रांविरुद्ध करण्यास मागेपुढे पाहिले नव्हते. बिजू पटनाईक ओरिसाचे कॉंग्रेस मुख्यमंत्री असतानाच आज बिहारमध्ये ज्या तऱ्हेचा कायदा करण्याचे घाटत आहे, त्यासारखा कायदा

१९६१ साली त्यांनी विधिमंडळाकडून मान्य करून घेतला होता. त्याचा विशेष उपयोग करण्यात आला नाही ही गोष्ट वेगळी !

हे मात्र स्पष्ट दिसते की, १९६९ नंतरच्या काळात असहिष्णुतेचे वातावरण एकूणच वाढले. सुरुवातीला असा आरोप करण्यात आला की, वृत्तपत्रे ही भांडवलदारांच्या मालकीची असल्यामुळे समाजवादी धोरणांना ती विरोध करतात. सरकारी धोरणांना विरोध करू नये; विरोधकांची भाषणे आणि टीका यांना विशेष प्रसिद्धी देऊ नये आणि विशेषतः काँग्रेसपक्ष आणि इंदिरा गांधी यावर टीका करू नये अशी सरळसरळ आणि वाढती मागणी राज्यकर्त्यांकडून करण्यात येऊ लागली. जी वृत्तपत्रे हे मान्य करीत नव्हती त्याना धमकावण्या देण्यात येऊ लागल्या आणि शेवटी १९७५ मध्ये आणीबाणीची घोषणा केल्यानंतर वृत्तपत्रावर पूर्वतपासणीचे बंधन घालण्यात आले. पंतप्रधानानी त्या वेळी असे जाहीरपणे सांगितले की, वृत्तपत्रावर घातलेले निर्बंध योग्यच होते, याचा पुरावा म्हणजे असे निर्बंध घातल्यानंतर आणि मूठभर लोकाना पकडल्यानंतर देशात आणीबाणीला विरोध झालाच नाही ! सरकारला देशात विरोध आहे ही केवळ वृत्तपत्रांनीच उठवलेली आवई होती. वृत्तपत्रानी बेजबाबदार लिहिणे बद केल्यावर कुत्रेसुद्धा भुंकले नाही असे मत पंतप्रधानांनी व्यक्त केले.

## राज्यकर्त्यांची फसगत

देशातील वृत्तपत्रांची स्वातंत्र्यासाठी झगडण्याची ताकदही स्वातंत्र्यपूर्व काळाच्या तुलनेने किती कमी झाली आहे हेही त्या काळात स्पष्ट झाले.बहुतेक वृत्तपत्रे नमून गेली. लालकृष्ण अडवानी पुढे म्हणाले, त्याप्रमाणे सरकारने त्यांना वाकण्यास सांगितले; पण ते तर पालथे पडले! झगडण्याची ताकद काही वर्तमानपत्रांनी दाखवली, नाही असे नाही; पण त्यातली बहुतेक छोटी आणि विशिष्ट गटांनी अगर झगडणाऱ्या व्यक्तींनी चालवलेली होती साधना, भूमीपुत्र, (Openion, Main Stram, Seminar) ही त्यातील काही उदाहरणे म्हणता येतील. मोठ्या वृत्तपत्रापैकी फक्त (Statsman आणि Indian Express) यानी काहीसा ताठरपणा दाखवला; पण काही काळाने सरकारी सत्तेपुढे काहीशी मान झुकवणे त्यांनाही आवश्यक झाले.

अर्थात, लोकमत कोणत्या दिशेने चालले आहे, देशात वेगवेगळ्या भागांत कोणत्या घटना घडत आहेत याची खरीखुरी माहिती बाहेर आली नाही तर राज्यकर्त्यांचीसुद्धा कशी फसगत होते ते आणीबाणीच्या अनुभवातून स्पष्ट दिसून आले. विशेषतः सक्तीच्या नसबंदीमुळे सरकारविरुद्ध लोकमत किती बिथरले होते याची राज्यकर्त्यांना मुळीसुद्धा जाणीव न होण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे वृत्तपत्रावरील निर्बंध असे म्हणण्यास हरकत नाही. निवडणुका जाहीर करून देशातील एकूण परिस्थिती बदलून जाईपर्यंत इंदिरा गांधी आणि त्यांच्या पाठीराख्यांना लोकमताचा अदाज आला नव्हता, हे आता स्पष्ट झाले आहे.

पण या अनुभवाने राज्यकर्ता-वर्ग काही शिकला आहे असे दिसत नाही. फ्रान्स देशातील बूरबॉन राजाप्रमाणे अनुभवाने न शिकण्याची त्यांची प्रवृत्ती आहे त्याचा परिणाम म्हणजे १९८० मध्ये पुन्हा सत्तेवर येताच इंदिरा गांधी आणि त्यांच्या पाठीराख्यांची तीच वृत्तपत्रस्वातंत्र्यविरोधी वृत्ती पुन्हा दिसू लागली आहे. वृत्तपत्रवाले म्हणजे विंचू आणि साप यांसारखे त्रासदायक प्राणी, त्याना ठेचूनच काढले पाहिजे हे अब्दुल रहमान अंतुले यांचे म्हणणे त्यांच्या पक्षातील अनेक सहकाऱ्यांना मान्य आहे असे समजण्यास जागा आहे. बंगलोरमध्ये काही वर्तमानपत्रांनी मुख्यमंत्री गुडूराव यांना न आवडणारी बातमी छापल्याबद्दल त्यांच्या कार्यालयांना घातला गेलेला घेराव आणि त्याबाबत काही उपाययोजना करण्यास स्थानिक पोलिसानी दिलेला नकार तेच दर्शवितो जशी अनेक उदाहरणे देता येतील. मुख्य म्हणजे तामिळनाडूमधील सरकार जरी काँग्रेस पक्षाचे नसले तरी त्या सरकारनेही वृत्तपत्रस्वातंत्र्यास विरोधी अशी वृत्ती दाखवून विधिमंडळाकडून तो कायदा मान्य करून घेतला हे लक्षात ठेवले पाहिजे. बिहार विधिमंडळात जगन्नाथ मिश्रा यांनी मान्य करून घेतलेला कायदा हा त्याही पुढे जातो जरी या कायद्याचा उपयोग केवळ बेजबाबदारपणे वागणाऱ्या आणि बीभत्स अगर अश्लील बातम्या छापणाऱ्या वृत्तपत्रांविरुद्ध केला जाईल असे म्हणण्यात आले असले तरी आजवरचा अनुभव पहाता एकदा वेगवेगळ्या सरकारांना अशी सत्ता मिळाली की, तिचा उपयोग वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध होणारी टीका, सरकारला ज्यामुळे उपद्रव होतो अशा भ्रष्टाचार इत्यादीबाबतच्या बातम्या या सर्व थांबवण्यासाठीच होईल अशी भीती वाटते. बिहारमधील कायद्याबद्दल पंतप्रधानांनीही, त्यात विशेष काही चुकीचे नाही असे वक्तव्य केल्यामुळे तर हा धोका मोठा आहे हे जास्त स्पष्ट झाले आहे.

या सर्व अनुभवावरून लोकशाहीचे नारे आम्ही स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतरही कितीदाही घोषिले असले तरी सहिष्णुतेची मुळे आपल्या समाजात आणि विशेषतः राज्यकर्त्या वर्गात चांगली रुजलेली नाहीत हे स्पष्ट आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक चुकीचे कायदे आणि पद्धती स्वातंत्र्योत्तर काळातही तशाच चालू राहिल्या आहेत उदा पोस्टाच्या कायद्याप्रमाणे सरकारी अधिकारी पोस्टातील कोणताही लिफाफा उघडून बघू शकतात आणि त्यासाठी संबंधित नागरिकांस कळविण्याचीही त्यांच्यावर सक्ती नाही. स्थानिक अधिकारी तारा थांबवू शकतात. असल्या तरतुदींचा वृत्तपत्रांकडे बातम्या न येऊ देण्यासाठी आवश्यक तेव्हा उपयोग करता येईल हे उघड आहे. यापेक्षाही आणखी एक धोकादायक गोष्ट म्हणजे आणीबाणी जाहीर केलेली नसतानासुद्धा वृत्तपत्रांवर पूर्वतपासणीचे नियंत्रण सरकार घालू शकते, असा कायदा हा सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवला आहे.

याचबरोबर विधिमंडळाच्या हक्कभंगांबाबत वृत्तपत्रांना जी असुरक्षिततेची स्थिती आहे तीही धोक्याची आहे. भारतीय घटना मान्य होऊन तीस वर्षांचा काळ उलटून गेला तरी संसदेने अगर कोणत्याही विधिमंडळाने स्वतःचे हक्क निश्चित करणारा कायदा केलेला नाही हे एक क्षेत्र असे आहे की, कोणत्या कायद्यान्वये आपण गुन्हेगार आहोत हे ठरवले जाईल याची नागरिकाला माहिती नाही. विधिमंडळाला हक्कभंग झाला असे वाटले तर तसा आरोप करता येतो आणि कोणतीही शिक्षा करता येते. ही परिस्थिती बदलावी म्हणून कोणताही राजकीय पक्ष तड लावीत नाही.

आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे आर्थिक विकास योजनाबद्ध होण्याच्या उद्दिष्टाने भारतात सरकारकडे खपसे अधिकार सोपवण्यात आले आहेत या अधिकाराचा आणि राष्ट्रीकृत उद्योगधंद्याचा वापर सरकार आपणास न आवडणाऱ्या वृत्तपत्राची मुस्कटदाबी करण्यासाठी करणार नाही अशी खात्री देता येत नाही. राष्ट्रीकृत बँका आणि त्यांचे व्यवहार, आयातनियंत्रणे आणि विशेषतः वृत्तपत्रास लागणाऱ्या कागदाची आयात आणि सरकारी मालकीखाली असणारी वीजपुरवठ्याची तजवीज यांचा असा उपयोग होणे अशक्य नाही निदान वीजपुरवठ्याच्या बाबतीत असा उपयोग केला गेल्याची आणीबाणीच्या काळातली उदाहरणे आहेत.

हे सर्व लक्षात घेतले तर असे ध्यानात येईल की, वृत्तपत्रस्वातंत्र्य जास्त बळकट करण्याची आवश्यकता आहे. सध्याच्या घटनेमध्ये

वृत्तपत्रस्वातंत्र्यासाठी वेगळी तरतूद केलेली नाही. तशी तरतूद करण्याची आवश्यकता आहे की नाही यावर तज्ज्ञामध्ये एकमत नाही; पण वृत्तपत्रस्वातंत्र्यावर घाला आणण्याची काही पक्षाची प्रवृत्ती इतकी उघड आहे की, जेव्हा अशी संधी मिळेल तेव्हा वृत्तपत्रस्वातंत्र्य हे घटनेत विशेष तरतूद करून जास्त बळकट करावे; किंबहुना सर्वच माध्यमांचा स्वातंत्र्यासाठी घटनेत विशेष तरतूद करण्याचा प्रयत्न करावा असे सुचवणे आवश्यक वाटते.

## जबाबदारीची जाणीव

अनेक वेळा राज्यकर्त्यांकडून असे म्हटले जाते की, वृत्तपत्रांनी आपल्या हक्काबरोबर आपल्या जबाबदारीचीही जाणीव ठेवावी. हे म्हणणे रास्तच आहे; पण भारतातील महत्त्वाची वर्तमानपत्रे, मग ती वेगवेगळ्या राष्ट्रीय भाषामधली असोत किंवा इग्रजातील असोत, जबाबदारीने वागत नाहीत असे कोणी म्हणू शकेल काय? खुनाखुनीच्या बीभत्स अगर लैंगिक बातम्यांवर भारतीय वर्तमानपत्रात किती भर असतो? युरोप अगर अमेरिका येथील सर्वसामान्य वृत्तपत्रांशी तुलना करता आमची वृत्तपत्रे जबाबदारीने वागतात असे कोणीही म्हणणार नाही का? सरकारला असा कोणताही पुरावा देता आलेला नाही की, ज्यामुळे भारतातील वृत्तपत्रे विशेषकरून बेजबाबदारीने वागतात असे दाखवता येईल.

याचा अर्थ असा नव्हे की काही वर्तमानपत्रे बेजबाबदारीने वागत नाहीत; पण एक तर त्यांचा खप खूप थोडा असतो आणि दुसरे त्यांना वाटेवर आणण्यासाठी पुरेसे कायदे आज आहेत खरी गोष्ट अशी की, आजच्या राज्यकर्त्यांच्या मनात डाचत आहेत ती वृत्तपत्रे ही नव्हेत. डाचत आहेत ती महत्त्वाची वृत्तपत्रे की, जी भ्रष्टाचाराच्या बातम्या देतात आणि टीका करून सरकारला अडचणीत आणतात.

या प्रश्नाकडे पाहताना असेही ध्यानात ठेवले पाहिजे की, वृत्तपत्रस्वातंत्र्य टिकविण्यासाठी केवळ विरोधी पक्षावर अवलंबून राहून चालणार नाही. हे पक्ष राज्यावर आले तर तेही आजच्या राज्यकर्त्यांचीच पद्धती अनुसरणार नाहीत याची खात्री बाळगता येत नाही. आकाशवाणी सरकारच्या नियंत्रणाखालून काढून स्वतंत्र करण्याची वर्गिस समितीची शिफारस जनता सरकारने बाजूला ठेवली हे या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे. मजूरसंघटना, धार्मिक गट, वेगवेगळे हितसंबंधी गट आणि देशभर वाढत असणाऱ्या गुंडांच्या टोळ्या या सर्वांकडून वृत्तपत्राना धोका आहे, याची जाणीव ठेवली पाहिजे. आपणावरील टीका सहन करण्याची तयारी यांपैकी फार थोडे गट दाखवतात. असहिष्णुता कोणत्या थरापर्यंत जाऊ शकते याची जगत्‌नारायण यांचा खून आणि ओरिसातील छरबीराणीचे झालेले हाल ही उदाहरणे विसरून चालणार नाही.

तेव्हा वृत्तपत्रांमध्ये स्वातंत्र्य टिकविण्यासाठी सर्वसाधारण नागरिकांचा भरघोस पाठिंबा मिळवला पाहिजे.

हे कसे होईल? वृत्तपत्राची सध्याची वृत्ती अशी आहे का की, ज्यामुळे सामान्य नागरिकाला त्यांच्या स्वातंत्र्याचे महत्त्व वाटेल? सामान्य माणसाचे प्रश्न, त्याची गाऱ्हाणी, त्याच्यावर होणारे अन्याय यांची वृत्तपत्रात कितीशी कदर होते? अमिताभ बच्चनचा आजार बातमीदाराना जास्त महत्त्वाचा वाटतो की, आठ महिने वेतन न मिळालेल्या गिरणीकामगार कुटुंबांची स्थिती वर्णन करणे? झोपडवस्त्यांतील रहिवाश्यांची खरी माहिती करून घेण्यात वृत्तपत्रांना रस वाटतो का? की ही सर्व गुंडमंडळी आहेत अशी उच्चभ्रू वृत्ती दाखवली जाते? औद्योगिक झगड्यात दोनही बाजू दाखवल्या जातात की मालकांची बाजू सहजपणे मांडली जाते?

हे प्रश्न विचारले म्हणजे असे सहज लक्षात येते की, बरीचशी वृत्तपत्रे या कसोटयाना टिकत नाहीत. वृत्तपत्राची मालकी आणि इतर व्यवसायाप्रमाणेच या व्यवसायातही माजलेला भ्रष्टाचार ही त्याची कारणे आहेत; पण याउलट गेल्या काही वर्षांत तरुण व्यावसायिक पत्रकारामुळे का होईना, मोठ्या वृत्तपत्राच्यामध्ये या बाबतीत अनेक बदल घडून येत आहेत. मजुराची बाजू अनेक वृत्तपत्रात मांडली जाते. असंघटित मजुराचे प्रश्न तर वृत्तपत्रानी जितके पुढे आणले आहेत तितके कोणीच आणलेले नाहीत संशोधकी वृत्तसंकलनाची नवीन प्रवृत्ती फार महत्त्वाची आहे. यामुळे देशात वेगवेगळ्या भागात होणारे अन्याय आणि भ्रष्टाचार हे जनतेपुढे आलेले आहेत. या प्रवृत्तीमुळे नागरिकांचा वृत्तपत्राना वाढता पाठिंबा राहील यात शंका नाही.

अर्थात वृत्तपत्रव्यवसाय निरोगी रहावयाचा तर त्यात मक्तेदारीच्या प्रवृत्ती वाढू नयेत हे उघड आहे. यासाठी मक्तेदारीविषयक कायद्याचा उपयोग होऊ शकेल. याचबरोबर वृत्तपत्रानी स्वत विषयीमहत्त्वाची सर्व माहिती जनतेपुढे उघडपणे ठेवण्याचे बंधन स्वीकारणे हेही उपयोगी होईल. इतरांवर टीका करण्याच्या स्वातंत्र्याबरोबर स्वत.चा निरोगीपणा सिद्ध करण्याची तयारी वृत्तपत्रांनी दाखवली पाहिजे. तेव्हा वृत्तपत्राची मालकी कोणाकडे आहे, त्याचे नियंत्रण कोण करतात, जाहिरातीचे उत्पन्न प्रमुखत: देशी आणि विदेशी कोणत्या जाहिरातदारांकडून मिळते इ. महत्त्वाची माहिती आपल्या वाचकांपुढे ठेवणं वृत्तपत्रानी मान्य केले पाहिजे.

वृत्तपत्रस्वातंत्र्याचा आणखी एक महत्त्वाचा भाग असा की; वृत्तपत्र जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोचले पाहिजे. याबाबतीत भारताची स्थिती आज वाईट आहे. दर हजार लोकसंख्येमागे एकूण आशियाखंडात वृत्तपत्राच्या ६५ प्रती खपतात. जपानमध्ये ५०८, मलेशियात ७५, लंकेत ४९ असे याचे प्रमाण आहे, तर भारतात ते अजून २० सुद्धा नाही! उत्तरप्रदेश आणि बिहार या भागात तर ते दरहजारी ४.५ इतके कमी आहे. तेव्हा वृत्तपत्रस्वातंत्र्याची ज्याना महती वाटते त्यांनी वृत्तपत्रांचा खप कसा वाढेल याकडे लक्ष दिले पाहिजे. याकरता एका बाजूने काही चढाओढ चालू ठेवण्याकडे लक्ष देऊनही मोठ्या प्रमाणावर वृत्तपत्राची छपाई आणि व्यवस्था केल्याने ती स्वस्त निघू शकतात हे डोळ्याआड करून चालणार नाही. वृत्तपत्र—कागदाचे भाव प्रचंड प्रमाणात वाढत आहेत. अशा वेळी वृत्तपत्राच्या जाहिरातीपासून येणाऱ्या उत्पन्नावर नियंत्रण आणणे हे सुद्धा काही प्रमाणात सामान्य नागरिकाना स्वस्तात वृत्तपत्र मिळण्याच्या आड येऊ शकेल. भारतसरकारने बसवलेला वृत्तपत्र कागदावरील आयात-कर हा सुद्धा सामान्य नागरिकांस वृत्तपत्र मिळण्याच्या विरोधी आहे असे म्हणावे लागेल.

वृत्तपत्रस्वातंत्र्याच्या अशा अनेक बाजू आहेत. मुख्य मुद्दा असा की, भारतातील वृत्तपत्रे ही भारतातील लोकशाहीचा एक मोठा पाया आहे हे विशेष लक्षात ठेवले पाहिजे भारतीय वृत्तपत्रे ही जगाच्या या भागात असणाऱ्या कोणत्याही वृत्तपत्रापेक्षा जास्त स्वतंत्र आणि जबाबदार पत्रे आहेत ही अभिमानाची गोष्ट आहे. त्यांच्या स्वातंत्र्यावर करण्यात येत असलेला हल्ला हा एकूणच नागरी स्वातंत्र्यावरील हल्ल्याची नांदी ठरू शकेल आणीबाणीपूर्वीचा अनुभव हेच दर्शवितो. तेव्हा वृत्तपत्रवाले आज जात्यात सापडत असले तर आपण सुपात आहोत हे न विसरता लोकशाही मानणाऱ्या सर्व नागरिकांनी वृत्तपत्रस्वातंत्र्याचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे ❑

## पुस्तके

# बापटांची 'मानसी'

प्रा. वसंत बापट यांना नुकतीच साठ वर्षे पूर्ण होत आहेत. पण छे ! खरंच वाटत नाही. उगीचच कारण नसताना ' साठी अणि बुद्धी नाठी ' ही म्हण आठवते. पण बापटांच्या बाबतीत ही म्हण आठवणं म्हणजे चक्क खुळेपणा आहे ! ते चिरतरुण आहेत. त्यांनी मराठी रसिक मनाचा कब्जा घेतला आहे. त्यांना सौंदर्य जाणवलं आहे अन् म्हणूनच त्यांची भुलवणारी ' मानसी ' सर्व रसिकांना भुलवून जाते.

हिरवीगर्द मोरपंखी हवा असावी, अवखळ चुकार वाट चुकवणारे, गोल गोल गिरक्या घेत जाणारे आरसपानी पाण्याचे ओहोळ बेफाम व्हावेत, पडणारी गच्च मेघांची निळीदिठी नुकतीच उतरून सोन–सूर्याची किरणमिठी आभाळावर पडावी आणि धुंदफुंद करणाऱ्या वाऱ्याने हलुवार मोगरीच्या वेलीलाच स्पर्श करून जावे; वातावरण सुगंधी व्हावे आणि अशा वेळी बापटांची ' मानसी ' हातात असावी. निसर्गाच्या मोकळ्या परागणात येऊन वाचावी, आणि बापटांनी हळूच म्हणावं.

' तशाच सगळ्याच कविता
तुझ्यामुळे आणि तुझ्यासाठी
अस्तित्वच जर तू भारलेले
तर काय नवल
सगळेच शब्द तू गर्भारलेले. '

कुणी भारले बापटांचे एवढे शब्द ! शब्द म्हणजे अमोल खाण, अन् त्याच वेळी डोळ्यांसमोर येऊ लागतं. पावसाच्या टपोऱ्या थेंबांच्या भाराने गर्भारलेले अवकाश ! संपूर्ण मानवजातीचं अस्तित्व जर या अनंत अवकाशाने भारलं जात असेल, तर एक सामान्य माणूस तो तर काय ! त्याचं अस्तित्व कुणा दुसऱ्या एका अनुपम व्यक्तीनं भारलं गेलं नाही तर यात नवल काहीच नाही. त्याच व्यक्तीपाठी मग जान कुर्बान देण्याची तयारी ठेवली तर काही कविता केवळ तिलाच अर्पण केल्या, तर ती तर अगदी क्षुल्लक बाब ! त्यात कधी अस्वस्थ करणारे शब्द येतील, तर या वैराणात फुटून जाणाऱ्या व्यक्तीला माफ करण्याचे शब्द येतील,

' माफ कर शब्दांना, तू अस्वस्थ
झालीस तर
माफ कर शक्य तर मलाही.
तुझ्या हसऱ्या डोळ्यांच्या काठांजवळ
एक अश्रू उभा राहिला तर त्याला
माफ कर. '

संपूर्ण माळभर पोपटी मनं घेऊन हिरवळ उत्फुल्ल झालाय. एकच रानफूल डौलात उभं आहे जणू त्याच्या पाकळीवर पाण्याचा एकच थेंब चमकतो आहे, हसऱ्या डोळ्यांच्या काठाजवळ अमल्यासारखा ! कुणी अस्तित्व भारलेल्या बापटांचे त्या व्यक्तीजवळील हितगुज ऐकण्यासाठी कुणाही सामान्य माणसाचं मन आतुरलं असणार, पण त्याचपूर्वी बापट म्हणतात,

' खरेच मी आता सिद्ध आहे
स्वत्वाच्या खडावा काठावर ठेवून. '

मृगजळात समाधी घ्यायला सिद्ध असणाऱ्या बापटांचे मृगजळ मग आपणालाही मोहवू लागते आणि त्यापाठी आपणही धावू लागतो. त्या मृगजळात चालणारे अल्लड, बालिश. वेंधळेपणाचे खेळ आपणही पहात बसतो. डोळ्यांनी दिसतं म्हणून नव्हे, तर उत्सुकता म्हणून, एक अनिवार ओढ म्हणून; पण यांचा खेळ तरी कुठला ? बापटच सांगतात,

' तुझा आवडता खेळ, आंधळी कोशिबिर
डोळ्यांवर पट्टी बांधताना
कधी कधी तुझे ओठ लागत
माझ्या कानांना
कधी कधी माझे श्वास
तुझ्या भुरक्या केसांतून
दुडदुडत जात. '

हा खेळ बालिश वाटावा म्हटला तर त्यांना तर एकमेकांच्या स्पर्शाचीही ओढ लागली आहे; तरीही तो बालिशपणा मनाला मोहवतो, वाढवयातले वेंधळेपण वाढवणारा एक एक नित्य नवा चाळा उत्कंठा वाढवू लागतो, आणि.

' मोरपिसासारखी दोन बोटे
डोळ्यांवर फिरवून
ती माझ्यापुढे नाचवीत......!
सुलताना रझियाच्या गुलामाच्या आदबीने
मी तुझे बोट धरले...
तू म्हणालीस बिच्चारा तू
न धरलेल्या बोटावर तुझे नाव होते. '

हा रझिया सुलतानाचा गुलाम तिच्या प्रणयाराधनेत इतका रंगला को, तिच्या वाढवयातील वेंधळेपण त्याला मोहवते, ते समजत नाही, पण तिच्या विश्वात तो इतका गुंतून पडला आहे की, हे रेशमी धागे हळुवारपणे उलगडू लागतात. तिचे विरहाचे क्षणही मग पुस्तकातील मोरपिसाच्या सोबलीने अथवा पेरूवरच्या चिमणीच्या दातांच्या खुणा आठवत ओलावले जातात.

आणि मन आशेने चिंब भिजते. ग्रीक पुतळीची तिची मूर्ती. मग त्याच्या मनात झिरझिरत ओढणीमागील मूर्तिमंत अमूर्तता असते ती मूर्ती आपल्याही डोळ्यांसमोर उभी राहते.

आलीस तीच एखाद्या ग्रीक पुतळीसारखी
अस्तित्वाच्या झिरझिरीत ओढणीमागील
मूर्तिमंत अमूर्तता
डोळ्यांत मृगजळाची जीवघेणी जादू
संगमरवरी अचल मुद्रा
कलाधिक मनिषा उत्तरोत्तरतो
माझ्या अधःपतनाची निश्चित सोय. '

मूर्तीला स्पर्श न करण्याची शपथ घेऊन मूर्तीची आराधना सुरू होते. एकएक आठवणी दाटतात,

' जिना उतरताना पैंजण वाजावेत
तशी हसत निघून गेलीस; इथून तिथे. '

मनात उमटणारी अनामिक हुरहुर कोठे तरी शोधावी वाटली, पण ती सहजासहजी मिळणारी नव्हे.

' उत्तर एकच; हा आमचा विषय नाही.'

त्याला तिची अनेक रूपं आकर्षित करतात. मोहवतात.

' तू आहेस जलवंती; पाण्याची कन्या
पावसात हरवतेस
माहेर भेटल्यासारखी
समुद्रात फिरतेस
सराईत मासोळी जशी. '

पण त्यालाच हे माहीत आहे, फक्त

त्यालाच की,

‘तेजःपुंज वराशेजारी होणारी
जलवंतीची वाफ
आभाळमातीच्या त्रिशंकू लेकराला
पोळत असते.’

पुढे वाटतंय, कविता तर प्रौढत्वाकडे झुकू लागली, शब्दानी गुफलेल्या ओळी एखाद्या कुशल नर्तिकेच्या चिवट अवयवांप्रमाणे वाटू लागतात, शब्द येऊ लागतात, मोठमोठे पातंजल, वसिष्ठ, योग, भस्म ! म्हणून पुढे वाचू लागावं आणि क्षणभर आश्चर्यानं थक्क व्हाव, कारण,

‘आता फक्त तूच विचारू शकतेस;
सिनेमातल्या गाण्याच्या भेंड्या लावू या का ?’

त्याने स्वत:चे प्राण तिच्यात लपवले आहेत. तिची दु:खं त्याची दु:खं होतात तिचं रुसणं त्याला बेचैन करतं, तो तिला विनवून सांगतो,

‘बोल ना, बोल ना, बोल ना,
काळोखात घाट पुरता बुडून गेला
नाव धारेला लागेल निरुपायाने
तेव्हा मात्र आक्रोश करत राहू नकोस.’

तिचं रुसणं त्याला बेचैन करतं, कधी अचानक वेंधळेपणानं मनासारखं वागणं त्याला जमतं नाही आणि तिचं रुसणं–फुगणं सगळं सगळं कबूल करावं लागतं ती म्हणेल ते ते कबूल करावं लागतं आणि तरीदेखील विनवावंसं वाटतं, हळुवार मोरपिसासारखी दोन बोटे हनुवटीवर ठेवून;

तरी देखील पापणीपापणी पावसामध्ये
उंच उंच मनोरेही बुडून गेले
आता लख्ख ऊन पडो आभाळभरून
बुडालेले गाव पुन्हा उगवत नाही.
पहिल्यावहिल्या चांदण्याने चकवा दिला
आणि आता अवेळ झड शिलधार.’

वेड लागत नाही असं कवी का म्हणतात तेच समजतच नाही. आणि पुढे तर–

आमचा आपला एकच खेळ
एक पाय तळ्यात एक पाय मळ्यात.

हेही समजत नाही. या प्रश्नांनी मन भरून जाऊन पुढील ओळी पिंगा घालू लागतात.

‘दोनच घटका उरल्या आहेत,
तेवढ्यात खेळून घेतले पाहिजे
मग आतून बाहेरून अंधारेल
एक कठोर हाक येईल
कोण तरी प्रश्न करील
म्हटलेत का रोजचे पाढे आणि परवचे?’

या बालिश, अल्लड मनाला कठोर हाक ऐकायची सवय आहे ? कधीही अवेळी आंधळी कोशिंबीर खेळणाऱ्या, वाढत जाणाऱ्या वेंधळ्या वयातील खेळ खेळणाऱ्यांना अंधारून आलेलं समजतं कसे ? दोन घटका उरल्या फक्त हेही कळावे कसे ? येथपासून मनात प्रश्नांचा भुंगा घू: घू: करत पोखरू लागतो, पिंगा घालू लागतो, तन, मन, धन एकरूप झालेलो ही दीर्घ प्रेमाच्या आवर्त प्रत्यावर्तात घुसमटली जातात, तेव्हा धूळ जाऊन टचकन पाणी येतं आपल्या डोळ्यात,

‘समज भेट झालीच नव्हती
समज भास झालाच नव्हता
कधी तरी आपण मोठे व्हावलाच हवे
मोठेपणाचं एक लक्षण, अनुसरले
दुसरे, विसरलो.

ही भाबडी, कोवळी, बालिश मनं मोठेपणाच्या गप्पा करतात व एकदम सर्व काही विसरण्यापर्यंत येतात–कितीही समजावलं तरी स्थिर मनं होत नाहीत समजावणीच्या अंगाईने कधी झोप लागत नाही.

‘फुंकर म्हणजे अधिक दुःख’’

एकमेकांच्या आणाभाका, शपथा घेताना; परस्परात गुंफून गेलेलं मन म्हणतं,

‘तुझ्या प्रसन्न प्रामाणिकपणाचा
हेवा वाटतो, भय वाटते.’

मग केवळ भास, आभास आणि फुलांचे वास ! कारण आता स्वप्नही पडणार नसते. पुढे प्रश्न पडतो, एवढा वर्मी घाव बसायला कठोर दगड मारला कुणी ? कशासाठी ? आधार मात्र बळकट असावा–कारण.

‘तू-विचारलेस, मी कुठे आहे ?
माझ्या काळजाची ऊब देऊन
मी एवढेच म्हटले,
जिथे हवीस तिथेच आहेस.’

त्या वर्मी घायाळ झालेल्या फुलचिमणीला तो सावरायचा प्रयत्न करतो. पूर्वीचा कधीचा ठाम निश्चय त्याला आठवतो मोहनवेलीत गुंतायचं नव्हतं, त्यात तो पूर्णपणे गुंतून गेला होता. कारण तिने त्याला ज्या गावाला जायचे नव्हते तीच वाट नेमकी विचारली होती. तिनं त्याचं काहीच ऐकलं नव्हतं आणि या मोहनवेलीत गुंतलेला तो तिला शेवटी विनवतो.

‘आता निदान एवढे कर
परतीची वाट मला विचारू नको
माझ्या काळजाच्या कोपऱ्यात
तुझ्यासाठीच खोया आहे
पंख मिटून, थरथर थांबून
आता जरा स्वस्थ राहा.’

पुढे शब्द येतात एकमेकांत गुंतलेले, न सोडवता येणारे,

ज्याचे घरटे त्याने उद्ध्वस्त केले
तू अजून काय करते आहेस ?
प्राक्तनाची अंधारी ढोली सोडून
आपण जाऊ या नवख्या प्रदेशात
चांदणं वेचणाऱ्या चोची आहेत तोवर

आणि अचानक त्याला तिच्या अस्तित्वाची विराट लाट पहायला मिळाली–त्याच रात्री,

‘समुद्र आणि चांदण्याची
वादळमिठी पडली,
आपले देह असतात
किती विसराळू
मनावरती एक एक खूण वज्रलेप.’

पुन्हा मरणापेक्षाही दु:ख सोसण्याच्या कळा त्याला येतात. दुसऱ्यांनी तिच्या पापभयाचे अचूक टिपण साधले आणि तिथेच त्याने स्वतःचा पराभव मान्य केला.

‘सत्य आपले दुबळे असते
न्याय त्यांचा आणि समर्थ असतो.’

तिच्या मौनाचा आक्रोश त्याला छळत राहतो. टिटवीचा आकांत आकाशाचे खळे काढतो, ती वेंधळी नाही हेही त्याला माहीत आहे. तिची मोरपिसासारखी दोन बोटे डोळ्यांवर फिरवून, अल्लडपणे खेळ खेळणारी ती अथवा तिचा आवडता खेळ आंधळी कोशिंबीर अशी निष्पाप ती त्याला संपूर्ण माहीत आहे किंवा क्लासिक मानेच्या उतारावरती त्याच्या अधःपतनाची निश्चित सोय झाली होती. म्हणूनही असेल, पण तो समाजापुढे ठामपणे उभा राहून सांगतो,

‘खबरदार चांडाळांनो, हात उचलाल तर
पापपुण्याच्या संगमाजवळ
ती खेळते आहे लडिवाळ अल्लडपणाने
अखेरची तिची इच्छा तर विचाराल ना!

प्राजक्ताच्या फुलाला पायदळी चुरडू नका.
तो तिला अजुनी म्हणतोय,
'धीर धरून, पाहू या तर पुढे जाऊन
अंधाराच्या पाठीमागे
असेलदेखील दोघांपुरते
नवे आभाळ.'

हा तर पुरता कोसळलेला! पाताळात पोचलेला, पण ती सुखी बघून

'आकाशाचा वेध घेऊन
पाताळात पोचलेला आहे खोल खोल
तरी एक समाधान
तू तुझ्या पृथ्वीवरती खुशाल आहेस.'
...तू आता एवढेच कर
अंगणामधल्या चांदण्यात
बाळाला अंगाई गाताना
जाऊ नको दक्षिणेच्या कुंपणाजवळ
पाताळातून वर येणाऱ्या पिंपळामुळे
तिथला चिरा ढळला आहे.'

एक कविकल्पना डोळ्यांसमोर साकार होऊ लागते–प्रेम म्हणजे काय, ते कुणी सुरू केलं, प्रश्न पडतो दोघांना–

एका सुहाग सायंकाळी एक भुंगा कमळाच्या फुलामध्ये शिरला. रात्र पडल्यावर कमळाच्या पाकळ्या अलगद मिटू लागल्या. भुंगा आतच होता. जेव्हा सकाळी तो बाहेर पडला तो आनंदाने बेहोष झालेला. आपल्याशीच गुणगुणत! हेच ते प्रेम? एका पंखानाच धडक देणारं प्रेम!

तर अशी ही एक प्रेमकहाणी! नर्तकीच्या पदन्यासाप्रमाणे एकमेकांत गुंफलेली, एकमेकांना बिलगणारी, पाखरांसारखी! कधीच अलग होणार नाही अशी वाटणारी! पण टिटवीचा आकांत आकाशाचे टवके काढू लागतो. पापपुण्याच्या संगमाजवळ लडिवाळ अल्लडपणाने खेळणारी ही कहाणी क्रूर समाज मोडून काढतो. पायदळी चुरडतो, तरी आशा असते पुनर्मीलनाची! तो तिला आपल्या एकटेपणाच्या दुःखात सामावून घेत नाही. ती सुखी बघून तो सुखी होतो आणि आपल्या गालांवर हळुवार अश्रुबिंदू येऊन ठिबकू लागतात तसेच सुकत राहण्याची वाट बघत! दुसरे येतात आणि डोळ्यांसमोर धूसर आकृती येऊ लागते, 'मानसीची!'

'एखाद्या ग्रीक पुतळीसारखी
अस्तित्वाच्या झिरझिरीत ओढणीमागील
मूर्तिमंत अमूर्तता!'

—सुबोधिनी गुणे
देवरुख

# फिनिक्स निवड

## Into The Unknown

Reader's Digest Book
Colour Illustrated
Pages 352, Rs. 200/–

रीडर्स डायजेस्टच्या पुस्तकाचे वितरण इंडिया बुक हाउस, मुंबई, यांच्यातर्फे होते. त्यांच्याकडून इतकी पब्लिसिटी होते की, कलर फोल्डर्सचा खर्च काढून त्यांच्या हाती काय उरत असेल याबद्दल कधीकधी उत्सुकता वाटते. हजारो लोकांना ते असे पुस्तकाच्या माहितीविषयी कलर फोल्डर्स पाठवतात. एखाद्या प्रदर्शनाविषयी इतकी पब्लिसिटी होते की, एक ठराविक ग्राहकांचा गट, ज्यांना पब्लिसिटीची अॅलर्जी असते, ते ग्राहक कधीच या प्रदर्शनास जाणार नाहीत!

आमच्या 'फिनिक्स'मध्येसुद्धा अशी भारंभार पोस्टर्स यायला लागली की, कधीकधी ती न वाचता मी डस्टबिनमध्ये टाकून देतो. नेमकी इथेच ट्रॅजेडी होते. प्रदर्शनात काही वेळा उत्कृष्ट प्रतीचा माल मिळून जातो. तोही अत्यंत स्वस्त; परंतु पब्लिसिटीच्या या अॅलर्जीमुळे एका गटाच्या (ज्यांची क्रयशक्ती चांगलीच असते!) ग्राहकाला प्रदर्शनवाल्यांना चांगलेच मुकावे लागते; तसंच या गटाला तोच माल जास्त किंमत देऊन बाजारात विकत घ्यावा लागतो. असं दोघांचं नुकसान होऊन बसतं! पब्लिसिटी थोडी वॉटर-डाउन केली, तर हे दोघे एकमेकांजवळ येऊ शकतील!

मी पहिले डायजेस्टचे पुस्तक घेतले ते डेक्कनवरील श्री. गाडगीळांच्या पॉप्युलरमध्ये. ते वाइल्ड-लाइफवर होते. तिथे ५–१० मिनिटे पुस्तके चाळल्यानंतर त्याची गुणवत्ता पटली व इंडिया बुक हाउसमधून एकामागून एक डायजेस्टची मोठी इलस्ट्रेटेड पुस्तके मागवून टाकली.

डायजस्टची पुस्तके आल्यानंतर इलस्ट्रेटेड पुस्तकांचे महत्त्व पटले. माणूस कितीही मोठा झाला तरी त्याचा एक भाग बालकच रहातो. तो भाग म्हणजे माणसातील Curiosity. चित्र असलेली पुस्तके मोठ्यांना सुद्धा अतिशय आवडतात. डायजेस्टनंतर आमच्याकडे नॅशनल जिऑग्राफिकचे नऊ बर्फीचे तुकडे आले, कलर लायब्ररी इंटरनॅशनलची अठरा पुस्तके, दिल्लीवर एक, तिबेटवर एक, हिऱ्यावर एक, लाइफचं युद्धावर, सिनेमावर एक, अपार्टमेंट डिझाइनवर एक, ऑक्सफर्ड इलस्ट्रेटेड डिक्शनरी दोन भागात, बेबी केअरवर एक, कुत्र्यांवर दोन, अॅस्ट्रॉलॉजीवर एक अशा अनेक चित्रांच्या पुस्तकांची भर पडली. या पुस्तकांची गंमत म्हणजे साधारण १५ वर्षांच्या पुढील कोणत्याही वयोगटांना ती चालतात. वाचनाची अभिरुची निर्माण करताना या पुस्तकांचा स्टेपिंग-स्टोन्ससारखा उपयोग होतो. येन केन प्रकारेण सध्याच्या अस्थिर व सैतानी जगात पालकांनी आपल्या मुलाला वाचनाची गोडी लावून घ्यावी. सध्याच्या किंमतीचा विचार केला, तर चांगलाच खर्च येतो हे मान्य; पण हे एक आयुष्यभर पुरणारे सेकंड एज्युकेशन आहे. एक पोस्ट ग्रॅज्युएशन आहे. वाचनाच्या आवडीमुळे मुलांची डीरेलमेंट कमी होत असते हा एक मुद्दा पालकांनी कधीच विसरू नये!

आपल्याला चांगला सुतार किंवा प्लंबर मिळत नाही. आपल्याला नेहमी सुधारणा हवी असते. म्हणून आपल्याला वाटते आपला सध्याचा प्लंबर आहे त्यापेक्षा चांगला मिळवावा; पण यात आपली फसगत होते. या सर्व प्रकारात 'A known devil is better than an unknown one.' ही उक्ती नेहमीच लागू पडते. Unknown चे भय मानवजातीला पूर्वीपासूनच वाटत आले आहे आणि भय वाटायला लागले की, थोडीफार उत्कंठा नेहमीच लागते. का आपल्याला Unknown चं भय वाटतं? जगात कोणकोणत्या गोष्टी गूढ आहेत? त्यावर काय संशोधन चाललं आहे? वैज्ञानिक व रॅशनॅलिस्ट तर म्हणतात की, गूढ वगैरे सर्व थोतांड आहे. मग प्रत्येक गोष्टीचे उत्तर विज्ञान देऊ शकते का? जीवन, मरण, पुनर्जीवन, अतींद्रियशक्ती, भविष्य, निसर्ग,

उडती तबकडी, प्राण्यांचे वर्तन, अर्थ-श्राइन्स (यात ब्रिटनचे स्टॉन्व्हेंज व पेरूतील नास्का प्लॅन येतील) भूत-पिशाच्च, विचित्र प्राणी (यात व्हॅम्पायरी, लॅकनेस मॉन्स्टर असे प्राणी येतील.) भानामतीचे प्रकार, ब्लॅक मॅजिक, अॅटलांटिस खंड, स्वप्नांची चिकित्सा हे व इतर गूढ विषय हाताळले आहेत.

मी याआधी deja vu हा शब्द काही वेळेला वाचला होता; परंतु डिक्शनरी उघडायचे टाळले होते. या डिक्शनऱ्यांची पण गंमत असते. परवा मी ऑक्सफर्ड इलस्ट्रेटेड डिक्शनरी घेतली. दोन भागात. ८ किलोची. १९२० पानांची. ही डिक्शनरी इतकी छान आहे की, आपण एक शब्द बघायला ती उघडली तर इतर चित्रं बघण्यात आपण तो शब्दच विसरून जातो. अर्थात काही प्रमाणात व कधीकधी ते इतर डिक्शनऱ्यातसुद्धा होतं; पण या दोन भागात तर ते फारच होतं. काही काही चित्रं तर फुल पेज कलर्ड! पण एकदा मी ही डिक्शनरी Shenanigan हा शब्द बघायला उघडली. आतमध्ये नव्हता; परंतु १४ रु. च्या सब्सिडाईज्ड वेब्स्टरमध्ये सापडला ! अमेरिकन शब्द तो. त्याने छक्केपंजे खेळलेच !

आपण केव्हा केव्हा कुठे जातो व आपल्याला असे उगाचच वाटते की, आपण इथे येऊन गेलो आहोत ! कधीकधी एखाद्या अनुभवाबाबतसुद्धा आपल्याला तसे वाटते. त्याला deja vu म्हणतात. या विषयावरसुद्धा या पुस्तकात चांगलीच माहिती आहे.

स्वप्नाचा विषय आला की मला नेहमीच फ्रॉइड, कॅक्युल व सीनॉय जमातीची आठवण येते. फ्रॉइड अर्थात त्याचा Interpretation of Dreams या पुस्तकामुळे. तुम्हाला हवं ते मिळत नाही ना ? मग घ्या ते स्वप्नातून ! हा फ्रॉइडच्या स्वप्नाचा चिकित्सेwish fulfilment चा सूर होता. फ्रेडरिक ऑगस्ट कॅक्युलचं मन अगदी कॅलक्युलेटरसारखं अचूक व मेथॉडिकल होतं. त्याला एकदा साप आपलीच शेपटी खात आहे असं स्वप्न पडलं. त्यावरून त्यांनी बेन्झिनसारख्या ज्वालाग्राही व वायुरूप पदार्थाचं स्ट्रक्चर शोधून काढलं ! त्यामुळं रसायनशास्त्र या विषयात बरीच क्रांती घडून आली. बेन्झिनच्या रिंगचे स्ट्रक्चर, स्वतःची शेपटी खाणारा साप व कॅलक्युलेटरसारखं कॅक्युलचं डिम हे आत्तापर्यंत अनेक लोकांनी अनेक पुस्तकांत पाहिलेलं आहे.

परंतु मलेशियामधील सिनोई जमातीचं 'स्वप्नशास्त्र' इतकं पुढं गेलं आहे की, एक लेखिका मेरिलीन फर्ग्युसन (Brain Revolution) हिने या प्रगत स्वप्नशास्त्राची आपल्या सध्याच्या Sophisticated nuclear technology बरोबर तुलना केली होती ! या सिनोई जमातीवर पण या पुस्तकात लेख आहे. एका माणसाने या जमातीवर ८–१० वर्षे संशोधन केले होते. ही जमात इतकी शांतताप्रिय व सुखी-समाधानी आहे की, या सुखीसमाधानाच्या वलयामुळेच की काय त्यांना इतर जमाती कधीही त्रास देत नाहीत. गंमत म्हणजे त्यांच्या शेजारच्या जमाती सर्व आक्रमक वृत्तीच्या आहेत. या जमातीनी स्वप्ने व त्यांच्या अर्थावर एक तत्त्वज्ञानच उभारले असून त्यांचा collective व individual unconsious च जिंकला आहे. या त्यांच्या स्वप्नशास्त्रापुढे फ्रॉइडचं स्वप्नशास्त्र बरंच गुंतागुतीचं व थोडंसं फिकंही वाटतं.

सिनोई जमातीत कुणाला असं स्वप्न पडलं की, आपण खोल खाली पडत आहोत तर दुसऱ्या दिवशी चर्चा होऊन ज्याला स्वप्न पडलं त्याला आता अनेक आध्यात्मिक गोष्टी अवगत होतील असा अन्वयार्थ काढण्यात येतो. या पडण्याचं रूपांतर जोनाथन लिव्हिंग्स्टनच्या सीगलसारखं उडण्यात होणार असतं !

दुसऱ्या एका स्वप्नाचं उदाहरण पण मजेदार आहे. समजा, तुम्हाला कुणी ओळखीच्या माणसानं मारलं किंवा तुम्ही त्याला मारलं तर दुसऱ्या दिवशी उठून त्या माणसाला तुम्ही पुष्पगुच्छ भेट द्यायचा ! अशा अत्यंत सुधारित स्वप्नाच्या टेक्नॉलॉजीनं या जमातीनं भय, भीती हे शब्दच त्यांच्या संस्कृतीतून काढून टाकले आहेत.

क्लिटन स्टीवार्टने सिनोई जमातीच्या स्वप्नाच्या विश्लेषणासाठी १५ वर्षे खर्ची घातली !

अमेरिकेत तर सिनोई जमातीची स्वप्ने या विषयावर अनेक थिसिस लिहिले गेले आहेत.

या पुस्तकात 'Power of Dreams' नावाचे एक प्रकरण आहे. यात झोप व स्वप्नांविषयी बरीच माहिती आहे. स्वप्नांचा विषय निघाला म्हणजे मला एक कडवं आठवतं–

Higamus, hogamus,
Women are monogamous;
Hogamus, higamus,
Men are polygamous !

स्वप्ने किती हास्यास्पद असतात याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. तत्त्वज्ञ विल्यम जेम्सला या कडव्याचं स्वप्न पडलं व त्याला झोपेत असं वाटलं की, या कडव्यामुळं विश्वाचं रहस्य आपण उलगडलं ! खरंच सर्व पापांचं मूळ हे कडवं असेल का ? Over to you Freud ! कारण फ्रॉइड पंथीयांना पेपरमध्ये six, tax, axe, hoax असा कोणताही X आला की, सेक्स दिसतो ! एकदा तर एका फ्रॉइडच्या अनुयायाला दर्यावर्दी Seaman च्या मथळ्यात semen असे दिसले असेही वाचले होते ! (या पुस्तकात नाही).

पानन् पान अगदी वाचनीय !

–जे. एन. पोंडा

---

# मराठीला वाचक का नाही ?

चंद्रशेखर मराठे

मराठी साहित्याविषयी बरीच चर्चा अलीकडे चालू आहे. मराठी मासिके बंद पडततात –आहेत ती कशीबशी चालू आहेत. मराठी वृत्तपत्रे व साप्ताहिके मर्यादित वर्तुळातच घोटाळत आहेत. मराठी कादंबऱ्या व पुस्तकांना तुलनेने काही खप नाही. या साऱ्याबाबत वाचकांच्या अनास्थेला जबाबदार धरण्याचा सूर दिसतो; पण मराठी लेखन वाचकांना काय देते ?

मराठी कथा–कादंबऱ्या बहुतांशी आठवणीवजा, रडव्या असतात. बांधीव कथानक, उत्कट प्रसंग, रेखीव व्यक्तिरेखा हे अभावानेच आढळते. कुठला तरी प्रश्न, कुणाचे तरी दुःख साहित्याने मांडले पाहिजे अशी एक समजूत दृढमूल झालेली दिसते. त्यामुळे प्रश्न वा दुःख यांच्या मांडणीसाठी 'डमी' पात्रे, कृत्रिम प्रसंग हे वाचावे लागते. कलाकृतीचे एक अपरिहार्य अनिवार्यत्व निर्माण व्हावे लागते ते होत नाही.

मराठी नाटकातला संघर्ष बनावट वाटतो. त्यात तत्त्वज्ञानात्मक काथ्याकूट, शब्दांचा कीस फार असतो. जीवन म्हणजे काय हे नाटकामधून स्पष्ट होण्याऐवजी पात्राच्या तोंडूनच जास्त ऐकावे लागते. त्यामुळे हे सारे विशेष कन्व्हिन्सिंग वाटत नाही.

मराठी वृत्तपत्रे एकसुरी, रुक्ष व विस्कळित वाटतात. माहिती, उद्‌बोधन व मनोरंजन यापैकी कोणताही हेतु साध्य होत नाही. संपादकाच्या लहरीप्रमाणे कोणत्याही विषयावर मजकूर दिला जातो. एखाद्या विषयाचा सातत्याने मागोवा घेतला जात नाही. नवशिक्या, अर्धकच्च्या लेखकाकरवी पाने भरून काढली जातात. विसंगतिपूर्ण मजकूर वाचून वाचकाना गोंधळात पडल्यासारखे होते.

मराठी साप्ताहिकाची अवस्था याहून वेगळी नाही. ती अधिकच परभृत असतात. इग्रजीत दोन तीन आठवड्यापूर्वी वाचलेला मजकूर मराठी साप्ताहिकात वाचावा लागतो. ठराविक शेरेबाजी, शिळ्या विषयांना कढ आणणे, सिनेमा नाटकांची उथळ परीक्षणे ही या साप्ताहिकाची आणखी काही नीरस वैशिष्टचे होत.

मराठीत काय आहे ? डे ऑफ द जॅकॉल (फ्रेडरिक फॉरसिथ), जॉज (पीटर बेंचले) बेट्सी (हेरॉल्ड रॉबिन्स) यासारख्या कादंबऱ्या नाहीत, पॅपिलॉन (हेन्री शॅरियर), वन फ्लू ओव्हर द ककूज नेस्ट (केन केसी) यासारख्या आत्मकथा नाहीत. दैनंदिन वाचण्यासाठी पाहिले तर बीक्षीबी, खुशवंत सिंग. व्ही. डी. टी. (त्रिवेदी) सारखे शैलीदार लेखन नाही. राजेद्र पुरी, के. आर. सुन्दरराजन, इंद्र मलहोत्रासारखी राजकीय समीक्षा नाही. अमिता मलिक, के. एन. प्रभूसारखे विशिष्ट विषयावर अभ्यासू लेखन नाही. एम. व्ही. कामथ यांच्यासारखी पारदर्शक ऐतिहासिक दृष्टी नाही. यादी जास्त लांबवण्याचे कारण नाही. मराठीत काही लेखक अद्यापही आनंद देतात. जसे पु. ल. देशपांडे, गंगाधर गाडगीळ, जी. ए. कुलकर्णी, दुर्गा भागवत, कुसुमाग्रज, गो. नी. दांडेकर इत्यादी, पण ही यादी फार लांबवता येईल असे वाटत नाही.

आम्हाला मराठी वाचण्याची इच्छा आहे. मराठीतील संपादक, प्रकाशक, लेखक यांनी वाचकाचा विचार करून जास्तीत जास्त वाचनीय लेखन द्यावे अशी मात्र अपेक्षा आहे. □

# दूरदर्शनवर रंगदर्शन !

अवधूत परळकर

चित्रं तर सगळ्यांनाच आवडतात; पण त्यातही साध्या चित्रांपेक्षा रंगीत चित्रे अधिक आवडतात. फुलांची खरी लोकप्रियता दडलेली असते फुलांच्या रंगांत. प्रथमदर्शनी स्वागत होतं ते फुलाच्या रंगाचं. सुवास ही त्यानंतर येणारी गोष्ट.

रंगीत टीव्हीच्या चाहुलीनं आज जो तो उल्हसित झाला आहे. त्यामागं रंगाविषयी असलेली ही मूलभूत मानवी ओढ आहे. स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरील सोहळ्याच्या निमित्तानं देशातल्या टीव्ही संचावर प्रथमच रंगीत पावलं उमटली. आता आशियाई स्पर्धांचं रंगीत प्रक्षेपण होत आहे. टप्याटप्यानं सगळ्या दूरदर्शन कार्यक्रमात रंगत येऊ लागेल अशी आशा आजच्या घडीला करायला हरकत नाही.

रंगीत टीव्हीचं सर्वसाधारण उत्साहानं स्वागत होत असतानाच त्याला एकीकडे जोरदार तात्त्विक विरोधही होत आहे. रंगीत टीव्ही आपल्यासारख्या गरीब देशाला शोभणारा नि परवडणारा प्रकार नाही, असं काहींचं म्हणणं आहे आणि ते अगदीच चुकीचं नाही. पण मग या दृष्टिकोनातून रंगीत छपाई, रंगीत जाहिरातपत्र, रंगीत सिनेमे यांचाही विचार व्हायला हवा. कशाला हवीत मासिकांवर रंगीत मुखपृष्ठ, कशाला हवेत रंगीत चित्रपट ? आपल्या देशाची आर्थिक स्थिती लक्षात घेता सारे चित्रपट कृष्णधवल असणं अधिक योग्य नाही का ? फार काय या देशात टीव्हीच कशाला हवाय ? आर्यभट्ट, रोहिणी, इनसॅट यांची तरी गरज काय ? त्यांचा अवाढव्य खर्च तरी आपल्या देशाला परवडणारा आहे का? इत्यादी अनेक प्रश्न निर्माण होतात. या सार्‍यांकडे दुर्लक्ष करून केवळ रंगीत टीव्हीविषयी बोलणं काहीसं दुटप्पीपणाचंच ठरेल.

एकदा कृष्णधवल टीव्ही देशात आल्यावर काही वर्षांनी रंगीतप्रसारण सुरू होणं ही एक अपरिहार्य गोष्ट होती. दुर्दैव इतकच की, आज आपल्याकडे रंगीत टीव्ही येतोय तो सौंदर्यात्मक किंवा व्यावहारिक गरज म्हणून नाही तर एक आर्थिक बळजबरी म्हणून. एक गोष्ट सर्वांना ज्ञात आहे की, टीव्हीची महत्त्वाची यंत्रसामुग्री आपल्या देशात बनत नाही. ती आपल्याला परदेशाहूनच आयात करावी लागते. टीव्ही उत्पादन पुरवणाऱ्या या राष्ट्रांनी कृष्णधवल टीव्ही उपकरणांचं उत्पादन आता जवळजवळ बंदच करीत आणलं आहे. काही वर्षांनी ते पूर्णपणे थांबेल. मग आपल्याला रंगीत टीव्ही उपकरणं खरीदण्यावाचून पर्यायच राहणार नाही. कॅमेरे व्हीडिओ-टेपरेकॉर्डर्स इत्यादी साधनं रंगीत वापरायची आणि प्रक्षेपण कृष्णधवल रंगात करायचं हे वेडेपणाचं ठरेल. तेव्हा रंगीत टीव्हीला आर्थिक कारणावरून होणारा विरोध आणि त्याच्या योग्यायोग्यतेचा वाद थोडा बाजूला ठेवून आपण वैज्ञानिक प्रगतीच्या या नव्या दालनाचं प्रथम नीट निरीक्षण करू या म्हणजे त्यातील गुणदोषाचं मूल्यमापन करणं अधिक सुलभ जाईल.

आपल्याकडील टीव्हीतंत्रज्ञ आणि इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे विद्यार्थी नि व्यासंगी देशात आणि परदेशात आपल्याला सर्वस्वी अनोख्या असलेल्या या तंत्रक्षेत्राची शास्त्रशुद्ध माहिती मिळवताहेत. आम्हा सामान्य प्रेक्षकाना त्यांच्याइतकी सखोल माहिती या संदर्भात मिळवायची गरज नाही आणि ते शक्यही नाही; पण रंगीत टीव्हीबाबतची स्थूल तात्त्रिक माहिती आमच्यापैकी प्रत्येकान मिळवायला हवी. विज्ञान आणि तंत्राशी फटकून वागण्याचा आमचा स्वभाव आता आम्हाला बदलला पाहिजे.

रंगीत प्रक्षेपण म्हणजे काय हे समजून घेण्याआधी रंगीत टीव्ही कॅमेरा म्हणजे काय हे जाणून घ्यायला पाहिजे आणि रंगीत टीव्ही कॅमेरा समजून घेण्यासाठी कृष्णधवल टीव्ही कॅमेरा म्हणजे काय चीज आहे याचं जुजबी ज्ञान असायला पाहिजे.

रंगीत टीव्ही कॅमेरा आणि कृष्णधवल

टीव्ही कॅमेरा यात तत्त्वत: काहीच फरक नाही. फिल्म नसलेला कॅमेरा म्हणून टीव्ही कॅमेरा ओळखला जातो. साध्या कृष्णधवल टीव्ही कॅमेऱ्यात भिंगाद्वारे तयार होणारी प्रतिमा पडद्यावर पडते. पडद्याच्या मागील बाजूला प्रतिमेवर इलेक्ट्रॉनिक कणांचा मारा करून तिची माहिती इलेक्ट्रॉनिक कणांमध्ये गोळा केली जाते. प्रतिमेवरील अंधार आणि उजेड यांच्या कमीअधिक तीव्रतेचं ज्ञान गोळा केलेले हे इलेक्ट्रॉनिक कण प्रक्षेपित करता यावेत म्हणून त्यांचं रूपांतर इलेक्ट्रॉनिक संदेशात (signals) केलं जातं. आपल्या टीव्ही सेटमध्ये हे प्रक्षेपित संदेश येऊन पोहोचले की, आधीच्या क्रियेच्या नेमकी उलट क्रिया घडून येते आणि कॅमेऱ्यात सुरुवातीला उमटलेली प्रतिमा आपल्याला पडद्यावर दिसते; हे सर्वांना आता ठाऊक आहे.

रंगीत टीव्ही कॅमेऱ्यात याहून वेगळं फारसं घडत नाही. प्रतिमेचे रंग ग्रहण करता यावेत म्हणून तिथं एकाऐवजी तीन स्वतंत्र ग्रहणनलिका असतात. तांबडा, हिरवा आणि निळा अशा मूळ रंगात दृश्यवस्तूचं विभाजन होऊन हे तीन रंग स्वतंत्ररीत्या तीन वेगवेगळ्या ग्रहणनलिकांत ग्रहण केले जातात. पुढील क्रिया साध्या टीव्ही कॅमेऱ्याप्रमाणे असते. म्हणजे या प्रतिमांचं इलेक्ट्रॉनीकरण आणि नतर प्रक्षेपणसंदेशात रूपांतर. मात्र नंतर या तीन वेगवेगळ्या रंगजातीच्या संदेशांना एकाच प्रक्षेपणमार्गातून पाठवावं लागतं. त्या दृष्टीनं त्यांच्यावर आवश्यक ते तांत्रिक संस्कार करावे लागतात. रंगीत टीव्ही यंत्रणेसाठी एक खास उपकरण असून त्याला कलरप्लेक्सर म्हणतात. रंगीत टीव्ही यंत्रणेतलं हे सर्वांत महत्त्वाचं उपकरण. प्रक्षेपित संदेशांची पुन्हा तीन रंगसंदेशात फोड करण्याचं सामर्थ्य असलेलं उपकरण घरच्या टीव्ही सेटमध्ये असते. त्याला 'डिकोडर' म्हणतात.

मूळ तीन रंगांच्या मिश्रणातून इतर रंगछटा बनतात. त्यात सुलभता यावी म्हणून अलीकडे ३ ऐवजी ४ ग्रहणनलिका असतात.

हे सर्व अर्थातच इतकं साधं आणि सोपं नाही. तांत्रिक गुंतागुंत वगळून केलेलं हे ढोबळ रेखाटन आहे. रंगीत टीव्हीमधील प्रतिमा उमटवण्यामागील तत्त्व लक्षात यावं हाच यामागचा हेतू आहे.

## रंग जमवणं सोपं नाही !

रंगीत दूरचित्रवाणीसाठी स्टुडिओत नुसता तीन रंगांच्या ट्यूब्स असलेला रंगीत कॅमेरा असून भागत नाही. रंगीत प्रक्षेपणयंत्रणा उभारायची म्हणजे स्टुडिओत इतरही अनेक सुविधा असाव्या लागतात. कोणतीही प्रतिमा उमटवण्यासाठी कॅमेऱ्याइतकीच सर्वांत आवश्यक अशी प्राथमिक गोष्ट म्हणजे प्रकाश. वस्तूवर प्रकाश असल्याखेरीज वस्तूची प्रतिमा उमटणे पूर्णतया अशक्य असते. रंगीत टीव्ही यंत्रणेत कॅमेऱ्यावर प्रतिमा उमटवण्यासाठी वस्तूवर पाडलेल्या प्रकाशाची तीव्रता कृष्णधवल कॅमेऱ्यापेक्षा दुपटी-तिपटीनं अधिक असावी लागते. ही महत्त्वाची गरज सोडली तर एकंदर प्रकाशयोजनेचं तंत्र कृष्णधवल यंत्रणेपेक्षा फार वेगळं नसतं. त्यामुळं स्टुडिओत प्रकाशरचनेत फेरफार करावे लागत नाहीत. मात्र भारी प्रकाशदायक दिवे वजनानेही भारी असतात. ते हाताळण्यात वेळ आणि शक्ती अधिक खर्च होते.

हे झालं प्रकाशयोजनेबाबत—रंगीत प्रक्षेपण करायचं म्हणजे पात्रांच्या मेकअपबाबतीत थोडं जास्त काटेकोर राहावं लागतं. कृष्णधवल चित्रणात छपून जाणाऱ्या विसंगती आणि दोष, रंगातील असमानता रंगीत प्रतिमेत ठळकपणे उघडी पडते. प्रखर प्रकाशामुळे तपमान वाढून चेहऱ्याचा तांबूसपणा वाढू लागतो. तिथं मेकअप कलावंताला अधूनमधून लक्ष पुरवावे लागते. रंगीत टीव्ही यंत्रणेत सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कानाचा मेकअप. कानामागून येणाऱ्या बॅकलाइटने कान तांबूस रंगानं फुललेले दिसतात. खास मेकअपची पुटे चढवूनच हा दोष झाकावा लागतो.


मेकअप कलावंताप्रमाणे वेशभूषाकारावरही बरीच जबाबदारी येऊन पडते. भलती रंगसंगती रंगीत प्रतिमा पार बिघडवून टाकते. हे भलतेपण साध्या डोळ्यांना जाणवेलच असं नाही डोळ्यांनी चांगली दिसणारी रंगसंगती कॅमेऱ्यात वाईट दिसू शकते. कॅमेऱ्याला मानवणाऱ्या रंगसंगतीचं ज्ञान आणि भान वेशभूषाकाराला सतत बाळगावं लागतं आणि त्यासाठी त्याला नेपथ्यकाराशी संवाद ठेवावा लागतो.

म्हणजे नेपथ्यकार हाही रंगीत प्रक्षेपण यंत्रणेतील एक महत्त्वाचा घटक. कोणत्या रंगाशेजारी कोणता रंग खुलून दिसतो, कोणता रंग प्रतिमा नासतो, कोणते रंग परस्परछेदक आहेत याचं उत्तम ज्ञान रंगभूषाकार, वेशभूषाकार यांच्याप्रमाणे नेपथ्यकारालाही असावं लागतं. नेपथ्यकारानं नेपथ्यासाठी योजलेले रंग पात्रांच्या अवतीभोवती वावरणार हे ध्यानात घेऊन वेशभूषाकाराला पोशाखाचे रंग निश्चित करावे लागतात. बऱ्याचदा या तिघांनी परस्पर विचारविनिमय करून हे ठरवायचे असते.

परस्परांवर प्रेम करणारे आणि परस्परांचा द्वेष करणारे रंग कोणते याचे या इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात खास नियम आहेत. वर उल्लेखलेल्या कलावंतांप्रमाणे निर्मात्यालाही या नियमाचं चांगलं ज्ञान असावं लागतं. या संदर्भात हल्ली विशेष तक्तेही उपलब्ध आहेत.

टीव्हीवरील कार्यक्रम नेहमीच स्टुडियोच्या चार भिंतीतील असतात असं नाही. अनेकदा बाह्यचित्रणाचा प्रसंग येतो. अलीकडे यासाठी प्रामुख्यानं छोटे व्हिडिओ कॅमेरे आणि रेकॉर्डर्स (पोर्टा पॅक इक्विपमेंट) वापरण्यात येत असले तरी रंगीत फिल्मचा वापरही पुष्कळ ठिकाणी केला जातो.

मात्र हा वापर करताना कमाल दक्षता घ्यावी लागते. ३५ मि.मि. फिल्म ही अधिक स्पष्ट आणि दर्जेदार प्रतिमा देते; पण टीव्हीवर दैनंदिन वापरासाठी ती वापरणे खर्चिक ठरते. त्यामुळे प्रगत देशातही काटकसर म्हणून १६ मिलिमीटरची फिल्म वापरण्याकडे कल असतो. १६ मि.मी.चे कॅमेरे हाताळण्यासाठी सुलभही असतात. या फिल्म्स वेगवेगळ्या कंपन्यांनी बनवलेल्या असल्यानं त्यांची मूळ रसायनं आणि रंगछटा वेगळ्या. याखेरीज प्रक्रियेनंतर त्या वेगवेगळे रूप धारण करतात. विविध ठिकाणांहून येणाऱ्या या विविध रंगछटांतील फिल्म्स म्हणजे टीव्ही तंत्रज्ञांच्या दृष्टीनं एक समस्याच असते. स्टुडिओ चित्रीकरणास पूरक म्हणून अशा फिल्म्स जेव्हा वापरल्या जातात तेव्हा त्यांच्यातील विसंगती खास करून खटकते. दुसरं म्हणजे रंगीत चित्रणासाठी प्रकाश तीव्र लागत असल्यानं कॅमेऱ्याच्या झडपा बंद ठेवाव्या लागतात. यामुळं अधिक प्रकाश आत येत असला तरी दृश्याची सखोलता नि यथार्थता कमी होते.




थोडक्यात रंगीत प्रक्षेपणासाठी आवश्यक अशी यंत्रसामुग्री, कॅमेरे आणले की रंगीत टी.व्ही. यंत्रणा उभी झाली इतका हा प्रकार सोपा नाही.

वर उल्लेखलेल्या तांत्रिक दक्षतेचा आणि साधिक जबाबदारीचा विचार केला तर रंगीत चित्रवाणी-यंत्रणेसंबंधी आणि तिच्या वापरासंबंधी भय निर्माण व्हावं अशीच परिस्थिती आहे.

अर्थात रंगीत चित्रप्रक्षेपणाचे फायदे तपासून पाहिले तर वरील धोके पत्करूनही रंगीत टीव्हीच्या आगमनाचं स्वागत करावं असंच कुणालाही वाटेल.

## अधिक स्पष्ट, जिवंत !

रंगीत चित्र हा आपल्याला वास्तवाच्या अधिक जवळ नेणारा प्रकार आहे. आपण रंगहीन छायाचित्र पाहतो तेव्हा त्या चित्रापासून आपल्याला मिळणारं ज्ञान अर्धवट असतं. कृष्णधवल छायाचित्रात रक्त काळं दिसतं, हिरवी आणि निळी फुलं एकाच करड्या छटेतील दिसतात. विविध रंगाचे पक्षी अत्यंत मामुली दिसतात. मोरासारखा सुंदर पक्षी तर आपलं मूळ सौंदर्यच गमावून बसतो. कृष्णधवल चित्र वस्तूविषयी अनेक सत्ये आपल्यापासून लपवून ठेवते, तर रंगीत चित्र आपल्याला वस्तूविषयी अधिकाधिक सत्य सांगते. दृश्यातील तपशील नि बारकावे रंगांमुळे उघड होतात. प्रत्येक रंगाला स्वतंत्र अर्थ आणि परिणाम असतो हे आता सिद्ध झालं आहे. कृष्णधवल प्रतिमेत आपण या अर्थज्ञानाला आणि अनुभवांना मुकतो.

प्रतिमाना अधिक स्पष्टपणा आणि तीक्ष्णपणा प्राप्त करून द्यायचा हा रंगाचा गुण लक्षात घेतला तर रंगीत टीव्हीमुळे शैक्षणीय कार्यक्रमांना किती उठाव मिळेल याची कल्पना येईल. रसायनविषयक प्रयोगावर आधारित कार्यक्रमात आज रंगांचं आणि रंगबदलाचं निवेदन करावं लागतं. रंगीत प्रक्षेपण असेल तर ही गरज भासणार नाही. शेतीविषयक कार्यक्रमात प्रत्यक्ष रंग दिसल्यानं अधिक अर्थवाहीपणा येईल. उदाहरणार्थ पानावरील कीड वा अळ्या– ज्या कृष्णधवल प्रतिमेत जवळजवळ अदृश्य होतात, त्या रंगीत प्रतिमेत स्पष्ट दिसतील. पाना–फळांच्या रंगांवरून त्यांची जात, सतेजपणा ठरवणं सोपं जाईल. विविध रसायनं आणि खतंही बाह्य भेदामुळे चटकन ओळखता येतील. रंगीत टीव्हीवर चित्रकलेसंदर्भातले कार्यक्रम खऱ्या अर्थानं चित्रकलेवरील कार्यक्रम होतील. चित्राचे रंग आणि छटा वर्णन करण्याचा दुर्धर प्रसंग संयोजकावर येणार नाही. चित्रकलेप्रमाणेच रांगोळी आणि रंगाशी थेट संबंध असलेल्या इतर कलाप्रकाराचं खरं सौंदर्य रंगीत टीव्हीद्वारेच प्रेक्षकांसमोर येईल आणि त्यांना खऱ्या अर्थानं न्याय मिळाल्यासारखं होईल. गणेशमूर्तिदर्शनावरील कार्यक्रमांचा या संदर्भात विचार करून पहा.

टीव्हीवरील नाटक-प्रहसनांतदेखील रंगांचा उपयोग होईल. कृष्णधवल माध्यमापेक्षा रंगीत माध्यमात ती अधिक अस्सलतेन साकारली जातील. नृत्यप्रकारात वापरल्या जाणाऱ्या पेहरावात रंगाला अनन्यसाधारण महत्त्व असतं. अनेकदा त्यापासून संस्कृतिदर्शनही घडत असतं. रंगीत प्रतिमांमुळे हे उद्दिष्ट सहजपणे साध्य होईल.

रंगीत प्रक्षेपणाचा खरा फायदा होणार आहे तो मात्र टीव्हीवर जाहिरात देणाऱ्या उत्पादक व्यापाऱ्यांना. बऱ्याचदा रंग हा त्यांच्या उत्पादनाचा अविभाज्य भाग असतो. त्याचा व्यवस्थित आविष्कार झाल्यानं जाहिरातीत नेमकेपणा येईल. कपड्यांच्या डिझाइन्सची जाहिरात असेल तर आकर्षकता वाढेल, खाण्याच्या जिन्नसांची जाहिरात असेल तर त्यातील हुबेहुबता वाढून पदार्थांविषयी आसक्ती निर्माण करता येईल.

टीव्हीवर दाखवले जाणारे अनेक चित्रपट आज मुळात रंगीत असतात. कृष्णधवल टीव्हीवर त्याच्या प्रतिमा धूसर दिसतात. त्यातून रंग विशेष अर्थपूर्ण आणि सौंदर्यपूर्ण रीतीने वापरले असतील तर त्याच्या आशयपरिणामावरही फरक होतो. रंगीत टीव्हीत अर्थाची हानी होण्याचे आणि सौंदर्य वाया जाण्याचे हे प्रकार टाळले जातील.

पण या सुपरिणामाबरोबर काही दुष्परिणामही रंगीत टीव्ही आपल्याकडे घडवून आणायची शक्यता आहे.

रंगज्ञान, रंगनिवड, रंगसंगती याबाबतीत आपण तसे अद्याप मागासलेलोच आहोत. आपल्याकडे लोकप्रिय असलेले कपड्यांचे रंग, लोकांच्या आवडत्या नट-नट्यांचे पडद्यावर दिसणारे कपडे, त्याचे रंग इत्यादीवरून नजर फिरवली तरी आपली रंगांविषयीची अभिरुची लक्षात येईल. आपल्याकडच्या सिनेमातही सप्तरंगांची मुक्त उधळण असते, जणु सर्व रंग नसले तर चित्र-

पटाला प्रेक्षक रंगीत बोलतील की नाही याची आपल्याला काळजी लागलेली.

रंगाबाबत आपण कमालीचे हावरे आहोत. आपला हा हावरेपणा हॉटेलमधल्या सजावटीत, ऑफिसात आणि घरच्याही रंगमांडणीत स्पष्ट दिसून येतो. आपल्याला रंगीतपणाच प्रदर्शन करायचं असतं. इतर देशातील रंगीत सिनेमा आणि आपल्याकडील रंगीत सिनेमा यात जमीन-अस्मानाचं अंतर असतं ते यामुळंच एक नेत्रसुखद तर दुसरा नेत्रदाहक !

चित्रपटासारख्या माध्यमात हे एक वेळ ठीक आहे. त्यातला भडकपणा (आशय आणि रंग दोहोतला) आपल्या आता अंगवळणी पडला आहे. शिवाय चित्रपट ही रोज पाहण्याची वस्तु नाही. टीव्ही माध्यमाबाबत तसं बोलता येणार नाही. सहजासहजी टाळता येण्यासारखं हे माध्यम नाही.

तेव्हा टीव्ही-माध्यमात रंगाबाबत थोडा अधिक संयम बाळगणे आवश्यक आहे या इलेक्ट्रॉनिक खोक्याच्या पडद्यावर भलते रंग भलत्या रंगाशेजारी उभे राहिले की रंगयुद्ध सुरू होऊन दृश्यापत्ती ओढवण्याचा संभव आहे. तसं झालं की, कृष्णधवल-प्रक्षेपणच चागलं होतं असं म्हणायची पाळी यायची. रंगीत प्रतिमांमुळं कार्यक्रम वास्तवतेच्या जवळ जायच्याऐवजी वास्तवतेपासून दूर जायची शक्यता अधिक. टीव्ही माध्यमातील ग्लॅमरच तेवढ त्याच्या रंगीतरूपात अधोरेखित केलं जाण्याचीही दाट शक्यता आहे. कारण तेवढा एक भाग या माध्यमातून लोकांनी उचलून धरला आहे. निवेदिकेच्या निवेदनक्षमतेपेक्षा आपल्याकडे चर्चा चालतात त्या तिनं परिधान केलेल्या पोशाखाच्या आणि अलंकारांच्या. टीव्ही हे एक दिखाऊगिरीचं माध्यम म्हणून आपण स्वीकारलं आहे हेच यावरून दिसून येतं. रंगीत टीव्हीमुळं या दिखाऊगिरीला ऊत येईल की काय अशी शंका वाटू लागली आहे. वस्त्राभूषण, अलंकार त्यातील डिझाइन्स आणि फॅशन्स यासाठी मासिकांची मुखपृष्ठे जाहीरात म्हणून जशी वापरण्यात येतात तशी टीव्हीसेटची फ्रेम मॉडेलिंगसाठी वापरण्यात येईल की काय अशीही चिंता वाटू लागली आहे. या भपकेबाजपणामुळं चागले विषय आणि आशय मारले जाऊन टीव्ही हे एक दृश्यप्रदूषणाचा फैलाव करणारं आणखी एक माध्यम बनून जाईल.

अर्थात हे सर्व आपल्या या माध्यमविषयक दृष्टिकोनावर अवलंबून आहे. दृष्टिकोन बदलून हा धोका टाळता येईल; पण तो बदलायचा. कुणी ?

## तांत्रिक धोका

रंगीत प्रक्षेपणातील दुसरा धोका तांत्रिक आहे. तांत्रिक चातुर्यानेच त्याच्यावर मात करण्याचा प्रयत्न करता येईल.

कॅमेऱ्याला दिसणारे रंग आणि उघड्या डोळ्यांनी आपल्याला जाणवणारे यात बरीच तफावत असते. उदाहरणार्थ पांढऱ्या रंगाचा पाढरेपणा आपण सवयीनं स्वीकारलेला असतो; पण रंगीत कॅमेरा त्याच्याकडे अधिक वस्तुनिष्ठ पद्धतीनं पाहतो. त्याच्या दृष्टीवर परंपरेचा संस्कार नसतो म्हणून म्हणा की डोळ्यापेक्षा तो अधिक संवेदनाक्षम असतो म्हणून म्हणा खोलीतल्या साध्या उजेडात त्याला पाढरा शर्ट पिवळसर दिसतो. बाहेरच्या लख्ख उजेडात तो त्याला निळसर दिसतो. आपण सरावानं डोळेझाक केलेली वास्तवता कॅमेरा सूक्ष्मपणे टिपतो ती अशी. डोळ्याना न दिसणारे निसटते, सरकते, परावर्तित असे सगळे किरण तो अचूक खेचतो. म्हणजे रंगीत टीव्हीवर कार्यक्रम करू पाहणाऱ्या निर्मात्यांना कॅमेऱ्यांची ही सत्यनिष्ठ भूमिका जाणून घ्यायला हवी. रंग आपल्याला कसे भासतात यापेक्षा ते कॅमेऱ्याला कसे दिसतील याचाच सतत विचार ठेवून रंगयोजना करायला हवी. आपल्याकडे किती जण हे भान पाळतील हा प्रश्नच आहे.

रंगीत टीव्ही कॅमेऱ्याच्या भेदकपणामुळे अनेक गमतीचे प्रकार घडतात. माणसाचा रंग त्याच्या पार्श्वभूमीला असलेल्या रंगानुसार विविध छटा धारण करतो. उदाहरणार्थ माणसाच्या पाठीमागे तांबडा पडदा असताना जो त्याच्या अंगाचा रंग असतो तो मागे निळा पडदा टाकल्यावर वेगळी छटा धारण करतो. हा अर्थात चमत्कार नसून या बदलाला शास्त्रीय कारणे आहेत. हा सूक्ष्म रंगबदल प्रत्यक्षातही घडतो. फक्त आपल्या दृष्टीच्या मर्यादित ताकदीमुळे आपल्याला तो जाणवत नाही इतकंच.

डोळ्यांनी दृश्य पाहणे आणि कॅमेऱ्याच्या भिगानं ते पाहणे यात असा मूलतः फरक असतो. डोळ्यांनी पाहताना आपण हव्या त्या वस्तूकडे लक्ष केंद्रित करू शकतो. त्यामुळं समोरील दृश्याची व्याप्ती मोठी असली तरी लक्ष केंद्रित केलेल्या वस्तूच्या भोवतालच्या चिजांना आणि रंगांना आपोआप फिकेपणा प्राप्त होतो. कॅमेऱ्यात ही सोय नसते. तो समोरच्या साऱ्या वस्तूकडे सारख्याच तीक्ष्णतेने बघतो, चित्र-प्रतिमेत साऱ्या वस्तू आणि रंग एकाच तीव्रतेने उमटतात. त्यात एखादी वस्तू भडक रंगाची असली तर ती वस्तू अकारण आपल्याकडे लक्ष वेधून घ्यायचा प्रयत्न करते; त्यामुळं इतर गोष्टीकडे दुर्लक्ष होते आणि दृश्याचा समतोल बिघडून जातो.

उदाहरणार्थ कल्पना करा टीव्हीसंचावर रस्त्यावर चालू असलेल्या एका खेळाचं चित्र उमटलेलं आहे. सर्व लोक भोवती कडे करून हा खेळ पाहतानाचे हे दृश्य आहे. या बघ्यात एक लालभडक स्वेटर घातलेला मुलगा आहे. मुलाच्या अंगातील भडक रंगाच्या स्वेटरमुळं चित्रचौकटीत ज्या ज्या वेळी त्या मुलाचं दर्शन होईल त्या त्या वेळी त्या चित्राचा दृश्य-समतोल बिघडलेला दिसेल.

एकंदरीत रंगीत टीव्हीयंत्रणा उभारणं जितकं सोपं आहे तितकं ही प्रक्षेपणव्यवस्था हाताळणं सोपं नाही. परदेशाहून आवश्यक उपकरणं आयात करून रंगीत प्रक्षेपणाची सुविधा निर्माण करणं सहज शक्य आहे; पण ही यंत्र योग्य रीतीनं हाताळण्यासाठी लागणारं कौशल्य विदेशाहून आयात करता येणार नाही. या कौशल्यात तंत्रविषयक ज्ञान आणि सौदर्यविषयक जाणीव असा दोहोचाही समावेश आहे. पैकी तंत्रज्ञान प्रशिक्षणातून मिळवता येईल; पण सौंदर्यात्मक जाणीव — जी मुळातच अंगी असावी लागते — तिचं प्रशिक्षण कोण आणि कुठवर देणार ? त्यामुळं रंगीत-टीव्ही आपल्याकडे कोणत्या अवतारात सादर होईल याविषयी सध्या भयमिश्रित कुतूहल आहे.

पाश्चात्य देशात गेली १५ वर्षं रंगीत टीव्ही असूनही रंगदर्जाबाबत ते अद्यापही समाधानकारक उची गाठू शकलेले नाहीत. रंगीत चित्रपटाचा दर्जा टीव्हीवरल्या रंगीत प्रतिमेला लाभण्यासाठी आणखी काही वर्षं

जावी लागतील. अलीकडील अमेरिकन आरोग्यतज्ज्ञांच्या पाहाणीत रंगीत टीव्ही कृष्णधवल टीव्हीपेक्षा डोळ्यांना अधिक अपायकारक असल्याचं आढळून आलं आहे. अर्थात आपल्याला यामुळं घाबरून जायचं कारण नाही. अमेरिकेत टीव्ही जवळजवळ २४ तास चालू असल्यानं ही खास अमेरिकन डोकेदुखी आहे.

टीव्हीमुळं आपल्याकडे डोकेदुखी निर्माण झाली तर ती आर्थिक स्वरूपाची असेल. प्रचंड महागडा असा टीव्हीसेट विकत कसा घ्यायचा असा प्रश्न मध्यमवर्गीयांना पडेल. विक्री-कर, आयात-कर आणि वाहतूक खर्चाचे आजचे दर लावले तरी रंगीत टीव्ही संचाला आज सुमारे ८ हजार रुपये पडतील. म्हणजे कृष्णधवल संचाच्या जवळजवळ दुप्पट रक्कम. आशियाई स्पर्धेच्या निमित्तानं रंगीत चित्रप्रक्षेपणाचा शुभारंभ होत असला तरी नंतरही ते चालूच राहील अशी हमी अद्याप सरकारनं दिलेली नाही. दूरदर्शनकेंद्रावर या दृष्टीनं जे काही तांत्रिक फेरफार करावे लागतील तेही पूर्णपणे केलेले नाहीत आशियाडनंतर अंशत: रंगीत चित्रप्रक्षेपण सुरू होईल. संपूर्णपणे रंगीत प्रक्षेपणाचे दिवस उजाडायला आणखी दोन वर्षे जावी लागतील असा कयास आहे. रंगीत टीव्ही संचांचं मोठ्या प्रमाणावर तेव्हाच उत्पादन सुरू होईल तोवर झालेली करवाढ, उत्पादनखर्च त्या वेळचे वाहतूक आणि इतर दर जमेस धरले तर टीव्हीसंचाची किंमत दहा-अकरा हजारांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. म्हणजे एक दोन वर्षांनी का होईना रंगीत टीव्ही आलाच तर त्याचा आस्वाद या देशातले किती लोक घेऊ शकणार आहेत ? रंगीत टीव्ही किती जणांच्या आयुष्यात रंगत आणील ?

सरकार गोरगरिबासाठी सार्वजनिक संचाची व्यवस्था करीलही; पण भुकेनं अर्धपोटी जनता त्याचा पूर्ण आनंद लुटू शकेल का? रंग खाऊन, रंग पिऊन त्यांचा उदरनिर्वाह होईल का ? पोटात अन्नाचा कण नसेल त्याना तर पुढ्यातील सारी चित्रे रंगहीनच दिसणार नाहीत का ? ज्या देशात कित्येक खेडी पिण्याच्या पाण्याविना तडफडत आहेत त्या देशात मूठभर श्रीमंतांसाठी ही प्रचंड खर्चिक रंगीत-संगीत यंत्रणा उभारण्याची गरजच काय ?

प्रश्न अनेक आहेत आणि सारेच त्रासदायक आहेत. बौद्धिक चलाखीनं ते आज टाळता येतील; पण कायमचे मिटवता येणार नाहीत.

रंगीत टीव्हीच्या आगमनाचं खुल्या दिलानं स्वागत करताना आपण या प्रश्नाशी मुकाबला

### रंगीत टीव्ही संचाची आजची किंमत

| | रुपये |
|---|---|
| आयात केलेली उपकरणं | १,२५० |
| आयात शुल्क | १८७५ |
| स्थानीय वाहतूक आणि इतर किरकोळ खर्च | १५० |
| देशी उपकरणं | ७०० |
| एक वर्ष हमी | १०२५ |
| उत्पादन कर | १३१० |
| विक्रेत्याचं कमिशन | ५०० |
| विक्री कर | ६८० |
| एकूण | ७४९० |

करण्यासही सज्ज राहिलं पाहिजे. कारण एक दोन वर्षात भोवतालच्या परिस्थितीचा रंग न बदलल्यास या मुकाबल्यात रंगीत टीव्हीचा उपभोग घेण्याच्या आपल्या मनसुब्याचा बेरंग होण्याची अधिक शक्यता वाटते.

मोटारीच्या काचेतून, रस्त्यावर दुतर्फा वसलेल्या झोपडपट्ट्यांकडे तिरस्कारानं पाहणाऱ्या लोकांबद्दल मला इथं काहीच म्हणायचं नाही. □

---

चित्रपट

## निकाह : प्रश्न खराच ! उत्तर पूर्ण चुकीचं !


'इन्साफ का तराजू'च्या सेटवर चित्रटाच्या थीमविषयी बोलताना एकदा निर्मातादिग्दर्शक बी. आर. चोप्रा म्हणाले होते, 'स्त्री हा माझा वीकपॉइंट आहे.' स्त्रियांच्या सामाजिक समस्यांवर ते तळमळीने बोलत होते. त्यामुळेच 'साधना'मध्ये वेश्योद्धार, 'गुमराह'मध्ये भारतीय स्त्रीने न ओलांडण्याची लक्ष्मणरेषा, 'इन्साफ का तराजू' मधली बलात्कारित स्त्री--तिची मानसिक स्थिती व सामाजिक स्थान अशा विषयांत ते रमतात म्हणे !

अर्थात स्त्रीचा कैवार घेता घेता, ते स्त्रीकडून तथाकथित भारतीय उज्ज्वल परंपरांचं पालन करण्याचीच अपेक्षा करीत असतात. ह्या परंपराच्या, गतानुगतिकतेच्या खूप तुडबल्या गेलेल्या चिखलातून वर डोकं काढून उभं राहणारं स्वतंत्र प्रज्ञेच्या स्त्रीचं व्यक्तिमत्त्व त्याना नको असतं. (जे उंबरठ्यात आढळतं)

त्यामुळेच गुमराह---मधली नायिका बापाच्या व मेव्हण्याच्या इच्छेपुढे मान तुकवते. आपल्याला प्रिय असणाऱ्या पुरुषाशी लग्न करण्याच्या आपल्या अधिकारावर पाणी सोडते आणि विधुर झालेल्या मेव्हण्याशी लग्न करून आपली लक्ष्मणरेषा साभाळीत बसते, ह्यातच तिचं खरं सुख असल्याचं बळेच मान्य करून ! कारण ह्या प्रकारे तिने भारतीय स्त्रीच्या परंपरेचं पालन केलेलं असमतं !

'इन्साफ का तराजू'मधली नायिकासुद्धा बलात्काराला बळी पडल्यावर एकीकडे ह्या अन्यायाविरुद्ध उभी राहून आपल्या धाडसाचं प्रदर्शन करीत असली, तरी माझं शरीर आता अपवित्र झालं असून, आता मी तुझ्या लायक ठरत नाही, असं स्वत:च्या प्रियकराला सागते.

आता पुन्हा त्यांनी तेवढ्याच दिमाखात स्त्रीच्या आणखी एका समस्येचा झेंडा रोवलाय---'निकाह.' ह्या चित्रपटाची समस्या आहे घटस्फोट-तलाक-ही. निकाह म्हणजे विवाहही नव्हे. अर्थात गणित सोपं आहे. निकाह झाल्याशिवाय तलाक शक्य नाही. गंमत म्हणजे ह्या चित्रपटाचं नाव पूर्वी 'तलाक तलाक तलाक' असंच होतं; पण एन डी. कोठारी हेही 'डायव्होर्स' नावाचा चित्रपट काढीत आहेत. त्यांनी चोप्रांच्या 'तलाक...' नावाला आक्षेप घेतला. परिणामी नंतर सुरू केलेल्या आपल्या चित्रपटाचं नाव चोप्राना बदलावं लागलं. त्यांनी मग नाव ठेवलं-निकाह !



वसीम आणि निलोफर – अभिनयात दोघेही कमी पडतात.

निकाह ही एका मुस्लिम तलाक पीडितेची समस्या. पुरुषी अहंकाराच्या उन्मादात नायक नं. १ (दीपक पराशर) अर्थात वसीम, अविचाराने नायिका निलोफर (सलमा आगा) हिला घटस्फोट देतो. ह्यानंतर त्याला झालेला पश्चात्ताप, शरीयतच्या कायद्यातील विवाह व घटस्फोटविषयक अँटीमुळे त्याची झालेली कोंडी, त्याचा व नायक नं. २ म्हणजेच दुसरा पती हैदर (राज बब्बर) ह्या दोघांचा निलोफरच्या भूमिकेविषयी झालेला गैरसमज व पुन्हा त्यामुळे तिला गोसावी लागलेला मनस्ताप. एक व्यक्ती म्हणून नव्हे, तर वस्तू म्हणून तिची केली गेलेली संभावना व दोन नवऱ्यांनी खेळलेला टेबलटेनिसचा डाव !

अखेर सहनशक्तीचा अंत होऊन ती जेव्हा फुटते, व्यक्ती म्हणून आपलं म्हणणं, आपली इच्छा मांडायचा प्रयत्न करते, तेव्हा कुराणावर मस्तक नमवीत 'देवा, पुरुषाला अक्कल दे' ह्या शब्दात पुरुषाने दिलेली आपल्या मूर्खपणाची स्वीकृती असं हे सगळं जबरदस्त नाट्य.

पण हे कथेतून उलगडतं तकलादूपणे. त्यामुळे त्यातली व्यथा कुठेही प्रेक्षकाच्या हृदयाला हात घालीत नाही. ना पुरुष प्रेक्षकांच्या ना स्त्री प्रेक्षकांच्या !

आपण सादर करणार असलेल्या कथेतून समस्या सहजपणे व प्रभावीपणे मांडली जाईल याचा आत्मविश्वास बी. आर. चोप्रांसारख्या नामवंत व अनुभवी दिग्दर्शकाला नसावा ह्याचं आश्चर्य वाटतं. त्यामुळेच हल्ली ते गुमराहची कथा सुरू करण्यापूर्वी रामायणात सीतेने लक्ष्मणरेषा ओलांडण्याचा प्रसंग पडद्यावर दाखवतात. 'पति पत्नी और वो' च्या सुरुवातीस अ‍ॅडम व ईव्ह ह्यांची कथा मांडतात आणि 'इन्साफ का तराजू' पूर्वी छायादृश्यांद्वारे आणखी एका बलात्काराचं, त्यातून उद्भवलेल्या हत्येच्या खटल्याचं चित्रण करतात.

इथेही निकाहची कथा सुरू करण्यापूर्वी ते 'पुराण व इतिहासकालापासून वेगवेगळ्या प्रकारे पुरुषी अहंकाराला बळी पडत आलेली स्त्री' ह्या विषयावर प्रेक्षकांचं एक बौद्धिक घेतात. वेगवेगळी रेखाचित्रं, प्रसंग पुढे ठेवतात. त्यात एक तर 'तलाकपीडिता' म्हणून 'पाकीझा' मधला पोस्टर्स व एल. पी. रेकॉर्डच्या जॅकेटवर गाजलेला मीनाकुमारीचा क्लोजअप दाखवतात.

ह्या संदर्भात 'निकाह' च्या कथा-पटकथा-संवाद-लेखिका डॉ. अचला नागर ह्यांनी तर कबुलीजबाबच दिला, 'माझ्या कथेतून जे व्यक्त होऊ शकत नसेल, ते सांगण्यासाठी ही प्रस्तावना !'

'तुम्हाला जे सांगायचंय ते सांगायला तुमचा कथेसारखा प्रभावी फॉर्म अपुरा पडलाय, म्हणून हा निबंध सादर केला, असं तुम्हाला वाटत असल्यास, तो तुमच्या कथेचा पराभव नाही का? किंवा तुमची कथा ललितस्वरूपात ही समस्या अधिक प्रभावीपणे मांडत असताना, दिग्दर्शकाने ही प्रस्तावना जोडून तुमच्यावर अन्याय केला आहे, असं नाही का तुम्हाला वाटत ?'–माझ्या ह्या प्रश्नाला त्यांच्याजवळ समाधानकारक उत्तर नव्हतं. त्यावर दिलेलं आपलं जुजबी तकलादू समर्थनच पुन्हा पुन्हा करत होत्या.

प्रस्तावनेनंतर कथा. वसीम व निलोफर ह्या दोघांत लग्नाआधीपासून आकर्षण आहे. तो दोघे आते–मामे भावंड असून, घरातून त्यांचा विवाह रीतसर ठरलेलाही आहे. हळुवारपणे ते प्रेमाचा गोफ गुंफताहेत हे मात्र चित्रपटकर्ता म्हणतोय म्हणून आपण समजायचं. कारण पडद्यावर त्या दोघांचा प्रणय काही केल्या फुलताना, रंगताना दिसत नाही. दोघेही इथे अभिनयात अतिशय कमी पडतात. पुढे लग्न होतं आणि वसीम अचानक बारीक–सारीक, नगण्य कारणांवरून बायकोवर वसकन ओरडू लागतो. त्याचा हा स्वभाव आधी कुठेच एस्टॅब्लिश झाला नाहीये. त्यामुळे निलोफरपेक्षा प्रेक्षकांनाच अधिक धक्का बसतो !

मध्येच एकदा तो दारू पिऊन तर्र होऊन येतो. त्याला दारु पिऊन यायची सवय होती. का? बहुतेक नसावी? मग दारू प्यायला त्याला लगेचच काय? कशाचाच कारण झालं खुलासा नाही. तीन–चार वेळा बायकोवर अकारण ओरडून झाल्यावर, एकदा रामाच्या पारात तो तिला चक्क तलाकच देऊन टाकितो.

## संदिग्ध निलोफर

बेडरूमच्या एकांतात, तिसरा कुणीही साक्षीदार नसताना असं 'तलाक तलाक तलाक' म्हटल्याबरोबर पती–पत्नीचं नातं संपुष्टात येतं. दोघांच्या एकमेकांवरच्या प्रेमाच्या कुटुंबियांच्या पुढाकाराने निर्माण झालेल्या ह्या वैवाहिक संबंधाच्या पार्श्वभूमीवर केवळ रागाच्या भरात त्रिवार उच्चारलेल्या एका शब्दामुळं हे नातं संपुष्टात येतं कसं हा आपल्या भाबड्या? मताला प्रश्न पडला, तरी निर्माते–दिग्दर्शक आणि चित्रपटातल्या व्यक्तिरेखा तेवढ्या भाबड्या

नसल्यामुळे त्यांना हा प्रश्न पडत नाही.

(हाफीझ) उमरखय्याम सहारनपुरी हे मुस्लिम धार्मिक कायदेविषयक सल्लागार. त्यांचीही चित्रपटकर्त्यांने मदत घेतली आहे. त्यामुळं चित्रपटात दाखवलेले मुस्लिम रीतरिवाज हे कायद्याला धरूनच असणार. कथेसाठी ते लवचिक केले असतील, याची शक्यता नाहीच.

डॉ. अचला नागर ह्या संदर्भात म्हणाल्या की, निगाहची स्वाभिमानी नायिका नवऱ्याने तलाक दिल्यानंतर मेहेरची रक्कम वसूल न करता निघून जाते. असा तलाक दिल्यानंतर एक विशिष्ट मुदत असते. त्या मुदतीत नवरा पत्नीजवळ रदबदली करू शकतो; पण वसीम स्वत:च्या कृत्याने इतका शरमिंदा झालेला असतो की, तो निलोफरला भेटण्याचं धाडस करू शकत नाही – असं तोच एके ठिकाणी तिला म्हणतो.

तर असा हा तलाक होतो. जसं वसीमला पटकन रागवायला सबळ कारण लागत नाही, तसं निलोफरला अश्रू ढाळायलाही लागत नाही. लग्नाआधी आईला 'मी पत्रकारितेचा कोर्स करू का?' म्हणून विचारणारी ही निलोफर, लग्नानंतर नवरा कामामुळे पाचऐवजी सऊला घरी आला, तर दुःखी होते. पार्टीला आलेल्या निमन्त्रितांना नोकराच्या सुपूर्द करून स्वतः रागावून, वर निघून जाते. का तर नवरा कामावरून वेळेवर आला नाही म्हणून!

'पत्नी म्हणून आपल्या पतीच्या जीवनाचा हिस्सा बनण्याची इच्छा असलेली' (–इति डॉ. अचला नागर) ही निलोफर वसीमची गृहिणी म्हणून आपलं कर्तव्य तरी पार पाडते का? तिला फक्त तिचा हक्क – तोही हनीमूनपुरताच – आठवतोय. (मला इथे चटकन आठवते ती 'अनुभव'ची नायिका. बिझी नवऱ्याच्या जीवनाचं अंग बनण्यासाठी तिने केलेला प्रयत्न.) तो आठवला की, निलोफरची निष्क्रियता आणखीनच ठळकपणे जाणवते. तलाकनंतर ती हादरूनही गेलेली नाही की, पतीविषयीच्या प्रेमामुळे तिची तडफडही झालेली दिसत नाही एक प्रकारे हा तलाक, हे तिला पुढे मिळालेलं वरदानच ठरलंय.

घटस्फोटाच्या प्रसंगाआधी सोयिस्करपणे वसीमच्या आई-वडिलांना चार महिन्यांसाठी म्हणून हैद्राबादच्या बाहेर हलवलं जात. हाजच्या यात्रेला आणि नंतर मुलीकडे कराचीला. लग्नाला एक वर्ष पूर्ण होतं, तलाक होतो, मोडीत निघालेल्या लग्नाचा दुसरा वाढदिवस येतो, तरी हे आई-वडील परत येत नाहीत. कोडकौतुकाने नात्यातलीच मुलगी सून म्हणून आणलेली आहे. तरी पण हे आईवडील मुलाच्या व सुनेच्या घटस्फोटाची शहानिशा करायला, वास्तपुस्त करायला येत नाहीत.

मध्यंतरानंतर अर्थातच पतिराजांना पश्चात्ताप झालेला असतो. तिकडे नायिकेला तिचा कॉलेजमधला सहाध्यायी तिच्यावर एकतर्फी प्रेम करणारा कविमनाचा हैदर भेटतो. तिला हैदरची सहानुभूती व मदत मिळत राहते. इकडे पश्चात्तापदग्ध वसीम काझीला उपाय विचारायला जातो. काझी सांगतो, "एकदा तलाक दिल्यानंतर आता पुन्हा त्याच स्त्रीशी लग्न करण्याचा मार्ग एकच. तिनं दुसऱ्या पुरुषाशी लग्न करून एक रात्र तरी त्याच्याबरोबर घालवावी आणि मग जर त्या पुरुषानं तिला तलाक दिला, तरच पहिल्या पतीला तिच्याशी पुन्हा विवाह करता येईल."

मग वसीम लग्नाचा दुसरा वाढदिवस साजरा करण्यासाठी निलोफरला बोलावतो. केकवर दोन मेणबत्त्या पेटवतो आणि बरोबर तिच्या येण्याची वेळ साधून, पायाशी गुलाम अलीची दर्दभरी रेकॉर्ड लावून आरामखुर्चीत अश्रू ढाळायचा प्रयत्न करीत बसतो. बहुधा गुलाम अलीशिवाय त्याला रडायचा मूड येत नसावा! पण ह्या कश्या-कश्याचा परिणाम नीलोफरवर होत नाही.

एकाकीपणाला कंटाळलेली ती हैदरशी लग्न करते. वसीमला आपलं वाटतं, पुन्हा आपल्याशीच लग्न करण्यासाठी, शरियतच्या कायद्याचं पालन करण्यापुरताच नीलोफर हैदरचा वापर करते आहे. तसं तो तिला लग्नाच्या रिसेप्शनच्या वेळी म्हणतो. तिला त्या अर्थाचं पत्रही पाठवतो. थिएटरच्या बाहेरही हेच सांगतो. मात्र ह्या प्रत्येक वेळी निलोफरच्या चेहऱ्यावरचे भाव इतके संदिग्ध असतात की, चित्रपटातला सस्पेन्स इथेच अभावितपणे उत्पन्न होतो.

'आपला तसा काही उद्देश नसल्याचं' ती स्पष्टपणे शेवटपर्यंत वसीमला सांगत नाही. उलट, तो द्विधा मन:स्थितीत असल्यासारखी वाटते. तिची हैदरबरोबरची आनंदी, समाधानी वागणूक ती हैदरबरोबर एकनिष्ठ असल्याची ग्वाही देत असते, तर तिची


**शेतकरी प्रकाशन–अलिबाग (रायगड)**

नोव्हेंबर १९८२ मध्ये प्रसिद्ध करीत आहे.

शेतकरी संघटनेचे नेते **श्री. शरद जोशी** यांची दोन पुस्तके

**१. प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश–**(लेखसंग्रह) मूल्य रु. १५

**२. शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती–**मूल्य २५ रुपये

रूढ आर्थिक विचारांना धक्का देणारी ही पुस्तके अवश्य वाचावीत नि जवळ बाळगावीत अशी.

१ नोव्हेंबरपर्यंत पैसे पाठवून नावे नोंदविणाऱ्यांना सवलतीच्या दरात उपलब्ध सवलतीची किंमत–दोन्ही पुस्तके मिळून–

१. शेतकरी आणि विद्यार्थ्यांसाठी–१५ रुपये फक्त

२. इतरांसाठी–२० रुपये फक्त.

टपालहशील वगैरेसाठी वेगळे ५ रुपये पाठवावेत.

**सुमित्रा अरविंद कुलकर्णी**

आसरा लॉजजवळ, अलिबाग (रायगड)

डायरी तिला अजून वसीमची याद येत असल्याचा पुरावा देते. साहजिकच हैदरचा तिच्याविषयी गैरसमज होतो आणि हा प्रेमासाठी त्याग करणारा प्रेमिक तिच्या वाढदिवसाची भेटवस्तू म्हणून तिचा पहिला नवराच तिला सादर करतो.

अशा प्रकारे त्या पहिल्या नवऱ्याची तर तो वस्तू म्हणून किंमत करतोच; पण अभावितपणे पत्नीचीही किंमत करतो. वसीम खेळणं तर बनलाच. ही पत्नी तर त्या खेळण्याचंही खेळणं बनली !

दुसऱ्या लग्नाच्या अटीमागचं लॉजिक काय म्हणून मी डॉ. नागरना माहिती विचारली असता, पुरुषानं अविचारानं तलाक देऊ नये म्हणूनच ही अशी अट असल्याचं त्यांनी सांगितलं. इस्लामनं स्त्रीला खूप वरचा दर्जा दिला आहे आणि 'अगर किसी चीज से अल्लाहको नफरत है, तो वह है तलाक !'

पण म्हणजे, त्या स्त्रीला पुन्हा आपल्या पूर्वपतीशी लग्न करण्यासाठी, स्वतःची इच्छा नसताना दुसऱ्या कुणा पुरुषाची होऊन काही काळ तरी रहावं लागणं ह्यात वरचा दर्जा तो कोणता ? आणि दुसऱ्या पुरुषाशी लग्न करण्याची इच्छा असेल, तर त्याच्याशी ती तलाक तरी कशाला घेईल ? पुन्हा हा तलाक त्या दुसऱ्या पुरुषानं स्वेच्छेनं दिला तरच पुढच्या गोष्टी, म्हणजे पुन्हा स्त्रीच्या इच्छेला महत्त्व शून्य !

त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट म्हणजे आपल्या दोन्ही नवऱ्यांनी मांडलेला खेळखंडोबा लक्षात आल्यावर एकदा तरी का होईना, निलोफर व्यक्ती म्हणून उभी राहते. भडाभडा बोलते.

आपल्या कथेचं स्वरूप स्पष्ट करताना डॉ. अचला नागर म्हणाल्या, 'मला अभिप्रेत आहे ती एक भावुक, स्वाभिमानी स्त्री. आपल्या पतीच्या जीवनाचं अंग बनून जगण्याची इच्छा असलेली स्त्री. वसीमजवळ ही इच्छा पुरी होत नाही. पुरी होते हैदरच्या सहवासात. पुन्हा ती एखादी सर्वसाधारण तलाकपीडित मुस्लीम स्त्री असती, तर मेहेरची रक्कम घेऊन आपल्या माहेरी गेली असती. निलोफर हे करीत नाही, तो स्वाभिमानी आहे.

'स्वाभिमानी स्त्रीच जर तुम्हाला अभिप्रेत होती तर हा मुस्लिम रीतिरिवाजांचाच प्रपंच का ?'

—'कथेत अधिक नाट्य निर्माण करण्यासाठी.'

असंच जर असेल, तर मला तरी इथे भावुक, स्वाभिमानी स्त्रीच्या समस्येपेक्षा मुस्लिम तलाकपीडित स्त्रीची परवडच अधिक आढळते आहे. श्रीमंती थाटात मांडलेली परवड आणि इथल्या ह्या परवडीला पुरुषाचा एकट्याचा अपरिपक्वपणा व असमंजसपणा जबाबदार नसून, त्या स्त्रीचाही तितकाच असमंजसपणा, अपरिपक्वपणा आणि संदिग्ध, द्विधा मन हे कारणीभूत आहे.

—रेखा देशपांडे

## सर्चलाइट

अमृत पुरंदरे

# तुम्ही शास्त्रज्ञ होऊ शकता !

'कल्पना करा की, तुम्ही एक फर्स्टक्लास शास्त्रज्ञ आहात.' हां, आता तुम्ही एखाद्या वेळेला म्हणाल की, हा काय त्रास आहे. चांगला शांतपणे 'माणूस' वाचत होतो. तर एकदम काहीच्या काही कल्पना करायला सांगताय. ही काय कल्पना करण्यासारखी गोष्ट आहे ? आज शास्त्रज्ञ व्हा म्हणताय, उद्या म्हणाल 'कल्पना करा की, तुम्हाला जमिनीमध्ये गळ्यापर्यंत गाडून ठेवले आहे.' काय चेष्टा करताय काय ?

सबूर. अहो, नुसती कल्पना. म्हणजे बघा की, तुमच्या अंगावर एक स्वच्छ पांढरा लांब कोट आहे. त्याला चांगले चार, सहा मोठे खिसे आहेत. तुमच्या डोळ्यांवर चौकोनी फ्रेमचा चष्मा आहे. पायात बूट. तुम्ही एका मोठ्या प्रयोगशाळेत उभे आहात. आजुबाजूला काचेच्या स्वच्छ पारदर्शक बाटल्यांमध्ये वेगवेगळ्या रंगांची द्रव्ये आहेत. त्याच्यावर व्यवस्थित लेबलं लावून त्या बाटल्या आपल्या रॅकमध्ये शांतपणे उभ्या आहेत. इकडे तिकडे चार-दोन यंत्रे आहेत. एक वजनकाटा आणि अजून काही. आता जरा जोरात श्वास घ्या. घ्या. घ्या म्हटलं की घ्यावा ... हां ... कसला वास आला ? नाकाला चुरचुरणारा ? घोड्याच्या लिदीसारखा ? का आल्कोहोल ? अहो, या सर्वांच्या मिश्रणासारखा वास आहे तो.

आता तुमच्या ढगळ मोठ्या कोटाच्या एका खिशात हात घालून एक स्वच्छ चकचकीत परीक्षानळी काढा ..

थांबा, तुम्ही म्हणाल, हे सर्व कशासाठी? एवढं शास्त्रज्ञच व्हायचं काय नडलंय ? आम्हाला काय बाकी उद्योग नाहीत ?

खरं म्हणजे काय आहे की, मला या शास्त्रज्ञ मंडळींचं पहिल्यापासून आकर्षण. त्यांच्याबद्दल लहानपणापासून नेहमीच काही बाही वाचत आलोय. महा इब्लिस जमात बघा. म्हणजे कसं की सदा तंद्रीमध्ये. बाकिच्यांचं एक चाललेलं असलं तर यांचं भलतंच! यांची कोणी गॅरेंटी घेऊ नये. अहो, काय वाटेल ते करतील ! काय भरवसा ठेवायचा ?

सांगायचं काय तर अशा या इब्लिश जमातीचं एक सॅंपल आपल्याला भेटलं. (तुम्हाला कधी शास्त्रज्ञ भेटलाय ? भेटला असल तर नशिबवान आहात. महा दुर्मिळ चीज! ) त्या सॅंपलचं नाव मी तुम्हाला सांगत नाही. कारण सर्व शास्त्रज्ञांप्रमाणे हे प्रसिद्धिपरांगमुख आहेत. आपण काय असला चान्स सोडताय होय ? चांगला छळला. प्रश्न विचारले. बहुतेक वेळी त्याने कळकळीने उत्तरे दिली. त्याला त्याची फिरकी घेतल्याचं कळलच नाही. समजा, त्यानं एखादं उत्तर दिलं आणि मी मठ्ठपणाने, समजलं नाही असं म्हणून मान हलवली तर पुन्हा समजावून सांगायचा. मी पुन्हा मान हलवली की मग स्वतःवर किंवा माझ्यावर चिडायचा.

उदाहरणार्थ मी त्याला विचारलं –

'तुम्ही संशोधन करता म्हणजे नेमकं काय करता ?'

'आम्ही एखाद्या विषयाचं संशोधन करतो म्हणजे नेमकं काय करतो ? मोठा अवघड प्रश्न आहे.' (प्रत्येक गोष्ट तोलूनमापून करायची सवय. त्यामुळं एखादं वाक्य इकडे तिकडे गेलं तर समोरचा आपल्याला फाशी देईल अशी बहुधा यांना भीती वाटत असावी.)

आमच्याकडे एखादं प्रोजेक्ट किंवा योजना दिली जाते. उदाहरणार्थ इन्सॅट बनवायचं आहे किंवा एखाद्या बोटीचा नवीन आराखडा बनवायचा आहे किंवा आपण त्याहून छोटसं प्रोजेक्ट घेऊ. म्हणजे समजा बोटीला लावायचा रंग तयार करायचा आहे. हे तसं पाहिलं तर फार लहान प्रोजेक्ट आहे; पण तुम्हाला समजावं म्हणून मी हे घेतो. चालेल ?'

'हो, ठीक आहे.'

'मग असं करू या की, आपण दोघं मिळूनच हे प्रोजेक्ट सुरू करू. तुम्ही माझे असिस्टंट. कल्पना करा की, तुम्ही एक शास्त्रज्ञ आहात.'

आता तुमच्या लक्षात आलं असेल की, मी तुम्हाला मगाशी शास्त्रज्ञ व्हायला का सांगितलं ते.

'हो' मी जोरात मान हालवली.

'मग आपण आता आपल्याला काय काम करायचं आहे त्याची माहिती जमवू. प्रथम हे रंग कोणते ? आणि ते नेमके कशासाठी वापरतात या प्रश्नाची उत्तरे शोधू. ही माहिती वेगवेगळ्या पुस्तकातून सहज मिळू शकते. उदा. बोटीच्या बुडाला, बोटीच्या मध्यभागी (पाण्याच्या पातळीपाशी) आणि त्याच्यावरील भाग, या तीन भागांना तीन वेगळे वेगळे रंग वापरतात. बोटीवर जी सपाट जागा असते त्याला 'डेक' असं म्हणतात. या डेकला एक वेगळाच रंग देतात. कॅप्टनची केबिन, यंत्रसामुग्री, सामान ठेवण्याची गोडाउनस, पेट्रोल किंवा रसायने ठेवण्याच्या टाक्या, या प्रत्येकाला वेगळ्या वेगळ्या प्रकारचा रंग असतो. वेगळ्या प्रकारचा याचा अर्थ नुसता रंग (colour) वेगळा असे नाही तर त्या रंगाची (पेन्ट) जात पण वेगळी असते.

बोटीचा जो भाग पाण्याखाली असतो तिथे गंजण्याचा फारसा प्रश्न येत नाही. कारण गंजण्यासाठी लोखंड, हवा आणि पाणी या दोन्हीच्या सान्निध्यात यावं लागतं. त्याठिकाणी प्रश्न असतो तो शेवाळे, शिंपले, कीटक वाढण्याचा. बोटीच्या या पाण्याखालच्या भागात शिंपल्यातले कीटक चिकटतात, शेवाळे वाढते, कठीण कवच असलेले काही पदार्थ (Barna cals) चिकटतात. हे इतक्या मोठ्या प्रमाणावर चिकटतात की, त्यामुळे बोटीचा वेग कमी होतो. इंधनाचा खर्च वाढतो आणि कधीकधी तिचा तोल बिघडून ती डुलल्यासारखी चालायला लागते. त्यामुळे या भागात अशा प्रकारचा रंग लावायचा की ज्याच्यावर शेवाळे बसणार नाही. कुठला कीटक चिकटणार नाही.

पाण्याच्या पातळीपाशी बोटीच्या पृष्ठभागावर लाटांचा सतत मारा होत असतो. तसेच हवा आणि पाणी यांचा सतत संपर्क असतो त्यामुळे या भागात गंजण्याला विरोध करणारा व लाटाच्या माऱ्यापुढे टिकाव धरणारा रंग बनवायला लागतो.

त्याच्या वरच्या भागात सूर्यकिरण, हवा, पाऊस यांचा सतत मारा होत असतो. तसेच हा भाग सर्वांना दिसत असल्यामुळे त्या भागाला कुठला तरी आकर्षक रंग नेहमी दिला जातो. परंतु त्याचबरोबर तो ऊन, वारा आणि पाऊस यामुळे खराब होणार नाही याची काळजी घ्यावी लागते

बोटीच्या डेकची गोष्ट वेगळी आहे. पाऊस पडत असताना, वारा जोरात येत असताना बोट चांगलीच झोकांड्या खात असते, अशा वेळेला जर का डेक निसरडे असेल तर त्यावरून चालणाऱ्या व्यक्तीला जलसमाधी मिळायला काही फारसा वेळ लागणार नाही तेवढ्यासाठी एक विशिष्ट प्रकारचा रंग डेकला लावला जातो. हा रंग लावल्यामुळे पाणी पडले तरी त्याच्यावरून पाय घसरत नाही. याला आम्ही अँटीस्किड पेंट असे म्हणतो.

बोटीला जी इंजिने असतात ती डिझेलची असतात. त्यामुळे ती अतिशय तापतात. या तपमानाला टिकणारा तसेच त्या इंजिनच्या नेहमीच्या हाताळण्यामुळे खराब न होणारा रंग द्यावा लागतो.

रसायनांच्या टाक्या या पोलादाच्या असतात. पोलादावर अनेक रसायने (उदा. अॅसिडस्) प्रक्रिया करतात. ही क्रिया होऊन देण्यासाठी एक वेगळाच रंग बनवावा लागतो.

समजा सर्वसाधारणपणे जी माल वाहून न्यायला वापरली जाते अशी बोट संपूर्ण रंगवली तर त्याचा खर्च तीन ते चार लाख रुपयांच्या घरात जातो.

समजा हे रंग खराब निघाले, पटकन निघून गेले तर बोटीचे प्रचंड नुकसान होते आणि त्याचमुळे हे रंग चांगले टिकाऊ कसे बनवायचे याचे प्रोजेक्ट आपण घेतले आहे. काही कळतंय का ?'

'होऽऽ. सोप्पं आहे. यात न कळण्यासारखं काहीच नव्हतं. त्यामुळं मी मोठ्ठा होकार देऊन टाकला.

'थांबा जरा, कळतंय म्हणून वाचू नका. खरा महत्त्वाचा भाग आताच आहे. आता आपण रंग म्हणजे काय ते बघू. तुम्ही रंग अनेक बघितले आहेत. घराच्या भिंतीना,


**NEW TITLES RECEIVED**

1. **Hand Me A Fig Leaf** (Bestseller–Thriller) – James Hadley Chase
2. **Windfall** (Bestseller–Thriller) - Desmond Bagley
3. **Glitter Dome** (Bestseller–Novel) – Joseph Wambough
4. **The Angels Weep** (Bestseller–Thriller) – Wilbur Smith
5. **Cactus And Roses** (Autobiography) – S. L. Kirloskar
6. **Fourth Round / Indo-Pak War / Future History 1984** (Next likely war with Pakistan) – Ravi Rikhye
7. **The Book of Indian Birds** (Illustrated) – Salım Ali.

• आमची एकापेक्षा अधिक पुस्तकांची आणि अधिक वर्षांची वर्गणी फारच स्वस्तात असते. अधिक पुस्तकांची, अधिक वर्षांची वर्गणी भरा आणि इंधन व वेळ वाचवा !

**The Phoenix Library**

727, opp. Sadashiv Post, Pune–30.

मोटारीना, फर्निचर, रेल्वे, हॉटेल्स या ठिकाणी वेगवेगळे रंग आपण वापरतो.

पण तुमच्या मनात असा कधी विचार आलाय का,की हे विविध रंगछटांचे रंग कसे बनलेले असतात ?

'हो ऽऽ' आपण दिली ठोकून!

'कसे ? '... आता आली का पंचाईत. हे शास्त्रज्ञ महावात्रट असतात. कुठं थांबावं ते कळतच नाही. मी गप्प झालो. तो हसला. त्यांनी ओळखलं; परंतु या अजाण पामरावर उगाचच खोटं बोलण्याची वेळ आपल्यामुळं आली, असा काहीसा करुण भाव त्याच्या डोळयांत तरळला.

रंग दोन घटकांनी बनतात. (१) बंधक (Binder) (२) रंगद्रव्य (Pigment )तो पातळ बनवण्यासाठी अनेकदा 'थिनर' वापरतात. बंधक हे निसर्गात सापडतात तसेच बनवता सुद्धा येतात. लाख, राळ, डांबर, बेलतेल हे सर्व नैसर्गिक बंधक. तर ॲक्रिलिक, पॉलिएस्टर, युरेथन, इपॉक्सी हे सर्व माणसाने बनवलेले बंधक. या प्रत्येकाचे गुणधर्म वेगळे असतात त्यामुळे जशी गरज असेल त्याप्रमाणे आपण हवा तो निवडू शकतो.

रंगद्रव्यसुद्धा नैसर्गिक आणि कृत्रिम अशा दोन प्रकारची असतात. काव, लालमाती ( Red Oxide ) नीळ, पिवळी माती (Yellow Iron Oxide) दिव्याची काजळी ही नैसर्गिक रंगद्रव्ये झाली. तर थॅलोसायनिन, हंसायलो, इ कृत्रिम रंगद्रव्ये असतात. यांचा उपयोग हवी ती रंगछटा येण्यासाठी, गंजण्याला विरोध करण्यासाठी; रंग लावता येण्यासारखा ( Brush able ) करण्यासाठी, करतात.

आता प्रथम आपण आपल्याला लागणाऱ्या सर्व साहित्याची यादी करायची. ते भारतात सहज उपलब्ध आहे का नाही ते पहायचे. नसल्यास त्याला योग्य पर्याय शोधायचा, त्याची किंमत काढून त्याप्रमाणे आपल्याला लागणाऱ्या रंगाच्या बॅचेस बनवायच्या.

बॅचेस या नेहमी छोट्या छोट्या बॉलमिल मध्ये करतात. वेगवेगळे घटक बदलून, त्यांचे प्रमाण बदलून, अनेक बॅचेस बनतात. या प्रयोगशाळेत तपासून पहायच्या. त्यातल्या चांगल्या बॅचेस बाजूला काढून त्या पुन्हा पुन्हा बनवून त्यातले सर्व दोष घालवायच.

मग एक ट्रायल बॅच बनवायची. ती जर व्यवस्थित चालली तर मोठी बॅच बनवायची मग सर्व चाचण्या तयार करून प्रॉजेक्ट संपवायचं.'

आतापर्यंत त्याची ब्रह्मानंदी टाळी लागली होती. स्वारी खुषीत होती. माझी अवस्था तुमच्यासारखीच झाली होती. तो पुन्हा सुटायच्या आत थांबवणे भाग होते.

'एवढं कळलं का ? म्हणजे मग आपण साहित्याची यादी बनवायला लागू.'

'काय, काही कळलं का ?'

'काही कळलं का ?' म्हणजे ?' त्याला माझा प्रश्न क्षणभर कळलाच नाही.

'ओ. आय. सी. मी जे सांगितलं ते कळलं का ?'

'हो sss'

'वा छान !'

'पण एक शंका आहे.'

'विचारा ना, अवश्य !' महाशय एकदम खुषीत होते.

'तुम्ही संशोधन करता म्हणजे काय करता ?'

हा प्रश्न ऐकल्यावर तो शास्त्रज्ञ किती धाडकन् पडला असेल आणि नंतर त्याने कसा थयथयाट केला असेल याची तुम्हीच कल्पना करा ! □

---


## माणूस दिवाळी अंक : किंमत १५ रुपये

'स्वतःला अमिताभ समजतोय का हा देशमुख ?'
'आयडिया !' जाधव जोरात ओरडले.
'कसली आयडिया ?' काळे
'अमिताभ फॉरम्युलाचं सोलुशन...ऑपरेशन रेखा!'
'आँ....!' सर्वांचं आश्चर्य !
'अरे जेवा की !' पाटील म्हणाले.
'पण ऑपरेशन रेखा ही काय भानगड आहे ?'
भानगड-बिनगड काही नाही
'माणूस' दिवाळी अंकातील ही एक कथा

**अमिताभ फॉर्म्युला !**

लेखक : **प्रा. कुं. ल. पुरी**

वि. ग. कानिटकर

**आरण्य**

–आफ्रिकेच्या जंगली श्वापदांच्या सहवासात शहरी लेखक

*

**दया फॉरेनासी जाये**
**मागे परतोनी न पाहे**

फिरोज रानडे यांची
एक फर्मास गोकुळ कथा

---

**॥ माणूस ॥ ॥ अक्षर ॥ ॥ पुस्तक पंढरी ॥**

**या तीन दिवाळी अंकांचे मुंबईतील प्रमुख विक्रेते**

□ विजय डी. खानविलकर
विक्री केंद्र १ : **बाँबे बुक डेपो**
गिरगाव, मुंबई ४

विक्री केंद्र २ : **आशा विवाह संस्था**
आयडियल बुक डेपो शेजारी
दादर, मुंबई २८

## मुक्काम कोरेगावभिवर

पृष्ठ ३ वरून

ळाचे चटके खाणं चालूच राहिलं. समोर लिफ्ट दिसते आहे. त्यातून पाणी येत नाही म्हणून डोळ्यांतून पाणी येई. ग्रामायनचे कार्यकर्ते आले. त्यांनी आमची झोपी गेलेली जिद्द जागवायला सुरुवात केली. पुन्हा सगळे कष्ट-त्रास घेण्यापेक्षा वाटायचं ही स्कीम चालू होण्यापेक्षा बंद राहिलेलीच चांगली ! आम्ही तसं बोलून दाखवलं. ग्रामायनच्या कार्यकर्त्यांनी तरीही जिद्द सोडली नाही. लिफ्ट चालू करायला कर्ज पाहिजे. पूर्वीच्या थकबाक्या असताना ते कसं मिळणार ? ग्रामायनने प्रयत्न केले. बँक ऑफ महाराष्ट्रनं प्रतिसाद दिला व लिफ्ट चालू करण्यासाठी नव्व्याण्णव हजार रुपयांचं कर्ज दिलं. या सर्व कामासाठी, येथे ग्रामायननं योजलेल्या कार्यकर्त्यानं रात्र पाहिली नाही, दिवस पाहिला नाही; पण काम घडवून आणलं. आज त्यामुळंच आमच्या गावचा अंधार दूर झाला आहे. आता आम्ही अंधार पडू देणार नाही, आज लावलेला दिवा विझणार नाही हे आम्ही पाहणार आहोत ..."

सरपंचाच्या भावपूर्ण भाषणानंतर दत्तात्रय रामचंद्र फडतरे, सुरेश काळे, बन्सी फडतरे, ज्ञानेश्वर शुक्ल, जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव कुल हेही सुरेख बोलले. या तरुण तडफदार कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त भाषणं झाली. ग्रामायननं पुढाकार घेतला नसता तर हे घडलं नसतं हे त्यांनी सातत्यानं मांडलं. डॉ. पटवर्धनसाहेबांसारख्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या अध्यक्षांना ग्रामीण विकासाची आवड असल्यामुळं त्यांनी या कठीण भागात यायला सवड काढली याचं वक्त्यांना अप्रूप वाटल्याचं जाणवत होतं. ग्रामायनच्या कार्यकर्त्यांबद्दल सुरुवातीला गावकऱ्यांच्या मनात प्रश्न उभे रहायचे. यापूर्वी लिफ्ट चालू करायचे आमिष दाखवून अनेकांनी फसवलं होतं. एका तोतयानं मीटरवर लाकडाच्या फुल्या मारून विजेची खोटी बिलं उकळली असे बन्सी फडतरेनं सांगितलं. आमच्या गावाचं नशीबच फुटकं असं वाटायचं, असे हे कार्यकर्ते तळतळून म्हणाले. आजच्या जगात दहा रुपये उसने मिळायची मारामार; पण बँकेनं लाखभर रुपये आमच्या जिद्दीच्या तारणावर दिले. आम्ही दारूबंदी केली आहे. आता आमच्या बुद्धीची चाकं फिरायला लागली आहेत. आमचं भावी जीवन सुधारायचा पाया ग्रामायनन घालून दिला आहे. सुरेश पवारसारख्या कार्यकर्त्याच्या मदतीनं आम्ही हे सहाशे एकर उत्तम पिकाखाली आणू आणि नव्या पिढीचा नवा जोम दाखवून देऊ अशी जिद्द या सर्वांनी इतक्या जोशात व्यक्त केली की ग्रामायनच्या देशपांडे— माजगावकर या धुरीणांना आपलं काम योग्य दिशेनं चाललं असल्याची खात्री पटली.

ग्रामायनच्या कार्यकर्त्यांचा परिसासारखा उपभोग करून आपला परिसर सोन्याचा बनवायला आजच्या घटस्थापनेच्या दिवशी प्रारंभ करावा, अशी सुरुवात करून डॉ. पटवर्धनांनी सांगितलं की, नदीतले पाणी वर काढताना आपले विचारही आपण उंचावले पाहिजेत. आज पाण्यातून लक्ष्मी वर येत आहे. तिला सांभाळायची असली तर बेदिली चालणार नाही. हे काम पुढं नेण्यासाठी गावातलेच चांगले कार्यकर्ते निवडून त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवायला हवी. आपलं धान्य आपण पिकवावं. केवळ उसावर भर न देता इतर पिकं घ्यावीत, एकमेकांच्या सहकार्यानं त्यांची विक्री-व्यवस्था : तयार करावी. अशी पिकं काढण्यासाठी योग्य ती पिककर्ज बँक देईल आणि लोक जोपर्यंत वेळच्या वेळेवर कर्जं फेडत राहतील तोपर्यंत पुढची कर्जं वेळेवर देण्याची व्यवस्था होईल अशी त्यांनी खात्री दिली.

ग्रामायनचे अध्यक्ष वसंतराव देशपांडे व सचिव अनिल काळे यांनी बँक ऑफ महाराष्ट्र-प्रमाणेच उंडार्प व ऑक्सफॅम यासारख्या संस्थांचे आर्थिक साहाय्य या व अशा कामांसाठी मिळत असल्याची माहिती दिली; पण ग्रामायनचं खरं बळ तळमळीच्या व डोळस कार्यकर्त्यांमध्ये आहे असे आवर्जून सांगितले.

एकीकडे नदीतून वाहून जाणारं पाणी उपसण्याच्या उद्देशानं बसवलेली पण बंद पडलेली लिफ्टयोजना आणि दुसऱ्या बाजूला पाण्यासाठी कासावीस झालेली जमीन व त्या जमिनीवर पाण्याअभावी ठप्प बसलेले — आसावलेले शेतकरी यांमध्ये ग्रामायनासारखी निश्चित उद्दिष्टं असलेली संस्था आणि तिचे विद्युतभारित कार्यकर्ते असले तर इलेक्ट्रिक मोटरमध्ये वीज खेळून पंप पाणी खेचू शकतो आणि दहा वर्षं झोपलेली योजना जागी होऊन दुष्काळग्रस्तांना नवजीवन देऊ शकते हे कोरेगावभिवरला तिसऱ्या वेळेस सिद्ध झाले आहे !

— दिलीप जोशी

## वर्गणीदारांसाठी सूचना

वर्गणीदाराना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्याना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी दि. ३१–१०–८२ पूर्वी पाच रुपये म. ऑ.ने पाठवावेत.

अंक व्यवस्थित मोजून पोस्टाच्या ताब्यात दिले जातात. तरीही अक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी. अंक शिल्लक असल्यासच अवश्य पाठवू.

ज्यांची वर्गणी २० ऑक्टोबर किंवा त्यासुमारास संपली असेल व ज्यांची पुढील वर्षाची वर्गणी जमा नसेल त्यांना दिवाळी अंक पाठविला जाणार नाही.

जे वर्गणीदार सा. माणूस कार्यालयातून दिवाळी अंक नेणार असतील त्यांनी ३१–१०–८२ पूर्वी तसे स्पष्ट लेखी कळवावे.

MANOOS (Marathi Weekly) Two Rupees Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

विश्वनाथ हा हाडाचा स्ट्रोकमेकर आहे.
स्ट्रोकप्लेअर नव्हे.

इतर फलंदाज बॅट एखाद्या हातोड्यासारखी किंवा कुऱ्हाडीसारखी वापरतात. त्यांनी मारलेला फटका म्हणजे चेंडूवर घाव घालण्याचाच प्रकार असतो.

विश्वनाथ हा चेंडूवर प्रेम करणारा माणूस आहे. एखादी हळूच चापटी मारावी तसा हा फटका मारतो आणि चेंडू सहज सीमापार होतो.

विश्वनाथच्या या फटक्यामागे ताकद असते; पण ती अदृश्य असते. ती मनगटातून येतेच पण उत्कृष्ट टाइमिंग हे त्याचं वैशिष्टय आहे. म्हणूनच दूरवरून पाहणाऱ्याला विश्वनाथची बॅट एखाद्या चित्रकाराच्या कुंचल्यासारखी वाटते. संपूर्ण मैदान हा त्याचा कॅनव्हास असतो आणि त्यावर विविध फटक्यांचं रेखाटन चालू असतं.

असा शैलीदार खेळ करणारा विश्वनाथ संपला... संपला असे वाटेपर्यंतच एखादी दावलेली स्प्रिंग उसळावी तसा तो उसळतो. हे त्याचं मोक्याच्या वेळी उसळणं हजारो डोळ्यांचं पारणं फेडून टाकतं. तो दिवस त्याचा म्हणून नोंदला जातो.

– अशा विश्वनाथच्या खेळाची सर्व वैशिष्टये नोंदणारा
**द्वारकानाथ संझगिरी** यांचा खास लेख

# एका कलाकाराची बॅट

# माणूस : दिवाळी अंक



चिमणराव.

चिं. वि. जोश्यांचा हा मानसपुत्र.
सामान्य, भावडा, खेळकर, पण कारुण्याची **झालर असलेला.**
दामुअण्णा मालवणकरांचा चिमण सर्वांच्या डोळ्यांसमोर असताना दिलीप प्रभावळकरांनी त्यांचा वेगळा चिमण उभा केला.
त्याचं हसणं, बोलणं, रागावणं, खजील होणं, ओशाळणं या साऱ्याला त्यांनी स्वतःची अशी एक छान लकब दिली.
दूरदर्शनवर चिमणराव मालिका फार लोकप्रिय झाली.
चिमण मराठी प्रेक्षकांना जवळचा वाटलाच; पण गुजराथी–पारशी–ख्रिश्चन प्रेक्षकांनाही परका वाटला नाही.
हा चिमण साकार करताना
अभिनयात नेमका पकडताना
चित्रित केला जाताना
आलेले अनुभव चिमणरावांच्या म्हणजे–
दिलीप प्रभावळकरांच्याच शब्दात

# मी आणि चिमणराव

# माणूस : दिवाळी अंक